

# महाभारत

मराठी अनुवाद

श्री. अशोक कोठारे

खंड ३७

शांतीपर्व

# महाभारत

## महाभारत खंड सदोतिसावा

## शांती पर्व भाग दुसरा

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना – महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

# महाभारत


मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.



**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**



©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



**प्रकाशन : १० फेब्रुवारी २०२१**

# अनुवादकाचे दोन शब्द -

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शबपयग वपरतत परत, मझ अस अनभव आह क, बहतक वचकन त वचणस तस हत. मणन भष आपल नहमचच ओघवत ठवल आह.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे

जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा सदोतिसावा खंड, शांती पर्व भाग दुसरा आपण आता वाचणार अहात.

शांती पर्वात हिंदू धर्माचे मूलभूत ज्ञान सांगितले आहे. त्यात नितीशास्त्र, अध्यात्म विद्या आणि कर्मकांड अशा तीन विभागात ते दिलेले आहे. युधिष्ठीर व भिष्म ह्यांच्या संवादाच्या रुपात ते दिलेले आहे. नितीशास्त्रात माणसांने इतर लोकांशी, प्राण्यांशी व वस्तुमात्रांशी कसे व्यवहार करावेत त्याचे विवरण आहे. अध्यात्मविद्येत माणसांने त्याच्यामध्ये असलेल्या आत्म्याला कसे समजून घ्यावयाचे त्याची चर्चा केलेली आहे. कर्मकांड माणसाला त्याचे भाग्य बदलण्याची इच्छा असते त्यासाठी विविध देवतांना कसे खूष करावयाचे त्यासाठी काय करावे त्याची माहिती आहे. कर्मकांड हा एकाप्रकारे भ्रष्टाचाराचा भाग आहे. देवतांना वशिले लावून आपले भाग्य सुधारता येते अशा संकल्पनेतून हा भाग विकसित झाला आहे. कर्मकांड कितपत माणसाचे दैव सुधारू शकते हा विवाद्य विषय आहे. मनुष्य आशावादी असतो व म्हणून तो कृत युगापासून त्या वशिलेबाजीत रमलेला आहे. कृतयुगात प्रामुख्याने यज्ञ त्यासाठी सांगितले आहेत. परंतु, कलीयुगात त्याचे स्वरुप बदलून सामान्य पुजा विधीमध्ये ते रुपांतरीत झालेले आपण पहातो. उपास तापास, व्रतवैकल्ये, शाकाहार करणे अशी आणखीन कांहीं रुप कर्मकांडात आपण पहातो. शुद्ध हिंदू धर्मात कर्मकांडाला महत्व नसते. त्यात पहिले दोन म्हणजे नितीशास्त्र आणि अध्यात्मविद्या ह्यांच्यावर भर असतो. कर्मकांडाचे महत्व पुरोहित वर्गांने त्यांच्या स्वार्थासाठी अवास्तव प्रमाणात वाढवले आहे आणि कर्मकांडातील विधी करणे म्हणजेच हिंदू धर्म असा एक गैरसमज पसरवण्यात ते यशस्वी झालेले आहेत हे आपल्याला दिसते. त्यासाठी अनेक संघटना पुरोहित वर्गाने यशस्वीपणे कार्यरत केल्या आहेत. समर्थ रामदासांनी तीनशे वर्षापूर्वीच त्यांच्या दासबोधात ते सगळे दिले आहे परंतु, त्याकडे हिंदू समाजाचे त्याच्या अशिक्षित रहाण्याच्या प्रवृत्तीमुळे दुर्लक्ष झालेले आहे. प्रत्येक हिंदूंने त्याला त्याचा धर्म समजून घ्यावयाचा असेल तर शांतीपर्व चांगले लक्ष देऊन वाचावे.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची

रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात

किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राजांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई-साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे




माझा ई–मेल –

ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in
ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.


ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई-पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई-साहित्य करणार आहेत परंतु, हे ई-पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

विशेष सुचना – महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/2309234323812351236623402381235O.html

# शांती पर्व
# राजधर्मानुशासन पर्व

भिमसेन सांगतो, अरे राजा आता तुला मी आपले चार जीवन प्रकार कोणते ते सांगतो. त्यात राहून मनुष्य त्याचे जीवन कसे जगू शकतो ते समजते. ते चार आहेत, वानप्रस्थाश्रम, भैक्ष्य (एक प्रकारचा संन्यासाश्रम), ग्राहस्थ्य आणि ब्रह्मचर्याश्रम. त्यातील ब्रह्मचर्याश्रम ब्राह्मणांसाठी विशेष रुपाने सांगितला आहे. डोक्यावर जटा धारण करण्या आधी स्वताचे शुद्धीकरण करावयाचे असते. तो विधी पवित्र अग्नीच्या समक्ष करावयाचा असतो. त्याशिवाय वेदांचा अभ्यास त्याला करावा लागतो. त्यानंतर तो संयमी जीवन जगत त्याच्या वर्णाच्या कामाकडे लक्ष देईल. योग्य वेळी त्याचे गृहस्थाश्रम संपल्यावर वयोमाना नुसार तो वानप्रस्थाश्रमी जाईल. तेथे तो अरण्यकांचा अभ्यास करील. त्यानंतर तो मोक्षाच्या साधनेत स्वताला गुंतवून घेईल. ब्राह्मण वर्णाचे भैक्ष्यात, म्हणजे भिक्षा मागण्याचे कार्य, स्वताला गुंतवून घेईल. त्या काळात तो ब्रह्मचर्य पालन करील. त्याकरता तो देश विदेश भटकेल. त्याचा समय तो ईशचिंतनात व्यतीत करील. गृहस्थाश्रमी त्याच्या पत्नीच्या इच्छेनुसार तिच्याशी लैंगिक व्यवहार करील. इतर कोणत्याही स्त्रीशी त्याचा तसला संबंध नसेल. त्याकरता तो औदासिन्याचे धोरण अंगिकारेल. अशारितीने तो त्याची प्रापंचिक सुख उपभोगेल. असे जगणारा पुढच्या मृत्यूनंतरच्या, आयुष्यात स्वर्गात जाईल. तो ब्राह्मण त्याच्या शिक्षकाच्या आज्ञेत राहील. तो सातत्याने चांगुलपणा व माणूसकी ह्या नियमात राहून सगळ्यांशी व्यवहार करणारा असेल. असे जीवन ब्रह्मचारी जगत असला पाहिजे.

शांती पर्व भाग साठावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकसष्ठावा

युधिष्ठीर बोलतो, "आता मला सांगा आमच्या सारख्या उच्च कुलिन लोकांची कर्तव्ये कोणती"?

भिष्म सांगतात, चार वर्ण दिलेले आहेत. त्यातील नंतरचे तीन (क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र) त्यांच्या बद्दल विशेष माहीती मनूने दिलेली नाही. त्यामुळे त्यांची माहिती मी देऊ शकत नाही. मात्र क्षत्रियांसाठी जे सांगितले आहे त्याप्रमाणे पहाता क्षत्रिय क्रूर असले तरी चालते. कारण बर्याच वेळा न्याय देतांना तसे निष्ठूर व्हावे लागते. जे ब्राह्मण क्षत्रियांचे काम करू लागतात त्यांच्यावर तसा आरोप होतो व असें सांगतात कीं, तसे ब्राह्मण अखेरीस मृत्यूनंतर नरकात जातात. कांहीं नंतरच्या जन्मात कुत्रा, लांडगा, गुलाम, अशा हलक्या वंशात जन्म घेतात. जे ब्राह्मण प्राणायाम, ध्यान चिंतन करण्यात आपला इतर समय घालवतात, कोणतेही पापकर्म करत नाहीत, निरिच्छ असतात, दान धर्म करतात, ते मात्र स्वर्गात जातात. तुझ्या सारख्या राजाने वेदांचा अभ्यास करण्याने ते साध्य होऊ शकते. ते व्यापार, कृषी आणि व्याध ह्यात वेळ घालवू शकतात. जसे प्रसंग येतात त्याप्रमाणे त्याला ती ती कामं करावा लागतात. माणसाच्या सगळ्या कृत्यांवर गतकाळाचा प्रभाव असतो. गेल्या जन्मात जसे तो करत होता त्याप्रकारचे काम तो पुन्हा ह्या जन्मात करू लागतो. त्याच प्रमाणे ह्या जन्मात जे तो करत असतो त्यामुळे त्याच्या पुढच्या जन्मातील कार्य ठरत असते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे आपले सगळे जन्म एकमेकांना बांधल्या सारखे असतात. त्यामुळे ह्या जन्मातील कार्य ठरवून केले असे कीं त्यामुळे त्याचे पुढील जन्माचे कार्य निश्चित होईल तर ते शक्य असते.

शांती पर्व भाग एकसष्ठावा संपला.

# शांती पर्व

## भाग बासष्ठावा

पुढे भिष्म सांगतात, ब्रह्मणांने लढणे, कृषी करणे, व्यापार उदीम करणे, पशुपालन करणे, धनसंचय करणे अशी कमं करावयाची नाहीत. बुद्धीमान ब्राह्मण जो गृहस्थाश्रम जगत आहे तो सहा वैदिक उपासना करेल. निवृत्तीच्या काळी तो वनात जाईल. अशा ब्राह्मण कौतुकास्पद असतो. ब्राह्मण राजाकडे नोकरी करणार नाही. शेती करणार नाही, व्यापार करणार नाही. तो फक्त भिक्षा मागून जगेल, किंवा शिकवणी करून त्यावर गुजराण करील, तो पौरोहित्य करील, तो कोणत्याही वाईट कामात गुंतणार नाही. तो स्वपत्नी खेरीज इतर बाईशी संबंध ठेवणार नाही. तो सावकारी करणार नाही. जो जन्माने ब्राह्मण असलेला अशा कृत्यात गुंतला तो ब्राह्मण समजला जात नाही. तो शुद्राहूनही नीच समजला जातो. असा ब्राह्मण जरी वेद जाणत असला  तरी त्याचे ब्राह्मण म्हणून चे अधिकार रहात नाहीत. अशा ब्राह्मणाला राजा किंवा कोणी इतर गृहस्थ यज्ञ करण्यासाठी (पुजा वगैरे विधी करण्यासाठी) बोलावणार नाही. त्याला दक्षिणा मिळणार नाही. त्याला कोणी दान केले तरी त्याचे पुण्य देणार्याला मिळणार नाही. अशा प्रकारे संयमाचे नियम ब्राह्मणांना सांगितले आहेत. भौतिक संपत्तीची अभिलाषा नसणे हे ब्राह्मणांसाठी महत्वाचे असते त्यांने फक्त मोक्षाचा विचार करावयाचा असतो. असा ब्राह्मण श्रेष्ठ समजला जातो. तो दयाळू असला पाहिजे. ते गुण नसतील तर तो ब्राह्मण पापी समजला जातो.

जर त्या चार वर्णाचे लोक त्यांच्या कर्तव्यापासून दूर गेले तर विष्णू नाराज होतो. त्यांना स्वर्गात जाता येत नाही.

दुसरे काय ते सांगतो ते ऐक, क्षत्रियाचे काम असते कीं, ते त्याच्या राज्यातील लोक त्यांची कर्तव्ये योग्य प्रकारे करतात किंवा कसे त्यावर लक्ष ठेवतो. जर शुद्र त्याचे काम व्यवस्थितपणे करत असेल तर तो ब्राह्मणा इतकाच योग्य समजला गेला पाहिजे. तसेंच जो वैश्य त्याचे काम व्यवस्थितपणे करतो तो सुद्धा ब्राह्मणा इतकाच योग्य समजला जातो. तोंच नियम क्षत्रियांना लागू होतो. त्याने संतति (पुत्र प्राप्ती) होणे त्यांच्या नंतरच्या आयुष्यासाठी जरूरीचे मानले गेले आहे. राजाच्या परवानगीने मनुष्य त्याचे वर्णाचे कार्य

बदलू शकतो. त्याप्रमाणे ब्राह्मण वैश्य अथवा क्षत्रिय होऊ शकतो, क्षत्रिय ब्राह्मण अथवा वैश्य होऊ शकतो. परंतु, शुद्र नेहमीच शुद्र असणार. त्यांना द्विज असें म्हणतात जे व्रतबंधाने बांधलेले असतात. ते वेदांचा अभ्यास करत असतात. राजा जर युद्धात जिंकला तर तो त्या प्रकारचे यज्ञ करेल. त्यावेळी तो ब्राह्मणांना दानं देईल. राजा त्याच्या निवृत्तीच्या वेळी त्याच्या पुत्राला गादीवर बसवेल. त्यानंतर राजा संन्यास घेऊ शकतो. ब्राह्मणां व्यतिरीक्त इतर तीन वर्णाचे जोगी होणार नाहीत. तरी तसे बंधन नाही. त्यांचे गृहस्थाश्रमी जीवन संपल्यावर ते त्यांच्या पत्नीसह वनात जाऊन तपस्या करू शकतात. त्यावेळी मात्र ते ब्राह्मण, क्षत्रिय अथवा वैश्य आणि शुद्र समजले जाणार नाहीत कारण वनाश्रमींना व्रणभेद लागू होत नाही. त्याच्यात वयोमानाने निर्णय घेण्याची क्षमता आलेली असेल तर  शुद्र वयोवृद्ध झाल्यामुळे शुद्र समजला जात नाही. त्याचा सल्ला राजा घेऊ शकतो. तो प्रसंगी ब्राह्मणांचे कामसुद्धा करू शकतो जर तो आयुष्यभर ब्राह्मणांकडे काम करत असेल तर. असे वेद सांगतात. सर्व वर्णांत क्षत्रिय वर्ण जास्त चांगला समजला जातो म्हणून त्यात रहाण्याचा प्रयत्न सगळे करू शकतात. क्षत्रियांना जेवढे अधिकार असतात तेवढे ब्राह्मणालासुद्धा नसतात. तरी ब्राह्मण राजाचे सल्लागार बनून त्या अधिकाराचा हिस्सा घेऊ शकतात. जर न्याय दंडविधान नाहीसे झाले तर वेदसुद्धा नष्ट होतात. दंडविधान हे क्षत्रियाचे कार्य असते म्हणून तो सर्वात जास्त महत्वाचा समजला जातो. उदाहरणार्थ, जर खाण्यासाठी पशु चुकीच्या रितीने कापले तर समाजात पाप वाढते. ते अहिंसक पद्धतीनेच कापले गेले पाहिजेत म्हणून ते काम करणारा व्याध (क्षत्रिय, खाटीक) महत्वाचा ठरतो. जनक राजाने मांसाहार सगळ्यांना बंधनकारक ठरवला आहे.

शांती पर्व भाग बासष्ठावा संपला.

# शांती पर्व

## भाग त्रेसष्ठावा

भिष्म बोलतात, राजाच्या जबाबदार्यांमध्ये यतींपासून (साधू, ऋषी इत्यादी) सामान्य जनांपर्यंतच्या सगळ्या लोकांच्या कर्तव्याची माहीती येत असते. जर राजाचे काम बिघडले तर सगळ्या लोकांना त्याचा त्रास होत असतो. बर्याच प्रकारच्या जबाबदार्या अध्यहृत असतात. त्यामुळें त्याबद्दल संदेह सुद्धा असतो. विविध तज्ज्ञ त्यांची मते मांडतात  ज्यात तफावत असते त्यामुळे राजाच्या कामाबाबत गोंधळ असतो. अनेक मतभेद आढळतात. त्या शास्त्रातील अनेक मतांचे विविध अर्थ लावले जातात, त्यामुळे राजाची सुद्धा फसवणूक होण्याची शक्यता असते. क्षत्रियांची मुख्य जबाबदारी सांगितली आहे कीं, ते लोकांना वाईट लोकांपासून संरक्षण देतील. त्यात चोर, लुटारु, डाकू असे धरलेले आहेत. न्याय व अन्याय कसे ठरवावयाचे त्याबद्दल सुद्धा गोंधळ असतो कारण एकादी गोष्ट विशिष्ट परिस्थितीत न्याय असतांना दुसर्या परिस्थितीत तीच अन्याय कारक असू शकते. त्यासाठी त्याबद्दल निर्णय घेणे सोपे नसते. त्या वादातून मार्ग काढण्यासाठी अखेरीस राजाचा निर्णय सर्वांना बधन कारक केला आहे. त्यामुळे राजाची जबाबदारी जास्त जोखमीची असते. त्याला दोनही बाजूंचा साकल्याने विचार करत निर्णय घ्यावयाचे असतात. राजाची जबाबदारी ब्रह्माच्या आदेशांप्रमाणे केवळ माणसांच्या पुरती नसते तर त्यात सगळे चराचर येत असतात. त्यामुळें राजाचे काम जास्त अवघड होत असते. चांगला राजा त्यातून योग्य निर्णय घेऊन त्याचे बुद्धीकौशल्य सिद्ध करत असतो. त्या कामात त्याला ब्राह्मण मदत करण्यास बांधलेले असतात. त्यामध्ये साध्य, अश्विन, वसु, भद्र, विवस्वान, मरुत आणि सिद्ध अशा देवता त्यांना मदत करत असतात असें मानले जाते. कारण त्या सगळ्या देवता प्राधान्याने क्षत्रिय प्रवृत्तीच्या असतात. कांहीं देवता ब्राह्मण प्रवृत्तीच्या असतात त्या ब्राह्मणांच्या कर्तव्याचे संयोजन करत असतात. आता मी तुला सांगतो राजाचे वैराग्य चांगले असेल तर त्याचा उपयोग प्रजेला कसा होते. वैरागी राजा प्रजेचे हित आणि सुख उत्तम रित्या सांभाळत असतो. त्यात तो निरपेक्ष बुद्धीने काम करत असतो. प्राचीन काळी राजा सैधंत्रीने दानवांचे पारिपत्य कसे केले ते पहावे लागेल.

त्याच प्रमाणे मंधत्रीने विष्णूला प्राप्त करण्यासाठी एक यज्ञ केला होता त्यावेळी त्याला विष्णू इंद्राच्या रुपात दर्शन देतो. त्यावेळी त्यांच्यामध्ये मोठे संभाषण झाले होते. त्यामध्ये तो इंद्र सांगतो, "नारायण कोणालाही दर्शन देत नाही. तेवढे सोडून दुसरे कांहीं मांग. तू चांगुलपणाचा पुरस्कर्ता आहेस म्हणून मी इंद्र तुला भेटत आहे. तू देवांसाठी काम करत असतोस, म्हणून मी तुला दुसरे कांहीं पाहिजे असेल तर ते देण्यास तयार आहे".

मंधत्री त्याला बोलतोस, "मी आपल्याला लवून नमस्कार करतो, मला प्रथम देवाचे दर्शन हवे आहे, मी सगळ्या भौतिक इच्छांचा त्याग करून स्वर्गाकडे जाण्याचे पहात आहे. क्षत्रिय वर्णाच्या माध्यमातून मी बरेच पुण्य मिळवले आहे. तरी कांहीं गोष्टीबाबत मला अजून ज्ञान नाही. इंद्र सांगतो, "जे राजे नाहीत तरी राजाचे काम करत असतात त्यांना कितीही चांगले कार्य केले तरी राजाचे श्रेय मिळू शकत नाही. गृहस्थाश्रमाच्या कार्याप्रमाणे त्यानंतर वानप्रस्थाश्रमाचे कार्य त्या राजाला करावयाचे असते. ते केल्याने राजाला मोठे श्रेय मिळत असते. प्राचीन काळी विष्णूंने पाप करणार्यांचे मोठ्या प्रमाणात निर्दालन केले होते म्हणून तो त्या पदाला पोहोचला आहे. जर क्षत्रियांनी पाप शक्तींचा (दैत्य, दानव, राक्षस इत्यादि) नाश वेळीच केला नसता तर सगळे ब्राह्मण संपुष्टात आले असते. राजाच्या मर्यादाशिल राज्य कारभारामुळे सामान्य माणसातील कली घाबरून गप्प रहातो व समाजात न्याय शाबूत रहातो. राजा जर त्याचे काम करणार नाही तर कली सगळ्या चांगुलपणाचा नाश करून कृत युगात कलीयुगाचा अनुभव आणू शकला असता. ते साध्य करण्यासाठी राजाला प्रसंगी दुष्ट व्हावे लागते. त्यावर विनाकारण शोक करण्याचा मूर्खपणा शहाणे करत नाहीत. राजाच्या अनेक कामात दुष्टांचे निर्दालन करणे हे आवश्यक असते त्याच्या शिवाय राजा शांतता व न्याय समाजात प्रस्थापित करू शकत नाही. पुष्कळ वेळा पापशक्ती साधेभोळे रुप घेऊन कामं करत असतात, त्यांने फसणारा राजा नष्ट होतो. राजाला लोकांचे कामातील अंतस्थ उद्देश समजणे आवश्यक असते. क्षत्रियांना भोळसट रहून चालत नाही. अरे मंधत्री, तुझे कार्य चोख करत रहा म्हणजे अंती तुला जे हवे ते निश्चितपणे मिळेल.

शांती पर्व भाग त्रेसष्ठावा संपला.

# शांती पर्व

## भाग चौसष्ठावा

पुढे इंद्र त्याला सांगतो, क्षत्रियांचे काम सर्वांना न्याय देण्याचे असते. जर त्याने ते केले नाही तर सगळे जग मोठ्या अडचणीत येते. कली सगळ्या जगातील सुव्यवस्था तोडून टाकू शकेल. थोडक्यात क्षत्रियांचे कार्य कलीवर लक्ष देण्याचे व त्याला मर्यादेत ठेवण्याचे असते. त्याच वेळी सगळ्यांना समजून घेण्याचेसुद्धा काम त्याला करावयाचे असते. इतर तीन वर्णाच्या लोकांना त्यांची कामं करण्याचे सहज शक्य व्हावे असे त्याला वागावयाचे असते. त्याने दयाबुद्धी व दान करावयाचे असते. कारण तो सर्वात जास्त शक्तीमान असतो. तत्त्वासाठी, न्यायासाठी तो ज्याचे प्राण देण्यास तयार असला पाहिजे. न्याय देतांना तो निःपक्षपाती असला पाहिजे. समाजाच्या भल्यासाठी, सुखासाठी इतर तीन वर्ण त्याच्यावर विसंबून असतात त्याची जाणीव त्याला सदैव असली पाहिजे. जे क्षत्रिय स्वताच्या भल्यासाठी, सुखासाठी इतर वर्णाच्या लोकांचे वाईट करतात ते भ्रष्ट क्षत्रिय समजले जातात. भार्गवाने तशा क्षत्रियांचा संहार केला होता. त्या इतर वर्णाचे लोक जसे ब्राह्मण, वैश्य आणि शुद्र त्यांची दिलेली कामं करत नसतील त्यांना त्याचा जाब विचारण्याचे कार्य राजाच्या क्षत्रियांचे असते. त्याचे समर्पक स्पष्टीकरण न मिळाल्यास त्याना त्याकरता योग्य दंड (शिक्षा) करण्याचे कार्य राजाच्या क्षत्रियांना करावयाचे असते. जो ब्राह्मण त्याचे काम करत नाही तो शुद्र ठरतो व म्हणून त्याला त्या प्रकारची शिक्षा त्याने करावयाची असते. जे त्यांच्या वर्णाचे कार्य उत्तमरित्या करतात त्याना राजा प्रशस्तीपत्र देईल व त्यांचे कौतुक करील त्याना दानं (बक्षिस) करून. अशारितीने संतुलन राखून जो राजा त्याचे काम करतो तो श्रेष्ठ ठरतो. त्याची तारिफ सगळीकडे होते. म्हणून सगळ्या वर्णात क्षत्रिय वर्ण सर्वश्रेष्ठ मानला जातो. त्याप्रमाणे त्याच्या जबाबदार्यासुद्धा जास्त असतात.

मंधत्री विचारतो, "इतर समाजातील लोक जे चार वर्ण व्यवस्थेत नसतात त्यांचे राजाने कसे पहावयाचे ज्यात यवन, किराट, गंधर्व, चिनी, सवर, शक, तुशर, कंक, पल्हव, आंध्र, मद्रक, पौंड्र आणि बर्बर इत्यादी आहेत. त्याशिवाय चार वर्णाच्या मिश्र संबंधातून

अनेक जाती उद्भवल्या आहेत त्यांचे कसे ठरवले जाते"? त्याच प्रमाणे कांहीं जमाती चोरी करण्यालाच त्यांचा उपजीविचे साधन मानतात त्यांचे नियंत्रण कसे करावयाचे राजाने ते सांगा. आपण (इंद्राला उद्देशून बोलतो) क्षत्रियांचे मित्र अहात,

इंद्र सांगतो, चोर्या करणारे वनात रहातील. ते त्यांच्या कुटूंबाची, त्यांच्या पित्याची, मातेची सेवा करतील असें राजाने पहावे. कारण सेवा करण्याच्या प्रवृत्तीचा विकास त्यांच्यामध्ये होत गेला कीं, त्यांचे चोर्य करण्याचे कमी होईल व ते आपल्या चतुर्वर्ण पद्धतीत सामावणे शक्य होईल. त्यांतून प्रथम भ्रष्ट क्षत्रिय व त्यांत सुधारणा होत कुलिन क्षत्रिय तयार होत जातील व ते लोक चोरी करण्याचे बंद करतील. कांहीं वैश्य (कारागिर) होतील कांहीं शेतकरी, वैश्य (पशुपालन करणारे) असे सुधारत जातील. युद्धाच्या वेळी ते सैनिकाचे काम करतील. त्यांच्यातील बुद्धीमंताना वेदाचा अभ्यास करण्यासाठी उद्युक्त केले जाईल हे सगळे राजाला करावयाचे असते त्या मार्गाने त्या चौर्य करणार्या जाती सुधारत जातील व आम समाजात विलीन करता येतील. ते त्यांच्या पितरांचे श्राद्ध करू लागतील, त्यांच्याकडून मोलाची काम जसे विहिरी खोदणे, रस्ते बनवणे, कालवे तयार करणे, जमिनी सपाट करणे, तलाव, सरोवरं असें पाण्याचे साठे करणारे त्यांच्याकडून राजा करून घेईल, त्याच्या बदल्यात त्याला वेतन देईल त्यामुळे ते चोरी करण्याचे बंद करतील. सुधारलेले लोक व्यापार्यांना वाटाड्याचे काम करून त्यांचे उत्पन्न करू शकतील व त्यांची चोरी करण्याची प्रवृत्ती संपेल असे राजा करील. ते अन्नदानाचा यज्ञ ज्याला पाक यज्ञ म्हणतात तो करतील. त्यात ते त्यांच्या सारख्या लोकांना जेवण देतील. अशी कामं चोर्या करणार्या जमातींसाठी सांगितली आहेत ब्रह्माने. मंधत्री विचारतो इंद्राला, सगळ्या वर्णांत वाईट माणसे असतात त्यांना राजा कसे समजेल व त्यांचे नियंत्रण करील ते सांगा.

इंद्र सांगतो, जेव्हां राजाचे न्याय नियंत्रण संपुष्टात येते तेव्हां सगळेच वाईट होण्याच्या मनस्थितीत जातात. त्यांमुळें कृत युग संपते. सगळीकडे एकच गोंधळ होतो. प्रथा, जाती व्यवस्था असे सगळे जे समाजाला बांधून ठेवतात ते उरत नाहीत. पापाचे राज्य पसरते, त्यावेळी परचक्राचा धोका संभवतो. त्यावेळी जर समाजात कांहीं पुण्याई शाबूत असेल तर साधू लोक पुढे येतात व समाजाला मार्ग दाखवू लागतात. ज्या समाजात पुण्याई नसते त्या समाजाचा नाश होतो. परचक्र व अत्याचार अशा गोष्टी त्या समाजाचे जीवन अशक्य

करतात. त्यात कमजोर वर्ग जसे स्त्रिया, मुलं, वृद्ध जास्त त्रासात जातात. म्हणून पुण्य करणे हे चांगले असते. ते समाजातील लोकांचे पुण्य त्या समाजाला सावरण्यास मदत करते. ज्या समाजात लोकांची प्रवृत्ती पुण्य कारक आहे त्या समाजावर अशी दुःखाची वेळ कधी येत नाही. त्यांच्यात कोणी ना कोणी बलवान पुढे येतो व ब्राह्माचे कार्य राजा बनून करू लागतो. पितरांना श्राद्ध करणे, विद्वान लोकांचा आदर करणे, दान करणे, गुणीजनांचा सन्मान करणे असे ज्या समाजात होत असते तेथे अशी परिस्थिती उत्पन्न होत नाही. ह्या विश्वाची निर्मिती करणार्या ब्रह्माला असे अभिप्रेत असते कीं, नेहमी चांगला राजा राज्य करील.

भिष्म पुढे युधिष्ठीराला सांगतात, एवढे सांगितल्यावर नारायण जे इंद्राच्या रुपात आले होते मंधत्रीकडे, त्यांच्याबरोबर मरुत होते. प्राचीन काळांपासून असे कर्तव्य क्षत्रियांसाठी देवांनी सांगितले आहे. जसे आंधळा त्याची वाट शोधू शकत नाही त्याप्रमाणे राजा नसलेला समाज बरबाद होत असतो. तुझ्या दैवांने तुला राजाचे काम दिले आहे तरी ते तू योग्यप्रकारे करून ब्रह्माचे आशिर्वाद प्राप्त करावेस हेच तुझ्यासाठी श्रेयस्कर आहे.

शांती पर्व भाग चौसष्ठावा संपला.

# शांती पर्व

## भाग पासष्ठावा

युधिष्ठीर विचारतो, मला त्या चार वर्णांच्या कामाबद्दल आणखीन माहीती तुम्ही सांगाल तर बरे होईल.

भिष्म सांगतात, माणसाला त्याच्या सत्बुद्धिने त्याचे काम काय ते उपजत ज्ञानामुळें जन्मतः ज्ञात असते. परंतु, तो चुकीच्या प्रेरणेने दुषित बुद्धी झालेला त्यांपासून दूर जात असतो. तुलासुद्धा ते सगळे चांगलेच ठाऊक आहे. जो राजा त्याच्या लोभात, मोहात अडकत नाही तो राजा चांगले कार्य करत असतो. तसा राजा एकाद्या भिक्षू सारखा असतो. तो सगळ्यात असूनही कशातही नसतो. जसा इंद्र अप्सरात असूनही त्यांच्यामध्ये नसतो. गृहस्थाश्रमात असलेल्या पुरूषाला आत्मसंयम, मनाची स्थिरता, वेदातील तत्त्वांची जाण, काय योग्य व काय अयोग्य ते समजण्याची बुद्धी असें सगळे असावे लागते. जो राजा सत्पात्र दानं करतो व योग्य इसमांचे ऐकतो तो भिक्षू प्रवृत्तीचा समजावा. ज्याने ते साध्य केले ते नंतर वानप्रस्थाश्रमी जाऊ शकतात. जो राजा त्याच्या पितरांना शिधा देतो व इतर शक्तींची सुद्धा सन्मानपूर्वकपणे श्रद्धेने पुजा करतो तो सुद्धा वानप्रस्थाश्रमी जाण्यास योग्य असतो. जो राजा इतर वाईट राजांचा पराभव करून त्याच्या प्रजेला सुखी करतो तोसुद्धा त्यासाठी योग्य समजला जातो. जितक्या प्राण्यांना त्याने वाईट शक्तींपासून संरक्षण दिले तितके पुण्य त्याला लाभत असते. त्यानंतर तो राजा संन्यासाश्रमी जाऊ शकतो. तेथे तो अध्यात्मविद्या वेदांतून शिकत रहातो त्यासाठी तो इतर ऋषीमुनी ह्यांच्या सानिध्यात वनात रहातो. राजा नेहमी ब्रह्मचर्य पालन करणारा असा पाहिजे. जो राजा त्याच्या वासनांत लिप्त रहातो तो भ्रष्ट क्षत्रिय समजला जातो. जो राजा त्याचे गुरूने दिलेले मंत्र शांतपणे कोणाला समजणार नाही अशाप्रकारे जपत असतो सदैव तो चांगला गृहस्थाश्रमी ठरतो. जो राजा चांगल्याच्या संरक्षणासाठी युद्ध करतो व प्रसंगी प्राण देतो तो वानप्रस्थाश्रमी गेला असे समजले जाते. जो राजा त्याच्या सत्तेचा दुरूपयोग करत नाही आणि सगळ्या चरांचराशी आत्मियतेने व्यवहार करतो तो सर्व आश्रम केल्या सारखा असतो. जो राजा दीनदुबळ्यांबद्दल आस्था बाळगतो तो ब्रह्माला अतिप्रिय असतो. त्याचा

गृहस्थाश्रम उत्तम झाला असे समजले जाते. घरातील सगळ्यांशी जो न्यायाने वागतो व त्यांच्यात कमी जवळचा, जास्त जवळचा असा भेद करत नाही तो उत्तम गृहस्थाश्रमी समजले जाते. जो गृहस्थाश्रमी सन्यासी व वानप्रस्थाश्रमींना घरी बोलावून त्यांचा सन्मान करतो त्याचा गृहस्थाश्रम उत्तम झाला असें समजले जाते. जो त्याची सगळी कर्तव्ये व्यवस्थितपणे पार पाडतो त्याने त्याचे सगळे आश्रम योग्यप्रकारे केले असें समजले जाते. जो राजा न भिता त्याची सगळी कर्तव्ये पार पाडतो त्याने सगळे आश्रम केले असें समजले जाते. असे समजतात कीं, गृहस्थाश्रम सर्वात श्रेष्ठ असतो कारण तो ब्रह्माचा आश्रम आहे. सर्व प्राणिमात्रां प्रती सारखीच आस्था बाळगणारा ब्रह्माला फार आवडतो. जो त्याचे निर्णय सारासार विचार करून घेतो तो उत्तम गृहस्थाश्रमी ठरतो. चांगुलपणाच्या बुरख्याखाली लपून काम करणारे पापमय कृत्य जो राजा बरोबर हुडकून काढतो तो त्याच्या गृहस्थाश्रमात यशस्वी ठरतो. वाईटपणात लपलेले पुण्य कृत्य जो ओळखतो व त्याची दाद देतो तो खरा राजा समजला जातो. कोणत्याही कृत्याचे वरकरणी लक्षणावर न जाता जो राजा त्या कृत्यामागील अंतस्थ उद्देश समजून ते लक्षात घेतो तो राजा चांगला समजला जातो. वनात राहून तपस्या करणार्यापेक्षा राज्य कारभार सांभाळून प्रजेची सेवा करणारा ब्रह्माला जास्त प्रिय असतो. मी तुला सगळी चांगली व वाईट लक्षणं त्या चार आश्रमांची सांगितली आहेत. त्यातील त्यांच्या कर्तव्याची सुद्धा माहिती सांगितली आहे. ज्याप्रमाणे महान राजर्षी त्यांचे जीवन जगत होते प्राचीन काळी. त्याप्रमाणे तू तुझे कर्तव्य करून मोठ्या योग्यतेला जा, असें मी तुला सांगत आहे.

शांती पर्व भाग पासष्ठावा संपला.

# शांती पर्व

## भाग सहासष्ठावा

युधिष्ठीर बोलतो, आपण मला सगळे सांगितले आता त्यातील महत्वाची कर्तव्ये कोणती ते सांगा.

भिष्म सांगतात, राज्याभिषेक हा राजाच्या जीवनातील महत्वाचा भाग असतो. जर राजा कमजोर झाला तर चोर, डाकू वाढतात. कमजोराला बलवान त्रास देऊ लागतो. लुच्चे साध्या लोकांना फसवू लागतात. चांगुलपणा कमी होतो. माणूसकी रहात नाही. वेदाच्या शिकवणीचा विसर पडतो. त्या करता राजाची अधिकृत नेमणूक होणे आवश्यक असते. राजाच्या गुणवत्तेवर राज्याचे संरक्षण अवलंबून असते. शत्रू लांब रहातात. सल्लागार चांगले काम करतात. राज्यात अराजक होत नाही. अराजक हे सगळ्यात वाईट असते राज्यासाठी व राजासाठी. राजा बलवान असला कीं, सगळे वचकून रहातात. राजाचे बळ त्याच्या सल्लागारांच्या शहाणपणावर, सैन्याच्या शौर्यावर आणि हुशार वैश्यांच्या धन मिळवण्यावर अवलंबून असते. ते तीन जर आपापली कामं योग्यप्रकारे करत असतील तर राज्य मजबूत रहाते. राजा शूर असावा परंतु, क्रूर नसावा. त्याचा न्यायाचा चाबूक लोकांत शिस्त व धाक उत्पन्न करणारा असला पाहिजे. अशावेळी सामान्य जनांना एकत्र येऊन वाईट काम करणार्यांचे निर्दालन करावे लागते. त्यातून नवीन राजा जो चांगले राज्य करील असा तयार होतो. हि प्रक्रीया अनंत काळ मानव समाजात होत असते. राजात इंद्राचे गुण आहेत कीं नाहीत ते सामान्य जनाने पहावयाचे असते. त्याबद्दल एकदा भिष्म मनूला विचारतात, अशावेळी कसे राज्य करावयाचे. मनू सांगतो कीं, ते फार अवघड आहे, सांगणे सोपे नाही. कारण मनुष्य कलीच्या आहारी लवकर जात असतो. चांगली माणसं वाईट होऊ शकतात ते थांबवण्यासाठी तत्त्वनिष्ठ लोक समाजात असावे लागतात. ज्यांच्यातून नवीन राजा उत्पन्न होत असतो. पुढे भिष्म सांगतात, लोक राजाला सांगतात कीं, ते त्यांच्या कमाईतील पांचवा भाग राजाला देतील त्यामुळे राजा चांगले राज्य चालवू शकेल. त्याच प्रमाणे शेतकरी त्यांच्या पिकाचा दहावा भाग राजाला देतील व राजाची ताकद वाढवण्यास मदत करतील. तसे झाले कीं, राजा सैन्य सांभाळू शकेल व राज्यात

वाईट लोकांना आवरू शकेल. सगळे चांगले लोक एकत्र येऊन राजाची मदत करतील कारण त्यात त्यांचे भले होणार असते. असे झाले कीं तो राजा शक्तीमान होईल व राज्यात अराजक येणार नाही. त्याच प्रमाणे जनतेच्या पुण्याचा चवथा भाग ती राजाला देईल त्यामुळे राजाचे पुण्य सुधारेल. राजा यज्ञ करून देवतांना प्रसन्न करून त्याची अध्यात्मिक शक्ती वाढवेल. अशारितीने लोक मनूला आश्वासन देतात. त्याप्रमाणे लोक मनूला सांगतात कीं, ते त्यांची ठरलेली कामं नित्य नियमाने करतील. म्हणून अरे युधिष्ठीरा, ज्या लोकांना चांगला राजा असावा अस वाटते ते स्वतः त्यांच्या कर्तव्याकडे चांगले लक्ष देतील. जर लोक चांगले वागत असतील तर त्या राज्याचा राजा चांगले राज्य करू शकतो. म्हणून चांगले संस्कार समाजात रुजवण्याचे काम शहाणे लोक (ब्राह्मण) करतील. चांगला राजा नेमल्यानंतर त्याच्या आज्ञांचे पालन लोकांने करावयाचे असते. प्रजा व राजा एकमेकांना पुरक असावे लागतात तरच चांगले राज्य बनू शकते. त्यासाठी राजाचा खास दर्जा राखावा लागतो. परंतु, त्यामुळे राजा मातून गेला नाही पाहिजे. हेसुद्धा तितकेच महत्वाचे आहे. असे सगळे योग्य मर्यादित जमले कीं, तो राजा लोकांना सुखी ठेवू शकतो. राजा लोकांचा मान राखील व लोक राजाचा मान राखतील असे राज्य बलवान होते.

शांती पर्व भाग सहासष्ठावा संपला.

# शांती पर्व
## भाग सदुसष्ठावा

युधिष्ठीर पुढे बोलतो, "अहो पितामह, मला सांगा, ब्राह्मण राजाला माणसातील देव असें कां बोलतात"?

भिष्म सांगतात, ह्याकरता मी तुला एक प्राचीन कथा सांगतो, त्यात बृहस्पती आणि वासुमानस ह्यांच्यातील संभाषण ते समजून घे. तो कोसल देशाचा राजा होता. खूप बुद्धिमान होता, एका प्रयोजनाच्या वेळी तो ऋषी बृहस्पतींना विचारतो, त्यात माणूसकी, नम्रता, ह्यावर तो कांहीं स्पष्टीकरण त्यांना विचारतो. त्यात राजाने त्याच्या प्रजेच्या सुखासाठी काय करावे त्याबद्दल विचारणा असते. वासुमानस बोलतो, अहो ज्ञानी, मला सांगा कोणत्या कारणांने प्राणी वाढतात व अखेरीस मरतात ते मला समजून घ्यावयाचे आहे. असे काय केले म्हणजे त्याला अंतिम चिरंतन सुख प्राप्त होईल. कोसलच्या राजाचा तो प्रश्न ऐकल्यावर बृहस्पती शांतपणे सांगतात, माणसाच्या सगळ्या कर्तव्याचे मूळ राजाच्या कर्तव्यात असते. राजाला घाबरुन लोक इतरांशी चांगले वागतात. राजांमुळे समाजात शांतता राखली जाते. त्यामुळे समाजात सौहार्द्य नांदत असते. लोक त्यांच्या वासना काबूत ठेवतात. जसे सूर्यामुळें सगळे एकमेकांना पाहू शकतातच तसेंच राजामुळे सगळे लोक एकमेकांशी मर्यादेने वागत असतात. फार थोडे असे असतात ते राजा नसला तरी चांगले वागतील, बहुतेक माणसे रजोगुणी व तमोगुणी असल्यांने ते होत असते. जर समाज सगळा सात्त्विक लोकांचा असेल तर राजा नसला तरी चालते परंतु, समाज बहुतेक रजोगुणी व जास्त करून तमोगुणी असल्याने राजा असावा सागतो. राजाच्या भितीने सगळे आपापल्या मर्यादा राखत असतात. त्यांमुळें सामान्य जनता सुखी राहत असते. नाहीतर अराजक सुरू होऊ शकते. जसे गुरांच्या कळपाला राखण्यासाठी गुराखी आवश्यक असतो तसेंच हे आहे. समाजात कमजोर लोक खूप असतात त्यांच्या संरक्षणासाठी राजा महत्वाची भूमिका बजावत असतो. नाही तर बळी तो कान पिळी असे झाले असते. पण राजाच्या शक्तीला वचकून ते शक्तीमान नीट वागत असतात. राजा न्यायासाठी मर्यादा ओलांडणार्यांना शिक्षा करत असतो. राजाच्या कृपेमुळे वैश्य व शुद्र

त्यांचे व्यवसाय करत असतात. कोणी त्यांना हात लावू शकत नाही. कोण त्याच्या मुलांना हात लावत नाहीत. कोण त्यांच्या संपत्तीला, बायकोला हात लावण्याचे धाडस करत नाही. कारण राजाचा न्यायाचा चाबूक त्या जनसामान्यांचे संरक्षण करत असतो. जसे देव त्याच्या भक्तांचे संरक्षण करतो तसे राजा त्याच्या प्रामाणिक (भक्त) जनतेचे संरक्षण करत असतो. म्हणजे एका अर्थी तो त्या जनतेचा देव झाल्यासारखेच असते. वाईट माणसे राजाच्या न्यायाच्या कठोर चाबकाच्या फटक्यांना घाबरून सज्जन बनत असतात. समाजातील सज्जन लोक शांतता प्रेमी असतात त्यांना त्याप्रमाणे जगणे अशक्य होईल. तपस्या करणारे, विद्याभ्यास करणारे, ब्रह्माच्या शोधात असलेले यति व साधू त्यांच्या तपस्या शांतपणे करून शकणार नाहीत जर राजाचा न्यायाची चाबूक कार्यरत नसेल. जसे पिता त्याच्या मुलांचे संरक्षण करतो त्याप्रमाणे राजा त्याच्या प्रामाणिक जनतेचे सरक्षण करत असतो. वृद्ध, आजारी, विकलांग, अशक्त, स्त्रिया, बुद्धीहीन अशा कमजोर जनतेच्या संरक्षणाची जबाबदारी राजाच्या बळावर असते. शुद्रांचे, वैश्यांचे संरक्षण भ्रष्ट क्षत्रियांपासून करण्याचे काम राजा करत असतो. राजा नसेल तर कोणी त्याच्या मालमत्तेचे संरक्षण करू शकणार नाही. असुरक्षितता व त्यातून अराजक सगळीकडे पसरते. सर्व नष्ट होते. खाजगी जीवन शक्य होणार नाही. ते सगळे राजामुळे शक्य होत असते. कोणी यज्ञ करू शकणार नाही. कोणी दानं करू शकणार नाही. वेदाचा अभ्यास करणे अशक्य होईल. धर्म रहाणार नाही. प्रत्येक मनुष्य स्वताचे संरक्षण करू शकत नाही. समाजाची संस्कृती, रितरीवाज, धर्म सगळे राजाच्या संरक्षणामुळे शक्य होत असतात. ते सगळे अशक्य होईल. सगळे लोक चोर होण्यात शहाणपण मानून त्या प्रमाणे वागू लागतील. निती नियम रहाणार नाहीत. अन्यायाचे राज्य पसरेल, कली मातून सगळीकडे थैमान घालत सुटेल. अशा राज्यातून सगळे निघून जाण्याच्या तयारीत असतील. वर्णसंकर होऊन वर्ण व्यवस्था संपुष्टात येईल. कोणीही त्यांचा उद्योग व्यवस्थितपणे करू शकणार नाही. सगळे स्वताचे व त्याच्या आप्तांचे संरक्षण करू शकत नसतात त्यांना राजा आवश्यक असतो. समाजात चांगुलपणा, माणूसकी, भूतदया ह्या उत्तम गुणाच्या विकासासाठी राजा आवश्यक असतो. मोक्ष प्राप्त करण्यासाठी तपस्या करणारे तपस्या करू शकणार नाहीत जर राजा नसेल तर. माणसे एकमेकांना ठार मारण्यात आपला वेळ घालवत असतील कारण स्वताचे संरक्षण

करावे म्हणजे दुसर्याची बळी घ्यावयाचा असा नियम होईल. समाजातील गुणीजन बहुधा कमजोर असतात ते नष्ट होतील, समाज गुणहीन होईल. चांगल्या राजाच्या छत्रछायेखाली सगळे सुखाने राहू शकतात. म्हणून राजा समाजाचा मोठा हिस्सा समजला जातो. त्याच कारणाने राजाचे अधिकार व सत्ता सज्जन समाजासाठी आवश्यक असते. चांगला राजा शहाण्या लोकांना त्यांचे अधिकार व कार्य आखून देतो व त्यामुळे मूर्ख लोक त्यांच्या आगाऊगिरीने समाजाचे नुकसान करू शकत नाहीत. दुर्गुणी लोक धूर्त असतात ते समजतात कीं राजा जागृत आहे तेव्हां आपण गडबड करून चालणार नाही. त्यांमुळे समाजात शांतता रहाते. दुर्गुणी बुद्धीमंत त्यांच्या कारवाया करण्यास धजत नाहीत कारण राजाचे सद्गुणी बुद्धीमंत त्यांना शह देण्यासाठी सज्ज असतात. अशा मुळे सामान्यपणे राजा सगळ्यांना आवश्यक असतो. राजा सज्जन, सद्गुणी, चतूर, दूरदृष्टी असलेला असावा लागतो. तसा राजा कलीच्या सगळ्या हालचाली ओळखून त्यांचा बंदोबस्त करत असतो. प्रजेला काळजी करावी लागत नाही. चांगला राजा दुर्जनांचे नियंत्रण व सज्जनांचे संरक्षण करून त्याच्या राज्याला ताकदवान करत असतो. अशा परिस्थितीत जे दुर्गुणी लोक राजाला आव्हान देतात त्यांना राजा नष्ट करत असतो व सगळीकडे शांतता प्रस्थापित करत असतो. राजाला विविध रुप असावी लागतात. ती अशी अग्नी, वैश्रावण, यम, आदित्य, मृत्यू आहेत. राजाला फसवणार्याला तो अग्नी बनून जाळून टाकतो, त्याच्या हेरांकडून माहीती मिळाल्यावर तो योग्य बंदोबस्त करतो त्याच्या लोकांच्या संरक्षणासाठी तेव्हां तो आदित्य असतो, दुर्जनाना शिक्षा करून तो यम बनतो, चांगल्या गुणी लोकांचे तो कौतुक करतो तेव्हां तो वैश्रावण (कुबेर) असतो. जे सुधारणे शक्य नाही त्यांना तो मारून टाकतो त्यावेळी तो पुन्हा मृत्यू झालेला असतो. ते पांच देव जे येथे दिले आहेत ते मानवाची सृष्टी चालवण्यासाठी आवश्यक समजले आहेत. त्यांना लोकपाल देवता म्हणून सांगितले आहेत. त्या सगळ्या चांगल्या राजात असाव्या लागतात व योग्य समई त्या त्यांची रुपं राजा मधून दाखवत असतात. ज्या राजांत ते आहेत तो राजा चांगला राजा समजला जातो. चांगल्या राजाला सगळ्यांनी सहकार्य करावे असे संकेत आहेत. तशा राजाच्या संपत्तीत कोणालाही हक्क नसतो. आपले राज्य समृद्ध व्हावे असे वाटणारे सगळे लोक चांगल्या राजाला नेहमी मदत करतात कारण, त्यात त्यांचा स्वार्थ असतो. चांगला

राजा त्याच्या राज्यातील सगळ्या शहाण्या, गुणी लोकांचा सत्कार करतो. त्यांना त्यांचे मानाचे स्थान न मागता देतो त्या मार्गाने राजा त्या विद्वान लोकाच्या गुणाचा त्याच्या कामात उपयोग करत असतो. चांगला राजा त्याच्या प्रजेची सेवा करून जे पुण्य मिळवतो त्यामुळे तो कायम स्वर्गात जातो व इंद्रा बरोबर रहातो.

कोसलचा राजा वासुमानस बृहस्पती कडून चांगल्या राजाबद्दलचे निरुपण ऐकल्यावर त्याप्रमाणे राज्य करून स्वर्गात जातो.

शांती पर्व भाग सदूसष्ठावा संपला.

# शांती पर्व
## भाग अडूसष्ठावा
युधिष्ठीर विचारतो, "राजा शत्रूंपासून त्याच्या राज्याचे संरक्षण कसे करतो. त्याला त्या कामात गुप्तहेर कसे मदत करतात. राजाने चार वर्णाच्या लोकांचा विश्वास कसा मिळवावयाचा असतो. तो त्याच्या नोकरांचा विश्वास कसा मिळवतो? तो त्याच्या स्वताच्या परिवाराचे मन कसे जिंकतो? मला ते सगळे सांगा".

भिष्म सांगू लागतात, मी जे सांगत आहे ते नीट ऐक. राजाच्या विविध कामांची माहिती सांगत आहे. राजाने प्रथम स्वताचे वासनांचे नियंत्रण करावयाचे असते. त्यानंतर तो इतरांना वळण लावण्यासाठी योग्य होईल. तो त्याच्या राज्यातील दुर्जनांचे नियंत्रण करील, त्यानंतर तो बाहेरील शत्रूंचे नियंत्रण करेल. राज्यातील दुर्जनांच्या नियत्रणासाठी तो उत्तम प्रशिक्षित शिपाई दल तयार करेल जे राज्यातील वाईट लोकांवर चांगले लक्ष देतील व त्यांच्या सगळ्या हालचालींचे नियंत्रण करतील. ज्यामुळे राज्यातील शांतता प्रेमी जनता सुखाने राहू शकेल. त्यासाठी नेमलेले शिपाई तशा लोकांच्या वस्त्यांवर लक्ष ठेवतील. राज्यातील पापी लोकांवर लक्ष ठेवण्यासाठी तो गुप्त हेर तयार करेल जे कोणाला समजणार नाही अशा प्रकारे त्या दुर्जनांच्या हालचालींवर लक्ष ठेवून त्यांचे नियंत्रण करतील. त्या करता नेमलेले लोक चांगले हुशार असतील. आंधळ्याची, बहिरे असल्याची सोंग घेऊन ते कधी भिकारी म्हणून तर कधी बैरागी म्हणून ते समाजात वावरत असतील. ते सगळे हेर फार चतूर असले पाहिजेत व त्यांचे राजावर प्रेम असले पाहिजे. राजा त्यांना चांगले वागवेल व त्यांचा विश्वास प्राप्त करेल. असे हेर तो त्याच्या सगळ्या गांवात, प्रांतांत नेमून दुर्जनांवर लक्ष ठेवेल. त्यामुळे त्यांना पकडणे व शिक्षा करणे शक्य होईल. असे हेर सार्वजनिक ठिकाणी असतील व ते लोकांत काय बोलचाल होत आहे ते समजून त्याची इत्तंभूत माहिती राजाला देतील. ते स्थानिक व परदेशी अशा सगळ्या लोकांवर लक्ष देतील. परंतु, कोणाला ते हेर आहेत हे मात्र समजणार नाही ह्याची दक्षता ते घेतील. ते हेर असे नेमले जातील कीं, ते एकमेकांनासुद्धा ओळखत नसतील. ते फक्त राजाकडे त्यांची माहिती पोहोचवतील. राजा त्याच्या चलाख दूतांच्या मदतीने बाहेरील राजांचे त्याच्या

राज्यात टेहाळणी करण्यासाठी आलेल्या हेरांना हुडकून काढण्याचे काम सुद्धा करतील. ज्या राजाचे हेर खाते चांगले तो राजा नेहमी यशस्वी ठरतो. खड्या सैन्यापेक्षा बर्याच वेळा हे हेर जास्त मोलाचे काम करत असतात. म्हणून त्यांचे महत्व जो राजा ओळखतो तो शहाणा राजा समजला जातो. त्या कामात वैश्य, शुद्र असे सगळे लोक राजा वापरत असतो. राजाचे हेर दुसर्या राज्यात सुद्धा असतील व ते त्या राज्याच्या परिस्थितीबाबत माहीती राजाला पुरवत असतील.
राजा त्याच्या पेक्षा शक्तीमान असलेल्या इतर राजांशी मित्र संबंध प्रस्थापित करेल. त्यासाठी रोटीबेटी असे नाते संबंधी धोरण तो अंगिकारेल. त्याच वेळी तो त्याची ताकद वाढवण्यासाठी प्रयत्न करत असेल. राजा शेजारील राज्यात स्वताच्या चांगल्या कारभाराची जाहिरात अशी करेल कीं, त्या देशांच्या जनतेला त्याच्या बद्दल प्रेम वाटू लागेल. त्याच्या राज्यातील दुर्जनांचे काय वळण आहे ते पाहून त्यांचे वळण जर राज्याच्या भल्याचे नाही असे दिसले तर तो राजा त्या दुर्जनांचा नाश करील. ह्या गोष्टी अगदी गुप्तपणे केल्या जातील. ज्यांच्यापासून धोका नाही व फायदासुद्धा नाही अशांकडे राजा फार लक्ष देणार नाही. प्रथम शेजारील राज्यातील प्रजेचे मन जिंकल्यावर राजा त्या राज्यावर आक्रमण करून ते राज्य काबिज करण्याच्या योजना आखेल. ज्या राज्यावर आक्रमण करावयाचे त्या राज्यातील महत्वाचे राजकर्ते तो राजा खुबीने मारून टाकील ज्यामुळे त्या राज्याची ताकद कमी होईल. त्याकरता तो राजा षडयंत्रांचा, कारस्थानांचा उपयोग करणार. स्वताच्या राज्याचे विशेष करून त्याच्या राजधानीचे संरक्षण पक्के केल्यानंतरच तो राजा परकीय राज्यावर चालून जाईल. इतर राजाना समजणार नाही अशाप्रकारे तो त्याच्या कारवाया करणार. राजा दुसर्या राजाचा मांडलीक म्हणून जास्त काळ रहाणार नाही. कारण त्यामुळें त्याची ताकद कमी होत असते. त्याच्या पेक्षा प्रबळ असलेल्या राज्यात दुफळी माजवून तो ते राज्य कमजोर करून मग त्यावर चाल करून जाईल. राजा त्याच्या शस्त्रबळांत सुधारणा करण्याचा सातत्याने प्रयत्न करत असेल. एकादा प्रदेश जिंकण्यामुळे त्याला काय फायदा होणार त्याचा तो राजा चांगला अभ्यास करेल. जर त्याला समजले कीं, तो प्रदेश घेण्यात कांहींच फायदा नाही तर राजा तो प्रदेश जिंकण्यासाठी प्रयत्न करणार नाही. दुसर्या राज्यातील गुणीजनाना त्याच्या राज्यात तो

बोलावेल व त्यांना स्थीर करेल ज्यामुळे त्याच्या राज्याची गुणवत्ता सुधारेल. युद्धापेक्षा इतर मार्गाने तो त्याच्या राज्याच्या सीमा वाढवेल त्यासाठी तो तीन प्रकारच्या मार्गांचा वापर करणार, त्यात समझौता, दान करणे अथवा घेणे आणि भेदनिती असे ते असतील. तशाने मिळणारे राज्य त्याला जास्त फायद्याचे असते. कारण, त्यात मनुष्यहानि होत नाही व त्याचा खर्चसुद्धा फार नसतो. राजा भ्रष्ट शासकीय अधिकार्याचे धन काढून त्यांना शासन करील, त्याशिवाय त्यांना राज्या बाहेर घालवूनसुद्धा तो ते साध्य करू शकतो. राजा त्याच्या प्रजेकडे असे पाहिल जसे एक चांगला पिता त्याच्या पाल्यांकडे पहातो. परकीय शत्रूंपेक्षा राज्यातील दुर्जन राजाला जास्त धोकादायक असतात म्हणून त्यांच्या सगळ्या हालचालींवर राजा बारीक नजर ठेवून असेल त्याच्या गुप्त दूतांच्या सहाय्याने. राज्याबाहेरच्या जगात काय होत आहे त्यावर राजा त्याच्या वैश्य आणि प्रवासी तसेंच हेर ह्यांच्या मदतीने सगळी माहिती काढत असेल. परदेशांत व्यापारासाठी जाणारे त्याचे वैश्य त्याला ती माहिती सांगत असतील. परदेशांतून येणारे व्यापारी राजा भेटेल व त्यांच्या कडून त्यांच्या देशाची माहिती काढील. देशाची संपत्ती त्यातील खनिजं, क्षार, कृषी उत्पन्न, कलाकुसर, तंत्रविज्ञानिक शोध आणि बुद्धी अशा पांच गोष्टीत असते. त्यासाठी राजा त्या सगळ्यांचा चांगला विकास कसा होईल त्यावर लक्ष देईल. त्याचे व्यवस्थापन चांगले ठेवण्यासाठी उत्तम बुद्धी असलेले विद्वान लोक तो नेमेल. त्याच्या व्यवस्थापनासाठी राजा योग्य नियम अमलात आणेल. न्याय व्यवस्था चांगली चोख असली पाहिजे त्यासाठी राजा विद्वान लोकांना न्यायाधीश म्हणून नेमेल. न्याय व्यवस्था बिघडवणारे भ्रष्ट बुद्धी असलेले चतूर लोक असतात त्यांच्या सगळ्या कारवायांवर राजा चांगले लक्ष ठेवून ते त्यांच्या चतूराईने न्याय व्यवस्था भ्रष्ट करण्याचे काम कसे करत आहेत किंवा कसे, ते त्याचे बुद्धीमान कारभारी चांगले लक्ष देऊन पाहतील. वेळप्रसंगी त्यांचा नायनाट करून राजा सुव्यवस्था प्रस्थापित करील. राजा स्वतः चांगला बुद्धीमान असला पाहिजे. तो वेद, उपनिषद अभ्यासलेला असला पाहिजे. तो ब्रह्मचारी असला पाहिजे. तपस्या आणि दानधर्म करणारा असला पाहिजे. जो राजा त्याच्या राज्यकारभारात चांगले लक्ष देत नाही तो रसातळाला जातो.

कोणी प्रबळ राजा त्याच्यावर चाल करून आला तर राजाला ते आव्हान स्वीकारावे लागते. त्याकरता साम, दंड आणि भेद निती त्याला वापरावयाची असते. चांगल्या राजाला त्याच्यावर येणार्या आक्रमणाची माहिती त्याच्या हेरांकडून आधी मिळणे आवश्यक असते तितके त्याचे हेरखाते सक्षम असले पाहिजे. राजा त्याच्या दोस्त राष्ट्रांना एकत्र घेऊन त्याच्या परकिय धोरणांचे व्यवस्थापन करणारा असेल. प्रजेच्या संरक्षणासाठी राजा त्यांचे व्यवस्थापन असे करत असेल कीं, जर आक्रमण झाले तर जनता मारली जाणार नाही. त्यांचे तो व्यवस्थापन प्रसंगी वनात करून त्यांना संरक्षण देईल. राज्यातील गांव, खेडी रस्त्याच्या दुतर्फा वसवलेली असतील. त्यामुळें त्यांचा संपर्क करणे सोपे असेल. राजाचे सगळे धन व धान्य त्याच्या चांगला बंदोबस्त असलेल्या किल्ल्यात, गढींमध्ये अशा सुरक्षित ठिकाणी करील. शत्रूच्या हाती धान्याचे साठे न जावे म्हणून राजा प्रसंगी ते जाळून टाकील. ज्यांमुळे शत्रूला ते मिळणार नाहीत. नद्यावरील पुल तो तोडून टाकेल त्यांमुळे शत्रू त्याच्या राज्यात येऊ शकणार नाही.  शत्रूचे आक्रमण जोरदार असेल तर राजा प्रसंगी सगळ्या पाण्याचे साठे फोडून टाकील ज्यामुले शत्रूला पाणी मिळणार नाही. राजकीय धोरणाचा भाग म्हणून राजा त्याच्या शत्रूच्या शत्रूशी दोस्ती करील. त्यामुळे त्याची ताकद जास्त होईल. प्रसंगी शत्रूच्या वाटेवर असलेल्या तळी, विहीरी ह्यांच्यात विष घालून ते जहरी करून त्याद्वारा शत्रूचा नाश करण्याचे धोरण राजा वापरेल. शत्रूला इंधन मिळू नये म्हणून तो वाटेतील सगळी झाड छाटून टाकील फक्त चैत्य वृक्ष (औदुंबर) तो कांपणार नाही. त्याच्या किल्ल्याची तडबंदी तो उंच करून त्यावरून चढून येणे अशक्य करील. किल्ल्याभोवती असलेल्या चरातील पाण्यात तो सुसरी, मगरी असे हिंसक जलाचर सोडेल त्यामुळे शत्रू त्यातून किल्ल्याकडे जाऊ शकणार नाही. किल्ल्याच्या तटांवर शतघ्नी आणि तशा मोठ्या प्रमाणांत मारा करणार्या शस्त्रांची व्यवस्था असेल. किल्ल्यात धान्याचा, शस्त्रांचा व पाण्याचा साठा पुरेसा केलेला असला पाहिजे. राज्यातील सगळी घर जी गवतांची, लाकडांची आहेत त्यांना मातीचा थर असला पाहिजे असे नियम करेल ज्यामुळे ती सहजपणे जळणार नाहीत. गवतांचे, लाकडाचे साठे एका जागी न ठेवता ते तो विभागून असे ठेवेल कीं, त्याना आग लावणे सोपे नसेल. त्या साठ्यांवर पाणी शिंपून ते भिजलेले रहातील असे केले जाईल. त्या काळात राज्यातील भिकारी, हिजडे, विदूषक

राज्याबाहेर काढले जातील. राज्यातील तीर्थक्षेत्रे, बाजाराच्या जागा, करमणूकीची ठिकाणे अशा जागी त्याचे हेर असतील व ते राजाला शत्रूची माहिती सांगत असतील.

राजा त्याच्या राज्यात गांव जोडण्यासाठी रुंद हमरस्ते बांधून काढील ते दगडाचे असतील ज्यांमुळे त्यांची उपयुक्तता बराच काळ असेल. रस्त्याच्या दुतर्फा अंतरा अंतरावर प्रवाशांना विश्रांती घेता यावी म्हणून विशी (हॉटेल) उघडण्याची परवानगी तो देईल, त्याच प्रमाणे खाण्याची व पिण्याची व्यवस्था करण्यासाठी शूद्रांना व वैश्यांना उत्तेजन देईल. राज्यात शस्त्रे निर्माण करणारे शिकलगार व सुत लोक तो आणून त्यांचे बस्थान उत्तम करील ज्यांमुळे त्याचे शस्त्रागार संपन्न असेल. सैनिकांना प्रशिक्षण देण्यासाठी गुरूकूल तो उघडेल. त्यातून राज्यात शूरवीरांची परंपरा सुरू होईल. घोडे, हत्ती, बैल ह्यांची चांगली पैदास करण्याचे काम तो पशूवैद्यांकडून करून घेईल. शेती कामाची अवजारं तयार करणारे कारखाने तो सुरू करील. त्याशिवाय इतर अनेक उपयुक्त वस्तूंचे उत्पादन तो करण्यासाठा कारागिरांना उत्तेजन देईल. लोकांच्या करमणूकीच्या जागा तो तयार करील त्यातून लोक त्यांचा विश्राम करू शकतील. लढण्यासाठी आवश्यक असलेल्या सगळ्या सामुग्री त्याच्याच राज्यात पैदा करण्याचा त्याचा आग्रह असला पाहिजे. विविध प्रकारची विष तो तयार करण्याचे उद्योग सुरू करील कारण ते शत्रूचा नाश करण्यासाठी जास्त सोपे मार्ग असतात. शत्रू राज्यात शांततेच्या काळात त्या शत्रूचे बलवान बुद्धीमंत विष प्रयोगांने तो मारून टाकील. बुद्धी ही सर्वात प्रभावी शक्ती असते ज्या राजाकडे चांगले बुद्धीमंत आहेत ते राज्य यशस्वी होत असते. म्हणून सर्व देशांतून राजा चांगले बुद्धीमंत बोलावून त्यांचे रहाण्याची व्यवस्था तो करील.

राज्याच्या आरोग्यासाठी तो उत्तम वैद्यांना त्याच्या राज्यात आश्रय देऊन त्यांचे स्वागत करेल. चांगल्या वैद्यकी शिकवणार्या गुरूकूलांची व्यवस्था करील. विविध उपयोगी औषधी राज्यात तयार करण्याची व्यवस्था तो करील. राज्यात त्यासाठी औषधी वनस्पतीच्या उपवनांची तो निर्मिती करील.

राजाला व त्याच्या सत्तेला धोका असलेले लोक तो मारीन टाकील. राजाला त्याच्या कामात मदत करणारे लोक तो उत्तेदन देऊन सांभाळेल. त्यांना दानं करून त्यांचे कौतुक करील. राजाच्या वैयक्तिक शत्रूला त्याच्या राज्याचा शत्रू मानले जाते व म्हणून त्यांचा नाश

करण्याने राजाला पाप लागत नाही. राजाची खरी ताकद त्याचे पुण्य असते. म्हणून राजा पुण्य कर्म करण्यात भर देईल. पुण्य, हित आणि सुख हे राजा स्वतासाठी व त्याच्या प्रजेसाठी मिळवत असला पाहिजे. असा राजा सर्वांनी प्रिय होतो. राजाची ख्याति सर्वदूर पसरण्याने त्याची ताकद वाढत असते व त्याचवेळी त्याच्या शत्रूंची संख्यासुद्धा वाढत असते. त्या राजाच्या राज्यात सगळे चांगले आणि वाईट लोक येऊ इच्छित असतात. म्हणून कोण त्याच्या राज्यात स्थाईक होण्यासाठी येत आहे त्यावर राजाचे हेर लक्ष ठेवतील. वाईट लोकांना राजा स्थाईक होऊ देणार नाही. ज्या राजातील प्रजा सुखी असते तो राजा इंद्र समजावा असे अंगिरसाचा मुलगा बृहस्पती सांगतो.

युधिष्ठीर विचारतो, "मला सांगा न्यायासाठी जे चाबूक वापरले जातात त्याबद्दल काय शास्त्रात सांगितले आहे. त्याच्या उपयोगाचे राजाला कोणते फायदे असतात व जनतेला कोणते असतात"?

भिष्म सांगतात, त्या चाबकाचे मोठे कार्य असते, कारण त्याच्या धाकामुळे सगळे आपापली काम व्यवस्थितपणे करत असतात. समाजाला शिस्त लागते. सुरूवातीला शिस्त आणण्यात थोडा त्रास होतो परंतु, यथावकाश लोकांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव होते व मग ते त्या चाबकाच्या भितीने नाही तर त्यांच्या जाणीवेने त्यांची काम मोठ्या प्रामाणिकपणे करू लागतात. कारण तसे केल्याने त्यांचा फायदा होत आहे ते त्या जनतेला समजू लागते. लोकांना संरक्षण मिळते त्या चाबकांमुळे, त्यामुळे त्याना तो चाबूक चांगला वाटू लागतो कारण तो राजाचा न्यायाचा चाबूक फक्त चूका करणार्यांना बाधत असतो. जेव्हां तो न्यायाचा चाबूक त्याचे काम करत असतो त्यावेळी कृतयुग अवतरते असे समजले जाते. जेव्हां तो काम करत नसतो तेव्हां कलीयुग अवतरते, म्हणून ही युगं राजाच्या काम करण्याच्या क्षमतेनुसार अवतरत असतात हे लक्षात असू दे. एकाच वेळी एका राज्यात कृतयुग असतांना दुसर्या राज्यात जेथे तो चाबूक काम करत नाही तेथे कलीयुगाचा अनुभव येत असतो. म्हणून अरे युधिष्ठीरा, कोणते युग तुझ्या राज्यात असावे ते तू ठरवत असतोस, हे लक्षात घे. चांगुलपणा, माणूसकी व भूतदया ही कृतयुगाची लक्षण मानली गेली आहेत. त्यांचा अभाव म्हणजे कलीयुग असे समजले जाते. पापशक्ती ह्या तीन गोष्टींचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करत असतात. त्यांना आवरण्यासाठी तो न्यायाचा

चाबूक असतो. त्यामुळे पुण्य वाढत जाते आणि सर्वकडे सुख शांती नांदू लागते. हा त्या चाबकाचा प्रभाव असतो. जसा त्या चाबकाचा प्रभाव कमी होतो त्रेतायुगाचा अनुभव येऊ लागतो. आणखीन कमी झाला की द्वापार युग अवतरते. जेव्हां चाबूक कमजोर होतो तेव्हा पापशक्ती जोरात येतात आणि कलीयुग अवतरते. तुझ्या राज्यात कोणते युग असावे असे वाटते ते तू तो चाबूक कसा वापरत आहेत त्यावर अवलंबून असते. **कलीयुगात शुद्र भिकारी बनतात, ब्राह्मण व्यापारी होतात, क्षत्रिय चोर होतात, वैश्य ब्राह्मणाचे सोंग घेऊन सगळ्यांना  फसवत असतात.** अशारितीने चार वर्ण भ्रष्ट होतात. वेदाचा अर्थ खोटा सांगितला जातो व त्याने लोकांना ते खोटे ब्राह्मण (वैश्य) समाजाला फसवत रहातात. ते कलीयुगात होते. राजा त्याचे काम न करता प्रजेची लुट करू लागतो. कारण तो चोर झालेला असतो. असे कलीयुगात होते. "तोंडात राम आणि खाकेत सुरी", असे त्या कलीयुगातील राजाचे स्वरुप असते. वेदाचे अर्थ कोणी समजू शकत नाही.

त्या काळात पाप वाढल्यामुळे रोगराई सर्वत्र पसरते, दुष्काळ, अवर्षण, वादळं, अतिवर्षा, आगी लागणे असे प्रकार घडत रहातात व सर्वत्र दुःख असल्याचे दिसते. त्याला कलीयुग म्हणतात. हे समजून जो राजा न्यायाचा चाबूक योग्य प्रकारे वापरत असेल, त्याच्या राज्यात सुख नांदत रहाते.

शांती पर्व भाग अड्डूसष्ठावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकोणसत्तरावा

युधिष्ठीर बोलतो, "हे सगळे चांगले समजून त्याप्रमाणे राज्य करणारा राजा ह्या आणि पुढच्या जन्मात सुखी होईल असे समजावे कां"?

भिष्म सांगतात, "राजामध्ये साधारणपणे चाळीस गुण असावे लागतात, ते तुझ्यात असले तर तू एक उत्तम राजा ठरतोस. ते असे आहेत, राजा न रागावता त्याची कामं करेल, राजा दुष्ट न होता शिक्षा करेल, राजा पाप मार्गाने धन मिळवणार नाही, राजा भोग घेतांना त्यात अडकला नाही जाणार अशी दक्षता त्याने बाळगावयाची असते. राजाचे बोलणे सुखद असले पाहिजे, राजा शूर असला पाहिजे परंतु, त्या शौर्याचा त्याला गर्व असता कामा नये, राजा सत्पात्र माणसांसाठी दिलदार असला पाहिजे, राजाचे धाडस क्रौर्याने भरलेले असणार नाही, राजा समझौता करेल स्वताचा अपमान न होऊ देता, राजा वाईट लोकांशी कधीच संबंध ठेवणार नाही, राजा दोस्तांशी मस्करी, चेष्टा ज्यामुळे त्याना वाईट वाटेल असे वागणार नाही, राजा बेईमान लोकांना कामासाठी (विशेष करून दूत म्हणून) घेणार नाही, राजा बळजबरी करून कांहीं काम करून घेणार नाही, राजा त्याच्या गुप्त मसलती वाईट लोकांच्या मदतीने करणार नाही, राजा इतरांचे चांगले गुण ओळखेल परंतु, स्वताचे तपासत राहील, राजा वाईट लोकांची संपत्ती काढून घेईल परंतु, चांगल्या लोकांच्या संपत्तीला हात लावणार नाही, राजा वाईट लोकाची मदत घेणार नाही. राजा शिक्षा करण्या आधी पूर्ण चौकशी करेल, राजा त्याच्या सल्लागारांची माहिति कोणाला सांगणार नाही, लोभी लोकांच्या लोभात राजा अडकणार नाही, राजा संशयित माणसांच्याशी जास्त संबंध ठेवणार नाही, राजा व्यसनांत (हि मानसिक व शारिरीक अशी दोन प्रकारची असतात) रमणार नाही, राजा त्याच्या बायकांचे संरक्षण करेल, राजा फार भावनाविवश होणार नाही, राजा बायकांच्या बरोबर जास्त वेळ घालवणार नाही, राजा त्याचे जेवण तपासून मग खाईल, राजा योग्य लोकांचा आदर सत्कार करील, राजा त्याच्या गुरू व शिक्षकांचा मान राखील, राजा देवांना पुजेल, राजा त्याच्याबद्दल गैरसमज पसरतील असे वागणार नाही, राजा समृद्धीसाठी प्रयत्न करील, राजा त्याच्या ज्येष्ठांचा

आदर करील, राजाला मर्यादांचे भान असले पाहिजे, राजा त्याच्या कामात संधीसाधू असला पाहिजे, राजा त्याच्या विरोधकांचे ऐकून घेईल, राजा त्याच्याशी इमानदार असलेल्यांना सांभाळेल, राजा भावनाविवश होऊन कोणाला शिक्षा करणार नाही, राजा त्याच्या शत्रूंचा नाश केल्यानंतर त्या कारणाने शोक करणार नाही, राजाचे रागावणे दाखवण्यासाठी असले पाहिजे कारण ते त्याच्या कामाचा एक भाग असते, राजा योग्य प्रमाणाने शिक्षा करील. अशाप्रकारे तू अरे पंडुपुत्रा तुझे राज्य करशिल. असे केल्यास तू समृद्ध होशिल. जे राजे हे नियम पाळत नाहीत ते योग्य प्रकारे राज्य करू शकत नाहीत. असा रितीने राज्य कारभार करणारा राजा लोकोत्तर होईल". असे भिष्म सांगतात युधिष्ठीराला.

वैशंपायन पुढे सांगतात, राजा युधिष्ठीर त्यातून बरेच कांहीं शिकतो त्याच्या भावंडांबरोबर आणि त्या नंतर ते सगळे भिष्माचे पाय धुतात व त्या चाळीस नियमांनुसार राज्य कारभार करण्याची शपथ घेतात त्यात भिम व अर्जुन आणि माद्रीची मुलं होती.

शांती पर्व भाग एकोणसत्तरावा संपला.

# शांती पर्व

## भाग सत्तरावा

युधिष्ठीर बोलतो, मला सांगा पितामहोदया, चांगुलपणाचा त्याग न करता राजा त्याच्या प्रजेचे संरक्षण कसे करतो ते सांगा.

भिष्म सांगतात, मी  आता तुला त्या नित्य कर्तव्यांची माहिती सांगणार आहेस त्यांची व्याप्ती फार मोठी आहे म्हणून मी ते थोडक्यात येथे देणार आहे. जे ब्राह्मण त्यांची वैदीक कार्ये प्रामाणिकपणे करत आहेत त्यांचा राजा नेहमी सन्मान करील. जेव्हां ते तुमच्या कडे येतील व तुझ्या यज्ञात भाग घेतील, तू त्यांचा सन्मान करण्यासाठी उठून उभा रहाशिल. त्यांचे पदस्पर्श करशिल, त्यांची पुजा करशिल, असे केल्याने त्यांच्या भोवती असलेल्या देवता तुझ्यावर प्रसन्न होतील. त्यानंतर ते तुला आशिर्वाद देतील. लोभ आणि मोहात न अडकता तू तुझे कार्य विवेकाने करत असशिल, जो राजा लोभ आणि मोहात अडकून धन गोळा करतो तो थोड्या काळासाठी चांगले समजतो परंतु, नंतर त्याचे हित व सुख नाहीसे होते व तो सगळे घालवून बसतो. सुख आणि हित ह्यांच्या मर्यादा जो समजून वागतो तो राजा कधी अडचणीत येत नाही. त्यासाठी राजाचे कारभारी लोभ आणि मोहात न अडकणारे पोक्त पुरूष असले पाहिजेत. लोभी राजा जनतेची लुबाडणूक करतो व नष्ट होतो. प्रजेच्या कमाईच्या १५ टक्के पेक्षा जास्त तो कर लावणार नाही. कर वाढवण्या ऐवजी तो प्रजेचे उत्पन्न कसे वाढेल ह्यावर लक्ष ठेविल. असा राजा त्याच्या प्रजेत आवडता होईल आणि त्याची प्रजा त्याला मदत करील. समृद्धीच्या काळात राजा त्याची गंगाजळ वाढवेल व जेव्हां आपत्काळ येईल तेव्हां तो ते साठवलेले पैसे प्रजेसाठी खर्च करील. नालायक राजा समृद्धीच्या काळी मिळालेली संपत्ती उधळून लावतो. बचत करणे ज्या राजाला समजत नाही तो राजा बरबाद होतो. राजा त्याच्या प्रजेवर जास्त कराचा बोजा टाकणार नाही. त्या ऐवजी वैश्यांना उत्तेजन देऊन परदेशांत व्यापार वाढवून तो त्याच्या महसुलात वाढ करण्याचा प्रयत्न करेल. अशा परिस्थितीत राजा मोठा व्यापारी असेल. त्याच्या कडून भांडवल घेऊन त्याचे वैश्य व्यापार करतील ज्यात राजाचा मोठा हिस्सा असेल. त्या अर्थ धोरणामुळे सामान्य प्रजेवर कराचा बोजा होणार नाही. लोभामुळे जुगारी

अर्थव्यवस्था जी थोड्या काळात भरपूर नफा दाखवते व नंतर एकदम मंदी आणते अशी अर्थव्यवस्था राजा स्वीकारणार नाही. गुंतवणूकीवर आधारीत अर्थव्यवस्था चांगला राजा त्याच्या राज्यात वाढवेल ज्यामुळे सावकाशपणे राज्याची अर्थव्यवस्था वाढत जाईल. जो नालायक राजा लोभात अडकला आहे तो जुगारी अर्थव्यवस्था स्वीकारतो व त्यात अडकल्यानंतर त्यातून बाहेर येण्यासाठी प्रजेवर कराचा बोजा टाकतो अशा राजाला त्याची प्रजा नष्ट करते. पृथ्वी अनंत संपत्ती राजाला देईल जर राजा तिच्या संपत्तीचा योग्य विनियोग करेल. खनिज, धान्य, कारागिरी उत्पादने (मडकी, कापड, भांडी अशा वस्तूंचे उत्पादन करणे), अशांचे उद्योग राजा त्याच्या राज्यात वाढवेल व त्या मार्गाने तो त्याची संपत्ती वाढवेल. राजा त्याची धोरणे माळ्याच्या प्रमाणे आखेल म्हणजे माळी फुलं काढतो तेव्हां झाडाला खत पाणी देऊन वाढवत असतो. त्यांमुळे त्याला ती झाड सतत फुलं देत असतात. दुसरे धोरण आहे कोळसा पाडणार्याचे. त्यात तो झाड मारुन टाकतो व कोळसा पाडतो त्याला प्रत्येक वेळी नवीन झाडाची गरज असते. तशी अर्थ व्यवस्था राजाला परवडणारी नसते. राजा सारख्या लढाया करणे टाळेल. कारण लढायांमुळें राज्याची अर्थव्यवस्था बिघडत असते. ब्राह्मणांना दानं मिळत असल्यामुळे ते नेहमी समृद्ध असतात. अशावेळी ब्राह्मण राजाला स्वताहून मदत करतील असे राजा आवाहन करू शकतो. परंतु, तो त्यांच्या कडून बळजबरीने त्यांचे धन काढून घेणार नाही. राजाचे काम त्यांना संरक्षण देण्याचे असेल. राज्याची परिस्थिती बिकट असल्यास ब्राह्मणांची संपत्ती राजा त्यांच्या परवानगीने वापरू शकतो. त्यामुळे राजाला पाप लागत नाही. प्रजेच्या संरक्षणासाठी राजा त्याचे प्राण देण्यास तयार असली पाहिजे. त्याच प्रमाणे राजाच्या संरक्षणासाठी त्याची प्रजासुद्धा त्यांचे प्राण देण्यास तयार असली पाहिजे. असे जेव्हां असते तेव्हां ते राज्य अजिंक्य ठरते. त्याची भरभराट होत जाते. केवळ उत्तम राज्यव्यवस्था ठेवणारा राजा तिनही आश्रम (ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम आणि वानप्रस्थाश्रम) एकाच वेळी जगल्यासारखा पुण्यवान होतो. राज्यातील प्रजेचे संरक्षण करण्याने जे पुण्य मिळते ते राजाला स्वर्गात जाण्याचा मार्ग मोकळा करत असते. असे पुण्य फक्त राजाच मिळवू शकतो. तुला राज्य करण्याची संधी मिळाली आहे त्यांचा चांगला उपयोग करून तू तुझे स्वर्गाचे द्वार उघड. शांती पर्व भाग सत्तरावा संपला.

# शांती पर्व

## भाग एका हत्तरावा

भिष्म पुढे सांगतात, राजा अशा विद्वानाला न्यायाधीश म्हणून नेमेल जे न्याय देण्याचे जाणतो. त्या संदर्भात एक संभाषण सांगतो जे राजा पुरुरवाची आहे. तो ऐल्य आणि मतरीस्वानाचा मुलगा होता. राजा पुरुरव विचारतो, "ब्राह्मण केव्हां तयार झाले? त्यानंतर इतर वर्ण केव्हां झाले? असे काय कारण आहे कीं, ब्राह्मण सर्वात श्रेष्ठ ठरले"? तो त्याच्या पित्याला, मतरिस्वानाला विचारतो. मतरीस्वान सांगतो, ब्राह्मण ब्रह्माच्या मुखातून आले आहेत, क्षत्रिय ब्रह्माच्या हातातून आले असे समजले जाते, वैश्य त्याच्या मांडीतून आले असे सांगतात, कांहीं ठिकाणी वैश्य ब्रह्माच्या पोटातून आले असे सांगितलेले आहे. शुद्र ब्रह्माच्या पायातून आले आहेत. म्हणून शुद्र समाजाचा पाया असतात. ब्राह्मण समाजाचे डोके असतात. क्षत्रिय समाजाचे हात असतात त्याचे संरक्षण करण्यासाठी आणि वैश्य समाजाची अर्थव्यवस्था असते. पुरुरव विचारतो, मला सांगा वायू ज्याचा संबंध जमिनीशी आहे तो कोण आहे, ब्राह्मण कां क्षत्रिय"? वायू देव सांगतो, जे कांहीं आहे ते सगळे ब्राह्मणांच्या मालकीचे आहे असे समजले जाते. इतर वर्णाचे लोक त्याची देखभाल करण्यासाठी असतात. ज्याप्रमाणे बाई तिच्या पतिच्या निधनानंतर त्याच्या धाकट्या भावाला पति समजते त्याप्रमाणे ब्राह्मणाच्या गैरहजेरीत क्षत्रिय पृथ्वीचे मालक समजले जातात. म्हणून तू अरे पुरुरवा, तू जे जिंकशिल ते सगळे ब्राह्मणांना दान करून टाक. कारण ते त्यांचेच असते. त्यासाठी असा ब्राह्मण तू पहाशिल जो तपस्वी आहे, ब्रह्मचर्य पाळत आहे. तसे केल्यावर तो ब्राह्मण ते राज्य तुला पुन्हा देखरेखीसाठी सुपुर्द करील अशा पद्धत आहे. असे केल्याने तू मोठा राजा समजला जाशिल. राजाच्या पुरोहिताचा राजाच्या पुण्यात हिस्सा असतो. जेव्हां राजा असे करतो तेव्हां सगळी जनता तशी करते व ब्राह्मणांना मजेत रहाता येते. त्यांचे जीवन सुरक्षित होते. ब्राह्मण जे यज्ञ करतात त्यामुळे देव, पितर, गंधर्व, उरूग, राक्षस सगळ्यांना त्यांचा हिस्सा मिळतो. परंतु, जर राजा नसेल तर ब्राह्मण असुरक्षित होतात व तेथे यज्ञ होत नाहीत. त्यामुळे ते सगळे उपाशी रहातात. त्यामुळे राज्यावर संकट येते. संकटात सापडलेल्याला कोणतेही सुख उपभोगता येत

नाही. त्यांचे जीवन दुर्लभ होते. म्हणून राजा पृथ्वीवरील इंद्र समजला जातो. तोंच यमसुद्धा असतो त्याच्याशी वैर करणार्यांचा. राजा म्हणून धर्म सुद्धा असतो. ज्याच्या कृपेमुळे सगळे सुखात राहू शकतात.

शांती पर्व भाग एकाहत्तरावा संपला.

# शांती पर्व

## भाग बाहत्तरावा

भिष्म पुढे सांगतात, चांगला राजा त्याच्या जनहीतदर्शी कामासाठी एक प्रामाणिक जाणकार विद्वान न्यायाधीश म्हणून नियुक्त करील. ज्याचे वेदाचे व न्यायशास्त्राचे ज्ञान पूर्ण आहे. राजा अशा विद्वान लोकांना नियुक्त करत असेल तर त्याच्या राज्यात न्याय व सुव्यवस्था कायम होईल. राजा व त्याचे मंत्रीमंडळ तपस्वी, न्यायी आणि संयमी असले पाहिजेत. जेव्हां तसे असते तेव्हां त्या राज्यात कृतयुग अवतरते. तशा राजाला त्याच्या भूमीच्या देवता (यक्ष, पिशाच्च, राक्षस इत्यादि) प्रसन्न असतात. त्याच्यावर पितर संतुष्ट असतात. राजा व त्याचे मंत्रीमंडळ एकाच विचारांचे असले पाहिजेत. त्यांना एकमेकांबद्दल आत्मियता असवी पाहिजे. त्यांच्यात मोठे तणाव असता कामा नये. ज्या राज्यातील ब्राह्मण व क्षत्रिय एकमेकांचा आदर करतात त्या राज्याचे भवितव्य थोर असते. ब्राह्मण व क्षत्रियांचा मिलाफ किती महत्वाचा असतो ते तुला मी ऐल्याच्या मुलाचा आणि काश्यपांच्या संवादातून सांगतो. एक युधिष्ठीरा तो संवाद, ऐल्याचा मुलगा, पुरुरव बोलतो, जेव्हां ब्राह्मण व क्षत्रिय ह्यांच्यात वाद असतो तेव्हां त्यांच्यातील कोणाला श्रेष्ठ समजावयाचे ते मला सांगा. काश्यप सांगतात, जर ब्राह्मण व क्षत्रिय वाद करू लागले तर ते राज्य नष्ट होते. परचक्र येते व सगळे (ब्राह्मण व क्षत्रिय असे दोघे) बरबाद होतात. चोर, लुटारू, रानटी टोळ्या राज्य पोखरून टाकतात. वैश्य व शुद्र ते राज्य सोडून जातात. ब्राह्मण स्त्रिया भ्रष्ट होतात. म्लेच्छांचे राज्य आल्यासारखे होते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, कलीयुग अवतरते. ब्राह्मण व क्षत्रिय दोघेही भ्रष्ट होतात. धर्म बुडतो, अराजक येते. त्यासाठी दोघांनी त्यांच्या भल्यासाठी एकमेकांना सांभाळून घ्यावयाचे असते. कारण ते एकमेकांना पुरक असतात. तसे न झाल्यास ब्राह्मण क्षत्रियांचा द्वेष करतात व त्यांच्या नाशासाठी फितुरी सारख्या भयंकर कृत्यात सामील होतात. परिणामतः ते राज्य परचक्रात अडकते. कांही वेळा ब्राह्मण भ्रष्ट असतात तेव्हां कुलिन क्षत्रिय त्यांचा नाश करण्यासाठी प्रयत्न करतात. त्याच प्रमाणे जेव्हां क्षत्रिय भ्रष्ट असतात तेव्हां ब्राह्मण व वैश्य शुद्रांच्या मदतीने त्यांचा नाश करण्यात यशस्वी होतात. तेव्हां कांहीं ब्राह्मण क्षत्रिय होतात

व वैश्य ब्राह्मणांचे कार्य करण्यास सुरूवात करतात. शुद्र खालच्या वर्गाचे (सैनिक, शिपाई) क्षत्रिय बनतात. अशारितीने पुन्हा ते चार वर्ण समाजाची घडी व्यवस्थित बनवतात. अशा व्यवस्थेमुळे कालांतराने त्या नवीन श्रेणीच्या वर्णात लग्न होऊन मिश्र जाती त्या राज्यात उत्पन्न होतात. त्यांना कायस्थ किंवा सुत वर्ण असे समजले जाते. ते वेदांचा अभ्यास करू लागतात व सगळी घडी पुन्हा व्यवस्थित होते. ज्या राज्यात अशारितीने समाजाची घडी नीट बनत नाही त्या राज्यावर नैसर्गिक आपत्ति येतात व समाजाचे जीवन अस्वस्थ होते. अशावेळी रुद्र राज्यात संचारतो व सगळे चांगले, वाईट तो नष्ट करतो त्यामुळे पापाचा नाश होतो ज्यामुळे अशी परिस्थिती उद्भवली होती.

ऐल्या विचारते, "असा भयंकर रुद्र केव्हां अवतरतो? तो कसा दिसतो"?

काश्यप सांगतात, रुद्र सगळ्या लोकांच्या हृदयात नेहमीच असतो, तो अशावेळी त्यां शरीराचा व त्याच्या बरोबरच्यांचा सुद्धा नाश करतो. रुद्र विविध रुपाने अवतरतो. कधी तो वादळाच्या तर कधी धरणीकंपाच्या, पुरांच्या, रोगराईच्या अशा अनेक स्वाभाविक रुपात तो अवतरत असतो त्याचे काम नाश करणे, एवढेंच असते.

ऐल्या बोलते, वारा अथवा पाऊस माणसाला सहसा मारत नाही परंतु, माणसाच्या वासना, त्याचे लोभीपण व आसुया त्याला सहज मारत असते.

काश्यप सांगतात, "अग्नी, वार्यामुळे पसरतो त्यांने नुकसान होत असते".

ऐल्या विचारते, "जर अशारितीने रुद्र सगळ्यांचा नाश करत असेल तर कोणी सज्जन कशासाठी रहावयाचे"?

काश्यप सांगतात, समाजाचे पाप असे समजले जाते कारण समाजात पापी असतील तर तो सुद्धा त्या समाजाचा दोष असेंच समजले जाते, म्हणून एकाच्या पापीपणामुळे इतरांनासुद्धा भोगावे लागते. समाजाच्या दुर्लक्षण्यामुळेंच पाप प्रवृत्ती समाजात वाढत असते. म्हणून समाजातील सगळ्यांना पापी माणसाचे नियंत्रण करावयाचे असे ब्रह्माकडून अपेक्षिलेले आहे. ते न झाल्यामुळे रुद्र सगळ्यांना नष्ट करतो, नवीन घडी त्यातून सुरू करणे असा त्याचा उद्देश असतो.

ऐल्या बोलते, पृथ्वी सगळ्या चांगल्या वाईटांना धारण करते, सूर्य सगळ्या चांगल्या वाईटांना उर्जा देतो, पाऊस सगळ्यांना सारखाच असतो.

काश्यप सांगतात, असा कारभार आहे सृष्टीच्या ह्या जगात परंतु, दुसर्या जगात मेल्यानंतर आपण जातो तेथे तसे नाही. तेथे फरक असतो. तो महत्वाचा असतो. तेथे चांगल्याना मेवा मिळतो व वाईटांना मार मिळतो. एकाला स्वर्ग म्हणतात व दुसर्याला नरक म्हणतात. जसे स्वर्गाचे अनेक प्रकार आहेत तसे नरकाचेसुद्धा अनेक असतात. उदाहरणार्थ अहंकारी चांगल्या माणसाना पाताळ नांवाच्या स्वर्गात जावे लागते. निरहंकारी इंद्राच्या स्वर्गात जातात. असे बरेच कांहीं फरक असतात. ते सगळे सांगता येत नाहीत. जेव्हां ब्राह्मणात व क्षत्रियांत भेद असतो तेव्हां जास्त त्रास होत असतो वैश्य व शुद्रांना. कारण ते निर्णय घेऊ शकत नाहीत जे ब्राह्मणांनी व क्षत्रियांना घ्यावयाचे असतात. त्यासाठी प्रथम न्यायाधीशाची नेमणूक व्हावयाची असते त्यानंतर राजाचा अभिषेक करावयाचा असतो जो न्यायाधीशाच्या हातून होत असतो, अशी रित आहे फार प्राचीन काळापासून. राजा त्याचे निर्णय न्यायाधीशाच्या सल्ल्याने घेत असतो. ते एकमेकांना पुरक राहून राज्य कारभार पहात असतात.

शांती पर्व भाग बाहत्तरावा संपला.

# शांती पर्व
## भाग त्रेहत्तरावा

भिष्म पुढे सांगतात, असे समजतात कीं, राज्याचे संरक्षण व उत्कर्ष ही राजाची जबाबदारी असते. परंतु, राजाचे संरक्षण करणे न्यायाधीशाची जबाबदारी असते. राजाने कांहीं चूक केली तर ती सुधारावयाचे काम न्यायाधीशाला करावयाचे असते. राज्यातील ब्राह्मण न्यायाधीशाला त्या कामात मदत करणारे असतात. तसेंच राज्यातील क्षत्रिय राजाला मदत करत असतात. त्याबद्दलचे संभाषण राजा मुचकुंद आणि वैश्रावण ह्यांच्यात झाले ते मी तुला सांगतो, राजा मुचकुंद सगळी पृथ्वी पादाक्रांत करतो, त्यानंतर त्याचे सामर्थ्य अजमावण्यासाठी तो वैश्रावणाच्या कडे जातो. वैश्रावणाकडे राक्षसांचे मोठे सैन्य तैनात असते. तो मुचकुंदाचे सैन्य कापून काढतो. ते पाहून राजा मुचकुंद त्यांचे पुरोहित वसिष्ठ ह्यांना दोष देऊ लागतो. त्यानंतर ऋषी वसिष्ठ मोठे तप करतात, त्या तपामुळें वैश्रावणाचे अनेक राक्षस मारले जातात. ते झाल्यानंतर वैश्रावण मुचकुंदाला भेटतो. त्याला बोलतो, तुझ्या पेक्षा बलवान असलेले अनेक राजे झाले पण कोणी माझ्यावर स्वारी केली नाही. कारण मी धनाची देवता आहे. ते माझ्या कृपेने श्रीमंत होणे जास्त शहाणपणाचे समजत आहेत. माझ्याशी लढून तुला कांहीं फायदा होणार नाही. तू ब्राह्मणांच्या बळावर मला दाबण्याचा प्रयत्न करत आहेस. त्यात तुझे क्षात्रतेज कोठेही नाही. राजा मुचकुंद वैश्रावणाला सांगतो ब्राह्मण व क्षत्रिय वेगळे नसतात. ते एकाच पिंडातून आलेले असतात म्हणून तुझ्या बोलण्यात कांहीं अर्थ नाही. ब्रह्माने ब्राह्मणांना मंत्रशक्ती दिली आहे व क्षत्रियांना तंत्र व अस्त्र शस्त्र शक्ती दिली आहे त्यांचे उद्देश एकच असतात. म्हणून मी त्यांचा उपयोग करून लढू शकतो त्यात गैर काय"? त्यासाठी तू मला दोष कसा देतोस. असे विचारल्यावर वैश्रावण बोलतो, मी तुला सगळ्या पृथ्वीवर राज्य करण्याची मुभा देत आहे. ते ऐकल्यावर राजा मुचकुंद त्याला सांगतो कीं, तो मेहरबानी वैश्रावणाकडे मागत नाही. मला तुला जिंकून घ्यावयाचे आहे. भिष्म पुढे सांगतात, राजाचा तो निर्धार पाहून वैश्रावण नवल करतो. त्याला राजाच्या क्षात्रतेजाचे कौतुक वाटते. क्षत्रिय व ब्राह्मण एकी असेल तर पृथ्वी जिंकू शकतात. शांती पर्व भाग त्रेहत्तरावा संपला.

# शांती पर्व
## भाग चौर्याहत्तरावा

युधिष्ठीर बोलतो, "मला सांगा, आजोबा, ते कोणते गुण आहेत ज्यांच्या जोरावर राजा पृथ्वी जिंकून सगळ्यांना त्याच्या ताब्यात घेऊ शकतो"?

भिष्म सांगतात, राजा चांगला असला पाहिजे तो नेहमी यज्ञ करत असला पाहिजे ज्यामुळे देवता त्याला प्रसन्न असतील. त्याचे वागणे असे असले पाहिजे कीं, सगळे त्याचा आदर करतील. चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया हे गुण त्याच्यात असले पाहिजेत. तो न्यायी असला पाहिजे. तो सगळ्या भल्या लोकांचे कौतुक करणारा असला पाहिजे. असा राजा त्याच्या प्रजेत सर्वमान्य असतो. त्याची भिती दुर्जनाना असली पाहिजे. त्याच्या भितीने ते नीट वागत रहातात असा तो असला पाहिजे. दुष्टांना तो कर्दनकाळ वाटला पाहिजे. त्याच्या राज्यातील जनतेच्या उत्पन्नाचा चौथा भाग तो घेईल. असा राजा त्याच्या वैश्यांना व्यापर उदिमासाठी भांडवल देईल व त्याचा फायद्याचा हिस्सा त्याचा असेल. राजा त्याच्या जनतेच्या पापाचासुद्धा चौथा भाग स्वीकारेल. कारण त्याच्या हलगर्जिपणामुळें ते पाप होत असते असे मनले जाते. लोकांच्या पुण्याचासुद्धा तो भागीदार समजला जातो. अशारितीने राजा त्याच्या प्रजेशी जोडलेला असतो. अशारितीने जे पाप राजाच्या वाटेला येते त्याचे निराकरण कसे होते ते ऐक. जर राजा चोरांना आवरु शकला नाही तर जी चोरी झाली त्याची भरपाई राजाला करावी लागते. चोरांचा बंदोबस्त करणे राजाचे काम असते. त्यासाठी तो शिपाई दलाची निर्मिती करतो. ते राज्यात गस्त घालून चोर, दरोडेखोर ह्यांना आवरत असतात. प्रसंगी ते चोर मारले जातात. त्यामुळे राजाला पाप लागत नाही. अशा गुन्हेगारांना तो राजा राज्याबाहेर हाकलून देईल. पापमय जीवन जगणारा राजा त्याच्या वासनांच्या पूर्तीसाठी जे पापकृत्य करत असतो तो प्रजेला आवडत नाही. ब्राह्मण त्या राजाचा तिरस्कार करतात. तो राजा वाईट समजला जातो.

युधिष्ठीर बोलतो, मला राज्यापासून कांहीं सुख मिळवण्याची इच्छा नाही. किंवा मला सत्तेचासुद्धा लोभ नाही. मला फक्त पुण्याशी संबंध आहे. ते राज्य करून मला मिळणार नाही. म्हणून मी राज्य सोडून वनात जाऊन तपस्या करून पुण्य कमावण्याच्या विचारांचा

आहे. न्याय दानाच्या कामातसुद्धा मला कांहीं रस नाही. त्यापेक्षा वनात राहून तपस्या करून व फळं आणि कंदमुळं खाऊन रहाणे मला जास्त हितकारक वाटते.

भिष्म बोलतात, मला ठाऊक आहे कीं, तुला अहिंसक रहावयाला आवडते परंतु, केवळ अहिंसक झाले म्हणजे सगळे झाले असा जो तुझा समज आहे तो खोटा आहे. वस्तुतः खर्या अर्थाने कोणीही अहिसक होऊ शकत नाही. केवळ दयाळू असले कीं तेवढ्याने सगळे साध्य होत नाही. तो निव्वळ पळपुटेपणा होईल. राजाला असे वागण्याची परवानगी नसते. ते ब्राह्मणांना, शुद्रांना करता येते क्षत्रियांना व वैश्याना नाही. तुला तुझ्या पूर्वजांच्या प्रथेनुसारच केले पाहिजे. अशाप्रकारे विचार करणे तुला शोभत नाही. वनात जाऊन तपस्या करून जर पुण्य मिळवता येत असते तर कोणी राजे झालेच नसते. तपस्येने केवळ असलेले पुण्य सांभळले जाते त्यात वाढ होत नाही. त्यासाठी कर्ममार्ग दिला आहे. तपस्या, ब्रह्मचर्य, संयम, ध्यान साधना अशा गोष्टी असलेले पुण्य राखण्यात मदत करत असतात पण त्यांमुळे पुण्यात वाढ होत नाही. ऋषीमुनींनी आधीच जमवलेले पुण्य ते त्या मार्गाने सांभाळत असतात. जेव्हां ते कमी होते तेव्हां त्यांनासुद्धा पुण्य मिळवण्यासाठी कांहीं कर्ममार्ग आचरावा लागतोच. कर्म मार्गाने पुण्य झपाट्याने वाढत असते जे राजाच्या कामांने आणखीन जास्त प्रमाणात वाढते कारण त्याला लोकांचा दुवा मिळतो. अशाप्रकारे वाढलेले पुण्य तपस्या, ब्रह्मचर्य, संयम, ध्यान साधना अशा साधनांनी स्थिर केले जाते. केवळ तपस्या, ब्रह्मचर्य, संयम, ध्यान साधना करून कांही विशेष वाढ होत नसते. त्याबाबात सनतकुमार सांगतात, कर्ममार्गाने पुण्याची जी वाढ होते त्याच्या पेक्षा तपस्या, ब्रह्मचर्य, संयम, ध्यान साधना ह्यांने वाढणारे पुण्य त्याच्या एक हजारांश इतके कमी असते. त्यासाठी पुण्य वाढवण्यासाठी वेदांनी कर्ममार्गच सांगितला आहे. तू मनातून काढून टाक कीं, वनात जाऊन व तपस्या, ब्रह्मचर्य, संयम, ध्यान साधना करून तुझा कांहीं खास उद्धार होईल. कर्ममार्गाने ज्याना तू मदत करतोस त्यांचे म्हणजे त्या लोकांचे, त्या पितरांचे, त्या देवतांचे आशिर्वाद मिळतात त्याने पुण्य वाढत असते. प्राण्यांची सेवा करण्याने, वृद्ध, आजारी, विकलांग, स्त्रिया, लहान मुलं, कमजोर लोक, शुद्र अशांच्या सेवेने व दुर्जनांच्या पारिपत्यातून तू जे पुण्य मिळवशील ते वनात जाऊन कधीच मिळणार नाही. त्या गैरसमजातून तू बाहेर ये युधिष्ठीरा. असे भिष्म त्याला सांगतात. आत्म्याचे पुण्य

सतत कमी होत असते कारण त्याने देह धारण केला आहे. ते कमी झाल्याने त्या आत्म्याचे देह धारण करणे अवघड होत असते. म्हणून अशा आत्म्याला सतत पुण्य कमवत रहाणे आवश्यक असते. चांगल्या विचारांने व त्यानुसार केलेल्या कृतीमुळें ते पुण्य जमवता येते. केवळ तपस्या, ब्रह्मचर्य, संयम, ध्यान साधना केल्याने ते साध्य होत नाही. शरीर धारणांने जे पुण्य खर्च होत असते ते तपस्या, ब्रह्मचर्य, संयम, ध्यान साधना करून सावरता येते एवढाच त्या उपासनांचा उपयोग असतो हे लक्षात घे. त्या स्वतः पुण्य मिळवण्याच्या दृष्टीने कांहीं खास उपयोगाच्या नसतात. राजाला वरील गोष्टी (प्राण्यांची सेवा करण्याने, वृद्ध, आजारी, विकलांग, स्त्रिया, लहान मुलं, कमजोर लोक, शुद्र अशांच्या सेवा करणे व दुर्जनांचा नाश करणे) करणे जितके जास्त सहज साध्य असते तितके ते इतर वर्णाच्या लोकांना शक्य नसते म्हणून राजा जास्त पुण्य कमवत असतो.
युधिष्ठीर बोलतो, असे काय केले म्हणजे मी स्वर्गात खात्रीने जाईन ते सांगा.
भिष्म बोलतात, चांगल्या लोकांना सुखाने जगण्यात मदत करणारा स्वर्गात खात्रीने जातो. आधी सांगितलेली काम करून (प्राण्यांची सेवा करण्याने, वृद्ध, आजारी, विकलांग, स्त्रिया, लहान मुलं, कमजोर लोक, शुद्र अशांच्या सेवेने व दुर्जनांचा नाश करणे) तू तुझा कर्म मार्ग सिद्ध व शुद्ध करून घे. ते करत असताना तू कोणाचा विनाकारण उपमर्द करणार नाहीस हे त्यात महत्वाचे असते. जा पंडुपुत्र, तुझ्या लोकांना पुण्य कर्माने पुनित कर. त्यांचा दुवा तुझा स्वर्गाचा मार्ग सिद्ध करतील. लोकांना दुष्टांपासून संरक्षण दे, ब्राह्मणांचे आशिर्वाद घेत जा. त्या प्रकारे तुझा स्वर्गाचा मार्ग मोकळा होईल, ते केवळ वनांत जाऊन तपस्या, ब्रह्मचर्य, संयम, ध्यान साधना केल्याने साध्य होणार नाही.
शांती पर्व भाग चौर्याहत्तरावा संपला.

# शांती पर्व
## भाग पंच्याहत्तरावा

युधिष्ठीर बोलतो, ब्राह्मणांत कांहींचे कार्य एक असते तर दुसर्या कांहीं ब्राह्मणांचे कार्य वेगळे असते त्यातील फरक मला सांगा.

भिष्म सांगतात, जे ब्राह्मण त्यांच्या वेदाच्या (ऋग्वेद, यजूर्वेद आणि साम) ज्ञानामुळे सर्वांकडे सम दृष्टीने पहात असतात, ते ब्राह्माच्या बरोबरीचे समजले जातात, ते ऋषी म्हणून ओळखले जातात. इतर कांहीं, तितके जाणकार नसतात, त्यांच्या मध्ये अनेक दोष असतात, त्यांचे वेदांचे ज्ञान पूर्ण नसते. ते शुद्रासारखे वागतात, त्यांच्यात सम दृष्टी नसते, ते वेगळे असतात तरी तेसुद्धा ब्राह्मणांची सामान्य कामं करत असतात. ते पौरोहित्य करतात व कर्मकांडाच्या फसव्या डावांत लोकांना अडकवत असतात स्वताच्या फायद्यासाठी, ते वैश्यांसारखे अथवा बर्याच वेळा शुद्रांसारखेच असतात. त्यांना ब्राह्मणांतील चांडाळ समजले जाते. त्यातील कांहीं ऋग्विज असतात, कांहीं पुरोहीत असतात, कांहीं सल्लागार बनतात राजासाठी व व्यापारांसाठी आणि क्षत्रियांसाठी त्यांना ब्राह्मणांतील क्षत्रिय समजले जाते. ते प्रसंगी क्षत्रियांचे कार्य युद्धात करत असतात. कांहीं जे व्यापार्यांना मदत करतात ते ब्राह्मणांतील वैश्य समजले जातात. राजा ऋषींच्या योग्येतेच्या ब्राह्मणांच्या धनाला हात लावू शकत नाही परंतु, तो दुसर्या प्रकारच्या ब्राह्मणांच्या संपत्तीला हात घालू शकतो जेव्हां परिस्थिती तशी उद्भवते. राजा त्याच्या प्रजेत सज्जनपणा वाढवण्यासाठी त्या दुसर्या प्रकारातील ब्राह्मणांना (ज्याना पुरोहित वर्गाचे असें समजले जाते) शिक्षासुद्धा करू शकतो. वेदांत सांगितले आहे कीं, जर पहिल्या प्रकारच्या ब्राह्मणांची आर्थिक परिस्थिती फार बिघडली तर त्याला राजा मदत करील परंतु, त्याला शिक्षा करणार नाही. परंतु, दुसर्या प्रकारच्या ब्राह्मणाला राजा हद्दपारसुद्धा करू शकतो जर तो सुधारला नाही.

शांती पर्व भाग पंच्याहत्तरावा संपला.

# शांती पर्व

## भाग श्याहत्तरावा

युधिष्ठीर विचारतो, "राजाची संपत्ती कोणती ते सांगा. त्याच्या संरक्षणासाठी राजा काय करण्यास मुक्त असतो"?

भिष्म सांगू लागतात, राज्यातील सगळी संपत्ती राजाचीच असते असे धरून चालतात. त्यामध्ये केवळ ब्राह्मणांची संपत्ती त्याची नसते. परंतु, भ्रष्ट ब्राह्मणांची संपत्ती राजाचीच समजली जाते. असे प्राचीन काळांपासून धरून चालत आहोत. जर सात्त्विक ब्राह्मण त्याची परिस्थिती खराब झाली म्हणून कांहीं चौर्य कर्म करू लागला तर तो त्या राजाचा दोष समजला जाईल, त्या सात्त्विक ब्राह्मणाला दोष जात नाही उलट तशा परिस्थितीत तो ब्राह्मण गेला कसा? ह्याची चौकशी न्यायाधीश करून राजाला ताकीद देईल. ह्या संदर्भात एक कथा आहे ती सांगतो, ती कैकयाच्या राजाची आहे, राजा एका राक्षसाला बोलतो जेव्हां तो राक्षस राजाला तो वनात ध्यान करत असतांना पळवून नेण्याचा प्रयत्न करत असतो. राजा त्या राक्षसाला बोलतो, माझ्या राज्यात कोठलेही अपकृत्य होत नाही, जसे कोणी नशापान करत नाही, कोणी द्युत खेळत नाही, कोणी चोर्या करत नाही, कोणी खोटे बोलत नाही, कोणी अज्ञानी नाही, कोणी पवित्र अग्नीशिवाय रहात नाही, कोणी सोम प्याला नाही असा नाही, यज्ञात दक्षिणा ब्राह्मणांना दिली नाही असे कधी घडलेले नाही, कोणी ब्राह्मणाला खाण्यासाठी गाय दान केली नाही असे कधी घडलेले नाही, माझ्या राज्यातील ब्राह्मण वेदांचा अभ्यास करतात व तो शिकवतात, पैसे न घेता, इतरांकडे जाऊन यज्ञाचे पौरोहित्य करतात, ते मृदूभाषी असतात, माझ्या राज्यात एकही भ्रष्ट ब्राह्मण नाही, राजा पुढे त्या राक्षसाला बोलतो, अरे राक्षसा, माझ्या राज्यातील क्षत्रिय कधी भीक मागत नाहीत, ते सत्यवादी असतात, ते दुर्जनांचा नायनाट करत असतात, ते सज्जनांना संरक्षण देत असतात, ते ब्राह्मणांना व शुद्रांना दानं करत असतात, ते यज्ञ करत असतात व देवतांना संतुष्ट ठेवत असतात, ते पितरांची नियमितपणे पुजा करत असतात त्यांच्या नांवे ब्राह्मणांना दानं करून, ते पिशाच्चांना वेळच्यावेळी शिधा देत असतात शुद्राला दानं करून, माझे क्षत्रिय युद्ध सोडून कधी पळून गेलेले नाहीत, माझ्या

राज्यातील वैश्य कधी खोटे बोलत नाही, ते कधी चुकीचा माल विकत नाहीत, ते मापात खोटेपणा करत नाहीत, ते कधी भीक मागत नाहीत, ते सदैव सत्पात्र दानं करत असतात, ते विनाकारण वृक्ष तोडत नाहीत, ते कृषी आणि व्यापार प्रामाणिकपणे करत असतात, ते राजाला त्याचा चौथा भाग देत असतात. ते पशुपालन त्या प्राण्यांचा छळ न करता करत असतात. माझ्या राज्यातील व्याध (खाटीक) प्राणी त्यांना हिंसा न करता (दुःख न देता) मारत असतात. ते कधी लहान, तरुण, गाभण असे प्राणी मारत नाहीत, ते त्यांच्या जबाबदार्या व्यवस्थितपणे सांभाळत असतात, माझे प्रजाजन अतिथीचे चांगले स्वागत करतात, त्यांना उपाशी ठेवत नाहीत. माझे वैश्य वेदांचा अभ्यास करत असतात, माझे प्रजाजन जास्त संतति जन्माला घालत नाहीत ज्यांना ते पोसू शकणार नाहीत, माझ्या राज्यातील शुद्र वरच्या तिघांची सेवा विना तक्रार करत असतात. ते वेदांचा अभ्यास करत नाहीत, मी माझे पुण्य सांभाळण्यासाठी तपस्या, ब्रह्मचर्य, संयम, ध्यान साधना असे सगळे यथोचित करत असतो, मी पुण्य मिळवण्यासाठी राजाची कर्तव्ये (प्राण्यांची सेवा करणे, वृद्ध, आजारी, विकलांग, स्त्रिया, लहान मुलं, कमजोर लोक, शुद्र अशांच्या सेवेने व दुर्जनांचा नाश करून) व्यवस्थित करत असतो, मी कधीही कोणावर अन्याय केला नाही, माझ्या राज्यातील बैरागी, साधू, सुखात आहेत, त्यांचे दुवा मला मिळत असतात, माझ्या प्रजेला उपाशी ठेवून मी कधी जेवलेलो नाही, मी ब्रह्मचर्य पालन चोख करत असतो, माझ्या राज्यात यज्ञात ऋग्विदा शिवाय कोणी आहुति देत नाही, माझ्या राज्यात अन्याय होत नाही, माझे न्यायाधीश चोख काम करत असतात, मी वेळोवेळी बाह्य देशांचे ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करत असतो, देशोदेशी फिरणार्या ब्राह्मणाच्या मदतीने, मी माझ्या गुरूचा, शिक्षकांचा कधी अपमान करत नाही, माझ्या अशा व्रतस्थ जीवनामुळें मी तुला भीत नाही. माझ्या राज्यात कोणी विधवा नसते, कोणी भ्रष्ट इसम नाही, कोणी बदमाष नाही, सगळे वर्णाचे लोक आपापली कामे करत असतात, माझे शरीर युद्धाच्या जखमानीं भरलेले आहे, ती युद्ध मी केली माझ्या प्रजेच्या संरक्षणार्थ. चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदयेसाठी मी सारखा झटत असतो, असे सगळे पवित्र असतांना मला तू कसा नेण्याचा प्रयत्न करत आहेस?

ते ऐकल्यावर राक्षस त्याला बोलतो, तू तुझे राजा म्हणून जे कार्य आहे ते प्रामाणिकपणे करत आहेस म्हणून मी तुला इजा करू शकणार नाही. तुझे कल्याण हो. असे बोलून तो राक्षस निघून जातो.

भिष्म पुढे सांगतात, ह्या कथेतून राजाची कर्तव्ये कोणती व त्यांचे राज्य कसे असले म्हणजे तो राजा व त्याची प्रजा कशी पापापासून मुक्त असते ते समजते.

जो राजा असा असतो त्यांचे राज्य समृद्ध रहाते व तो स्वर्गात जाण्यासाठी योग्य ठरत असतो. कैकेयाच्या राजा प्रमाणे तू राज्य कर म्हणजे तुझ्या सगळ्या विवंचना दूर होतील.

शांती पर्व भाग श्याहत्तरावा संपला.

# शांती पर्व

## भाग सत्त्याहत्तरावा

युधिष्ठीर विचारतो, "मला माहीत आहे कीं, आपत्काली ब्राह्मण क्षत्रिय कर्म करून त्याची उपजिवीका करू शकतो. मला सांगा, ब्राह्मण वैश्य कर्माने त्याचे पोट भरू शकतो कां"?
भिष्म सांगतात, "जर तशी वेळ आली तर ब्राह्मण क्षत्रिय कर्माप्रमाणे वैश्य कर्माने सुद्धा त्याचे पोट भरू शकतो. म्हणजे तो कृषी, व्यापर, पशुपालन अशी काम करू शकतो".
युधिष्ठीर विचारतो, "समजा तो वैश्य कर्म अंगिकारतो अशा वेळी तो कोणती काम करू शकेल ज्यामुळे त्याचे स्वर्गाचे हक्क अबाधित रहातील"?
भिष्म सांगतात, मदिरा, तीळाचे, आयाळ असलेले प्राणी, बैल, मध, शिजलेले अन्न अशांचा व्यापार तो करणार नाही. कारण त्यांच्या व्यापारामुळे त्याची अध्यात्मिक ऊर्जा क्षीण होत असते. परंतु, कच्चे अन्न देऊन त्याच्या बदल्यात तो शिजलेले विकू शकतो. परंतु, असे सांगतात कीं, रुद्राच्या पुजेने ब्राह्मण कोणताही व्यापार करू शकतो. तसे केल्याने रुद्राच्या कृपेने ब्राह्मण त्याचे गेलेले अध्यात्मिक सामर्थ्य पुन्हा मिळवू शकतो. आता मी तुला सांगतो प्राचीन काळापासून चालत आलेली प्रथा काय आहे, एकमेकांना उपयोगाच्या चीजा देऊन त्या पद्धतीने व्यापार करण्यात पाप लागत नाही. कारण त्या त्यांच्या गरजेच्या वस्तू ते एकमेकांना देत असतात आपखुषीने. योग्य मुल्याने ती देवाण घेवाण झाली तर ते पुण्य कर्म असते परंतु, तसे नसेल तर तो व्यवहार पाप कर्म ठरते.
युधिष्ठीर विचारतो, "समजा अशी वेळ आली कीं, सगळ्या वर्णाचे हातात शस्त्र घेऊन राजावर चाल करून गेले तर राजाने काय करावे"? अशा वेळी राजा व त्याची प्रजा ह्यांचे नाते कसे ठरवावयाचे"?
भिष्म सांगतात, राजा त्यांना काय पाहिजे ते देऊन त्यात दान, त्याग, तपस्या करण्याचे आश्वासन असे मान्य करून तो त्याच्या ब्राह्मणांच्या नेतृत्वाखाली आलेल्या प्रजेला शांत करू शकतो. तसे करण्यात त्या सगळ्यांचे भले असते. राजा त्याच्या प्रजेवर जे ब्राह्मणांच्या नेतृत्वाखाली चाल करून आले आहेत त्यांच्यावर हल्ला करणार नाही. राजाचे कांहीं खरोखरच चुकले असल्याशिवाय ब्राह्मण तसे करणार नाहीत. राजाचे सैन्य

अशावेळी ब्राह्मणांच्या बाजूने (म्हणजे समाजाच्या) राहील. त्याच प्रमाणे समझौता झाल्यावर राजाचा पुन्हा अभिषेक करावा लागेल व त्यानंतर सगळे आपापल्या कर्तव्यात जातील. जर परचक्र आले अथवा डाकू, दरोडेखोर आले तर सगळ्यांना शस्त्र हातात घेऊन राजाची मदत करावयाची असते. तसे करण्याने त्या सगळ्यांना पुण्य प्राप्त होते.

युधिष्ठीर विचारतो, "समजा सगळे क्षत्रिय ब्राह्मणांवर चिडले तर त्या परिस्थितीत ब्राह्मणांचे संरक्षण कोण करणार"?

भिष्म सांगतात, ब्राह्मण त्यांच्या तपोसामर्थ्याने, मंत्रसाधनेने, शस्त्र साधनेने, ब्रह्मचर्याच्या जोरावर (देवता ब्रह्मचर्य पाळणार्यांना प्रसन्न होतात) अशा पद्धतीने ब्राह्मण त्यांचे सरक्षण करू शकतात. ब्राह्मण क्षत्रियांत भेदनिती वापरून त्यांची शक्ती कमी करून सुद्धा ते साध्य करू शकतात. राजनितीच्या तत्त्वांचा योग्य विनियोग करून सुद्धा ब्राह्मण त्यांचे संरक्षण क्षत्रियांपासून करू शकतात. ब्राह्मण क्षत्रियांना शुद्र घोषित करून त्यांचे क्षात्र अधिकार काढून ते साध्य करू शकतात. अशारितीने ज्या राज्यात ब्राह्मण व क्षत्रिय एकमेकांना विरोध करतात त्या राज्याच्या राजाने ऋषींना आमत्रण द्यावयाचे असते. ब्राह्मण किती योग्य होते व क्षत्रिय अयोग्य होते कां, त्याच्यावर निर्णय ऋषी घेतील असे प्राचीन संकेत आहेत. जे जास्त चूकीचे त्यांना माघार घ्यावी लागते. ब्राह्मण भ्रष्ट झाले आहेत कां, क्षत्रिय भ्रष्ट झाले आहेत ते पहावे लागते. त्याप्रमाणे निर्णय ठरतो. जर ब्राह्मण भ्रष्ट झाले आहेत असे सिद्ध झाले तर ते शुद्र घोषित केले जातात. चांगुलपणा कोणाचा कमी झाला ते पहावे लागते, पुण्य कर्मात कोणी कमी पडले ते पहावे लागते. तशा घडलेल्या प्रसंगांचा, ज्याकारणाने त्यांच्यात तेढ उत्पन्न झाली, अभ्यास ते ऋषी करतील व त्यांचा निर्णय राजाला व न्यायाधीशाला सांगतील.

जर ब्राह्मण सच्चे असतील तर ते उरलेल्या तिनही वर्णांविरुद्ध शस्त्रं चालवू शकतात. त्यामुळे त्यांना पाप लागत नाही. ब्राह्मणांसाठी लढणारे पवित्र ठरतात. वाईट लोकांवर शस्त्र चालवणे जेव्हां आवश्यक असते तेव्हां तसे केल्याने पाप लागत नाही. कोठल्या परिस्थितीत काय करावे म्हणजे ते पाप ठरेल अथला पुण्य ठरेल ते सांगणे मोठे अवघड असते. स्वताचे संरक्षण करण्यासाठी, आपल्यावर अवलंबून असलेल्यांचे संरक्षण करण्यासाठी, असहाय लोकांना मदत करण्यासाठी, बायाबापड्या लहान मुलं ह्यांच्या

संरक्षणासाठी शस्त्र उचलणे पुण्याचे काम समजले जाते. जेव्हां राजा चोर बनून येतो तेव्हां त्याला ठार मारणे पुण्याचे काम असते. पापशक्तीचा पराभव करण्यासाठी जे मदत करतील त्यांना राजाने आणि ब्राह्मणांनी क्षत्रिय जाहिर करावयाचे असते मग ते शुद्र असले तरी.
भिष्म सांगतात, तत्त्वतः कोणी मनुष्य कायम ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य अथवा शुद्र नसतो. प्रत्येक माणसांत ते चार वर्ण असतात. त्यातील जो वर्ण त्याच्या मध्ये त्या प्रसंगी उच्चीचा ठरतो त्यावेळी तो त्याचा वर्ण समजला पाहिजे राजाने व त्याप्रमाणे त्याला किताब दिला गेला पाहिजे. असें मनू सांगतो कीं, चांगुलपणाच्या, माणूसकीच्या संरक्षणासाठी जो प्राण अर्पण करतो तो क्षत्रिय समजावा. परंतु, तशा मर्दाला निर्णायक बुद्धीमत्ता नसेल तर त्याला कुलिन क्षत्रिय समजले जाणार नाही. तरी तो प्रजेच्या संमतीने राजा होऊ शकतो. त्याला शुद्र राजा समजले जाईल. ते ब्राह्मणांच्या मदतीने राज्य कारभार करतील.
शांती पर्व भाग सत्याहत्तरावा संपला.

# शांती पर्व

## भाग अठ्याहत्तरावा

युधिष्ठीर बोलतो, राजाचे पुरोहीत कोणत्या प्रकारचे ब्राह्मण होऊ शकतात ते सांगा.

भिष्म सांगतात, असे शास्त्रात सांगितले आहे किं, पुरोहितांना छंदांचे ज्ञान असले पाहिजे. त्याना साम माहित पाहिजेत. त्यांचे श्रृतीचे ज्ञान चांगले असले पाहिजे. त्या माहितीमुळे ते देवतांच्या आराधना व्यवस्थितपणे करू शकतील. राजासाठी जी अनुष्ठान सांगितली आहेत ती त्यांना माहित असली पाहिजेत. त्यांची भक्ती ब्रह्माकडे असली पाहिजे, ते राजाशी प्रामाणिक असले पाहिजेत. ते कुलीन असले पाहिजेत. जे सगळे पुरोहित राजा कामाला लावेल त्यांचे परस्पर संबध चांगले असले पाहिजेत. ते दृष्ट स्वभावाचे नसावेत. त्यांची वाणी मृदू असली पाहिजे. त्यांना चौर्य कर्माची आवड, इच्छा नसावी. त्यांचे रहाणीमान साधे सात्त्विक असले पाहिजे. ते नम्र असावेत. त्यांचा क्रोध मर्यादित असला पाहिजे. त्यांच्या वासना मर्यादित असल्या पाहिजेत. लोभ आणि मोहांपासून ते मुक्त असले पाहिजेत. थोडक्यात त्यांचे षड्दोष (काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर) मर्यादित असले पाहिजेत. असे ब्राह्मण राजाचे पुरोहित होण्यासाठी योग्य असतात. थोडक्यात, ते सात्त्विक असावेत.

युधिष्ठीर पुढे विचारतो, वेदांत यज्ञामध्ये दक्षिणा देण्याचे दिले आहे परंतु, किती द्यावयाची त्याबद्दल दिलेले नाही. दक्षिणेचा संबंध संपत्ती वाटण्याशी नसतो, त्याच प्रमाणे, दक्षिणा नाही दिली तर जे प्रायश्चित्त सांगितले आहे ते मात्र भयंकर आहे. यजमानाच्या कुवतीचा त्यात विचार नाही, त्यामध्ये सांगितले आहे कीं, यज्ञ भक्तीभावाने करावा पण जर त्यात पुरोहितांचे थोतांड असेल तर त्यात यजमानाच्या भक्तीचा कांहीं उपयोग रहात नाही.

भिष्म सांगतात, थोतांड व खोटी भक्ती ह्यांच्या मदतीने यज्ञ साध्य होत नाहीत. त्याच प्रमाणे ब्राह्मणाला दक्षिणा दिली नाही तर तो यज्ञ साध्य होत नाही. ब्राह्मण यजमानाची कुवत ओळखत असतात, त्याप्रमाणे ते त्यांची दक्षिणा अपेक्षित असतात. ज्या दक्षिणेने ब्राह्मण प्रसन्न होईल ती दक्षिणा योग्य समजावी. परंतु, जेथे पूर्णपात्र (शुद्रांच्या यज्ञाची दक्षिणा, ती २५० मुठ तांदूळ सांगितलेली आहे) दिले जाते तेथे जे मिळेल त्यात

ब्राह्मणाला समाधान मानावयाचे असते. त्याप्रमाणे सगळ्या तिनही वर्णाच्या लोकांनी यज्ञ करावयाचे असतात व त्याद्वारा देवतांना (लोकपाल देवता) प्रसन्न करावयाचे असते. कारण, त्यांच्या अनुमतीनेच माणसाचे व्यवहार संपन्न होत असतात. वेदात सांगितले आहे कीं, ब्राह्मणांसाठी सोम महत्वाचा असतो. परंतु, तो ते उपजिवीकेसाठी विकू शकत नाहीत. परंतु, यज्ञासाठी पैसे कमी पडले तर त्यासाठी ते सोम विकू शकतात. गरीब यजमानाचा दुवा हा सुद्धा ब्राह्मणासाठी दक्षिणे प्रमाणे असतो. वाईट माणसाच्या यज्ञाने फायदा ब्राह्मणांचा होत नाही. तपस्या करणे यज्ञ करण्यापेक्षा जास्त चांगले असेसुद्धा वेदांत सांगितले आहे. ज्याना तपस्या करण्याची क्षमता नसते त्यांच्यासाठी यज्ञ सांगितले आहेत. आता मी तुला सांगतो तपस्या म्हणजे काय. **तपस्येमध्ये, अहिंसक वाणी व वर्तणूक, जीवनातील खरेपणा, माणूसकी, चांगुलपणा, भूतदया, ध्यान साधना करणे, असे जो जगतो तो तपस्या करत आहे असे समजावे.**

वेदातील ह्या आज्ञा जे मानत नाहीत ते बरबाद होतात. सर्व प्रकारचा वाईटपणा म्हणजे अधर्म आणि चांगलेपणा म्हणजे धर्म हे समजावे. तेंच खरे ज्ञान असते हे लक्षात घे.

शांती पर्व भाग अठ्याहत्तरावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकोणऐंशीवा

युधिष्ठीर बोलतो, "अगदी सामान्य कृत्य सुद्धा कोणी दुसर्याच्या मदतीशिवाय करू शकत नाही. ही वस्तुस्थिती असते, मग राजाच्या सगळ्या कामात त्याला असंख्य लोकांची मदत घ्यावी लागत असते. अशा प्रसंगी राजाचे मंत्री कसे काम करतील"? त्यातील कोणत्या कामांसाठी कोणावर राजा विसंबून राहिल ते सांगा.

भिष्म सांगतात, राजाचे पांच प्रकारचे मित्र असतात, ते असे, समान अडचणीत असलेले, त्याच्यावर श्रद्धा असलेले, जे नातेवाईक आहेत, जे विकत घेतलेले असे ते असतात. त्याशिवाय असे जे राजाच्या चांगुलपणाने प्रभावित झालेले असतात असे प्रजाजन. राजा त्याच्या विविध कामात त्या सगळ्या पांचही प्रकारच्या मित्रांना वापरू शकतो. तरी कांहीं कामं अशी असतात जी फक्त राजानेच करावयाची असतात त्याची माहीती तो त्यांना सांगणार नाही. कारण त्या पांचांतील पहिला व चौथा उलटू शकतो म्हणून कमी महत्वाचे असतात. राजा त्याच्या दोस्तांवर लक्ष देऊन असेल कारण राजाला तसे पहाता कोणी खरा मित्र नसतो. जो राजा त्याच्या मित्रांवर जास्त अवलंबून रहातो त्याला धोका होण्याची शक्यता असते. वाईट मनुष्य चांगला असल्याचे सोंग घेऊन राजाच्या गोटात शिरून राजाला धोका करू शकतो. त्याच प्रमाणे एके काळचा शत्रू मित्र होऊ शकतो त्याचा मतलब साध्य करण्यासाठी व मित्र प्रतिस्पर्धी त्याच कारणाने होत असतो. ही जगाची रीत आहे. मनुष्य नेहमी तसांच असेल असे समजणे योग्य नसते. असा कोणीही नसतो ज्यांवर राजा डोळे झाकून विश्वास ठेवू शकेल. म्हणून राजाची महत्वाची कामं तो त्याच्या देखरेखीत करत असेल. तो त्याच्या मंत्र्यांवर अंधपणे विश्वास ठेवेल तर त्याचे नुकसान होण्याची शक्यता असते. तरी युधिष्ठीरा, असे कांहीं साथी राजाचे असू शकतात जे पूर्णतया विश्वसनीय असतात. ते सगळे ओळखणे राजाला जमले पाहिजे. म्हणून पूर्णपणे विश्वास न ठेवणे हे सुद्धा चुकीचे ठरते. त्याचे कारण चुका कोणीही करू शकतो, त्यामुळे राजाचे काम बिघडू शकते. मित्राच्या, मंत्र्याच्या, सल्लागाराच्या चुकींमुळें राजा चूक ठरतो. असें बर्याच वेळी होत असते. म्हणून कोणतीही बाब एकावर सोडून चालत नाही. आपल्या

विश्वासाचा, मैत्रीचा कोण गैरफायदा घेत आहे ते पहावयाचे असते त्यासाठी शहाणा राजा सदैव जागृत असावा लागतो. कांहीं जात्या प्रामाणिक असतात, ते बहुधा शुद्र असतात. म्हणून राजा शुद्रांना सेवेत ठेवेल जे प्रामाणिक आहेत. ते हेरांचे काम करत असतात व राजाला खबर देत असतात. ते कधी मोठ्या पदावर जाणार नाहीत परंतु, राजाच्या कृपेत सुखात रहात असतात. असे शुद्र राजाचे खरे मित्र शाबीत होत असतात. कारण राजाच्या समृद्धीत त्यांचे भले असते. तसे शुद्र राजाला धोका देत नाहीत. फार बुद्धीमान माणसं राजाला फार उपयोगाची असतात व तितकीच धोक्याचीसुद्धा असतात. कांहीं माणसं जात्या बेइमानी असतात त्यांच्यावर लक्ष ठेवावे लागते. राजाच्या सुखात आपले सुख मानणारे व राजाच्या दुःखात आपले दुःख मानणारे सेवक राजा पसंत करील. जे सेवक राजाच्या मर्जीवर अवलंबून असतात ते जास्त विश्वसनीय समजले जातात. ज्यांचे राजाशिवाय अडत नाही ते धोक्याचे ठरू शकतात. ज्यांच्याकडे राजाशिवाय इतर पर्याय असतात समृद्ध होण्यासाठी त्यांच्यावर राजा कमी विश्वास ठेवेल. राजाच्या पुढे व मागेसुद्धा फार स्तुती करणारे धोक्याचे असू शकतात. प्रसंगी राजाला जाब विचारणारे कमी धोक्याचे असतात, त्यांच्या शंकांचे समाधान राजाने करावे व पहावे ते कसे वागतात. त्यावरून ते स्पष्टवक्ते राजाला जास्त कामाचे असतात. मोठी महत्वाकांक्षा असलेले राजाला धोक्याचे असू शकतात. सात्त्विक प्रवृत्तीची माणसं राजाने जमवावीत जर राजा स्वतः सात्त्विक असेल तर कारण, असे लोक धोकेबाज नसतात. तमोगुणी लोक धोकेबाज जास्त असतात. असे कांहीं ठोकताळे आहेत. राजाचे सेवक निवडण्यासाठी. राजाचे हित व सुख ज्या कोणाशी जुळते ते सगळे राजाला सोईस्कर समजले जातात. अशा लोकांवर राजा खास अवलंबून राहू शकतो. एका सेवकाला एका वेळी एकच काम द्यावे. तसेंच एक काम अनेकांना मिळून करण्यास देण्यामुळे ते काम बिघडण्याची शक्यता असते. ज्यांची विचार करण्याची पद्धत मिळती जुळती असते त्यांना एक काम देण्यास हरकत नसते. विभिन्न विचार असणारे असतील तर ते काम एकत्रपणे करू शकत नाहीत. त्या कामाची नासाडी होत असते. प्रधान मंत्री नेमतांना तो ज्येष्ठ असला पाहिजे, ज्याला कामाचा अनुभव आहे, जो राजाशी प्रामाणिक आहे, ज्याचे क्रोध व लोभ मर्यादेत आहेत, ज्याच्या कामाचा पूर्वीचा अनुभव चांगला आहे, जो संयमी आहे, ज्याला राजा बनण्याची महत्वाकांक्षा नाही,

जो उच्च कुलीन आहे, जो शेखी मिरवत नाही, जो शांतपणे दुसर्यांचे ऐकून घेतो, जो स्वतासाठी समाधानी आहे व जो राजाचा हितचिंतक आहे अशी लक्षणं त्यात असावीत. राजा शक्यतर जवळचे नातेवाईक मोठ्या पदावर नेमणार नाही जे महत्वाकांक्षी आहेत. राजा त्याचा द्वेष करणारे कोण आहेत ते समजून घेईल व त्यांना मोठी पदं देणार नाही. तरी कांहीं आप्त राजाशी प्रामाणिक असतात त्यांच्यावर राजा अन्याय होऊ देणार नाही.

राजा न्यायी आहे व तो कोणावर अन्याय होऊ देत नाही असे पाहिल्यावर राजाचे शत्रूसुद्धा त्याचे मित्र होतात कारण कोणालाही न्यायाने वागवलेले आवडते. राजा नम्र आहे व सगळ्यांचे भले करणारा आहे असे पाहिल्यावर राजाचे प्रतिस्पर्धीसुद्धा त्याला विरोध करणे बंद करतात. मित्र होतात. राजाच्या कारभारात द्वेष, मत्सर, सूडबुद्धी नाही हे पाहिल्यावर लोक त्या राजाला मदत करू लागतात. ज्याच्या राज्यात आपण सुरक्षित आहोत तो राजा कोणालाही प्रिय असतो. असा राजा चांगले राज्य करू शकतो.

शांती पर्व भाग एकोणऐंशीवा संपला.

# शांती पर्व
## भाग ऐंशीवा

युधिष्ठीर विचारतो, "समजा राजा त्याच्या आप्तांचे मन जिंकू शकला नाही तर ते विरोधात होऊ शकतात, अशा परिस्थितीत राजाने काय केले पाहिजे"?

भिष्म सांगतात, ह्या संदर्भात मी तुला एक कथा सांगतो, त्यात वासुदेव आणि नारदांचा संभाषण आहे. एकदा वासुदेव नारदांना बोलतो, अशिक्षित आणि मूर्ख किंवा शहाण्या मित्राला ज्याचे मन चंचल आहे, कधी आपले गुपित सांगू नये. तरी मी तुला माझे एक गुपित सांगणार आहे. मी कधी माझ्या नातेवाईकांची खोटी स्तुती करत नाही. मी त्याना तरीसुद्धा माझे अर्धे देतो व त्यांच्या अद्वातद्वा बोलण्याकडे दुर्लक्ष करतो. जसे आग पेटवण्यासाठी कांडी घासतात तसे माझे मन त्यांच्या अद्वातद्वा बोलण्याने सतत जळत असते. माझा बलराम, गदा असे ते तसे माझ्याशी वागत असतात. ते सगळे माझ्या बरोबर साथीला असतात तरी मी स्वताला एकटाच समजतो. अहो नारद, आमच्या अनेक अंधक व वृश्नी लोकांची समृद्धी झाली आहे, ते ज्यांची बाजू घेत नाहीत ते नष्ट होतात. त्यानंतर तो नारदाला सांगतो, ज्यांच्या बरोबर ते असतात त्यांना समृद्धी प्राप्त होत असते, परंतु, अहुक आणि अक्रूर ह्यांच्या विचित्र वागण्यामुळे मला कोणाची बाजू घेता येत नाही. ते एकमेकांशी भांडत असतात, मला ते दोघेही प्रिय आहेत पण त्याच्यातील त्या भेदामुळे मी त्यांना एकत्र आणू शकत नाही. माझी त्या आईसारखी गत झाली आहे जी तिच्या दोन मुलांच्या भांडणात अडकली आहे. अशा स्थितीत मी काय करावे ते मला सांगा.

नारद सांगतात, वाईट परिस्थिती दोन प्रकारच्या असतात, एक अंतरिक व दुसरी बाह्य. त्या आपल्याच कृत्याचे अथवा आपल्याच कोणाचे कृत्याने होत असतात. तुझ्या आताच्या वाईट परिस्थितीला तू जबाबदार आहेस. ते असे, बलराम व त्याच्या बरोबरचे भोज लोक अक्रूराचे साथी आहेत, ते त्याची बाजू घेतात कारण तो श्रीमंत आहे. तुझे असे आहे कीं, तू तुझी संपत्ती सगळ्यांना वाटून दिली आहेस. तुझ्याकडे तुझे मित्र आहेत. परंतु, तू त्यांना दिलेली संपत्ती त्यांच्याकडून काढून घेऊ शकत नाहीस. बभ्रू व उग्रसेनांकडून तू राज्य काढून घेऊ शकत नाहीस. तसे करण्याचा प्रयत्न केलास तर मोठा संहार होईल.

कदाचित सगळेंच संपेल. तुला एकच करता येईल त्यांच्या जिभेला टाळे लावावयाचे. ते ऐकल्यावर वासुदेव नारदाला विचारतो, ते कोणते शस्त्र आहे ते सांगा. नारद बोलतात, त्याच्याशी गोड बोलून त्याना नीटपणे समजावून तू तुझ्या आप्तांचे मन असे जिंकशील कीं, ते तुझ्या प्रमाणे वागू लागतील. तसे केल्यांने ते त्यांची बोलण्याची पद्धत सुधारतील. वाणी हे एक मोठे शस्त्र आहे. ते ब्रह्मास्त्रापेक्षा जास्त प्रभावी असते. त्याचे असे आहे कीं, सपाट रस्त्यावरून गाडी जास्त चांगली बैल खेचू शकतो तसेच हे आहे. जर ते भांडत राहीले तर त्यांचा विनाश होईल. मित्रांशी गोड बोलून व नीटपणे समजावून सगळे सुधारता येते. ते सगळे तुझ्यावर अवलंबून आहेत जसे सगळे जग आहे. त्यांची भांडणं तुला संपवता येतील गोड बोलून. रागावून नाही कारण ते बलाढ्य आहेत.

शांती पर्व भाग ऐंशीवा संपला.

# शांती पर्व
## भाग एकाऐंशीवा

भिष्म पुढे सांगतात, हे जे मी सांगितले तो एक मार्ग आहे. आता दुसरा पर्यायी मार्ग सांगतो तो ऐक. जे लोक राजाची बाजू घेतात त्यांना राजाने साथ द्यावयाची असते. जर कोणी अनोखा इसम तुला सांगू लागला कीं, तुझ्या खास मंत्र्याने घोटाळा केला आहे तर तो अनोखा आहे म्हणून त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष न करता त्याला एकांतात घेऊन पूर्ण चोकशी त्याला न घाबरवता केली पाहिजेस. अशाने तू कदाचित नवा मित्र जमवत असतोस जे बर्याच वेळी जास्त महत्वाचे ठरतात. पूर्ण चौकशीनंतर खरे काय ते समजते. ज्या दरबार्याचे खोटे काम उघड झाले तो त्या सामान्य माणसाला जो कदाचित शुद्र असू शकतो, ठार मारण्याची शक्यता असते. राजाने त्याला खास संरक्षण दिले पाहिजे. जर त्याला तो खरे सांगत असतांनासुद्धा राजाने संरक्षण नाही दिले तर त्या राजाला कोणी प्रजाजन कधींच कांहीं सांगणार नाही व तो राजा नुकसानीत जाऊ शकतो. त्या संदर्भात एक कथा सांगतो जी ऋषी कलकवृक्ष कोसलच्या राजाला सांगतात. कलकवृक्ष्य क्षेमदर्शीन राजाकडे जातात. जो कोसलचा राजा झाला होता. त्या ऋषीच्या कडे एका पिंजर्यात एक कावळा होता. तसा तो ऋषी कोसलच्या विविध प्रदेशांतून भटकत होता. तो सगळ्यांना बोलत होता कीं, "कोणाला कौविन भाषा (कावळ्यांची भाषा) शिकावयाची आहे कीं"? तो सांगतो कीं, कावळे माणसाचे भविष्य जाणत असतात व ते ओरडू ओरडून ते त्याला सांगण्याचा प्रयत्न करत असतात कारण कावळे पितरांशी संवाद करू शकता. पण मनुष्य त्याकडे दुर्लक्ष करतो व बरबाद होत असतो. म्हणून त्यांची भाषा लोकांनी शिकावी असे ते ऋषी सांगत फिरत असतात. तो ऋषी लोकांना सांगू लागतो कीं, त्याचा कावळा सांगतो कीं, राजाचे मंत्री राजाला फसवत आहेत. असे करत तो ऋषी अखेरीस राजाला भेटतो, त्याला सांगतो त्याचा कावळा काय सांगत आहे. राजाचा खजिना त्याचे मंत्री पद्धतशीरपणे लुटत आहेत व कसे ते करतात व कोठे ते ती लूट ठेवतात असे सगळे तो सांगतो. राजा त्याला आणखीन विचारतो तेव्हां तो ऋषी राजाला त्याच्या इतर मंत्र्यांची करणीसुद्धा सांगू लागतो. तो ऋषी राजाला सांगतो कीं, त्याचा कावळा कधीच खोटे बोलत नाही कारण

प्राणी (मुनष्य सोडून) आणि लहान मुलं कधीच खोटे बोलत नाहीत. अशारितीने सापडलेले मंत्री त्या कावळ्याला मारून टाकतात. आपला कावळा मारला गेला आहे ते ऋषीला समजते जेव्हां तो दुसर्या दिवशी पहातो. तो राजाकडे त्याची तक्रार करतो. तो सांगतो अरे राजा, मला तुझ्या संरक्षणाची गरज आहे. जर तू मला संरक्षण देणार असशिल तर मी तुझे भले करीन. मी तुझ्या भल्यासाठी लांबून येथे आलो अशासाठी कीं, तुझ्या लुच्च्या सरदारांच्या कडून तुझी होणारी लुट थांबवावी. मी एक ऋषी असून तुझा हितचिंतक आहे. असे तो राजाला सांगतो, ते ऐकल्यावर राजा त्याला संरक्षण देतो व सांगतो कीं, त्याला जे सांगावयाचे आहे ते त्यांनी सांगावे. तुम्ही ब्राह्मण अहात तुमचे मी ऐकणार आहे. ऋषी बोलतो, अरे राजा तुझे नोकर तुझी फसवणूक करत आहेत. राजाला अनेक मित्र असतात तसे शत्रूसुद्धा असतात. राजाचे हित करणार्यांना त्या सगळ्यांपासून धोका असतो. त्याच प्रमाणे राजाच्या संशयी नजरेचा सुद्धा त्यांना त्रास होत असतो. तरी खर्या हितचिंतकाप्रमाणे जो राजाचे भले करतो त्याचा मोबदला राजा त्याला देत असतो. अशा लुच्च्या नोकरांत अडकलेल्या राजाला मदत करणारा एका अर्थी आगीशी खेळत असतो मग तो कोणीही असो. म्हणून तो राजाचा हितचिंतक जीवावर उदार होऊन राजाची सेवा करत असतो. त्याला त्याची वाणी सांभाळून वापरावयाची असते. परंतु, जर राजा  संतुष्ट झाला तर मोठा फायदा असतो जसे देव प्रसन्न झाला. जर राजा नाराज झाला तर आगीत उडी टाकण्यासारखे होते. ऋषी राजाला सांगतो त्याचा कावळा दाखवत होता कीं, तो त्याचा कावळा आहे जे लोकांचे कृत्य ओळखत असतो. त्याला तुझ्या मंत्र्यांनी मारले कारण तो त्यांच्या कुलंगड्या सांगू लागला होता. ते तुझ्याकडे काम करण्या लायकीचे नाहीत. ते तुझे भले पहात नाहीत. त्यांच्या पासून मला धोका आहे. कारण त्यांच्या सगळ्या कृष्णकृत्यांची माहिती माझ्याकडे आहे. परंतु, तू जर मला संरक्षण देणार असशील तर मी तुला त्यांच्या सगळ्या भानगडी सांगणार आहे. त्या कावळ्याच्या सांगण्याप्रमाणे मी तुझ्या राज्यात फिरत होतो मला कांहीं अडचण झाली नाही. अंधारात जसा दिवा काम करतो तसा हा कावळा मला तुझ्या राज्यातील सगळ्या भल्याबुर्या गोष्टी सांगत होता. मला त्या कावळ्याने सांगितले कीं, तुझे राज्य मोठ्या अंधारात आहे. तुझ्या राज्यात चांगले लोक राज्यात काम करत नाहीत. सगळे चोर तुझ्याकडे कामाला लावलेले

आहेत. येथे सज्जन मारले जात आहेत व चोर माजत आहेत. म्हणून मी सांगेन कीं, शहाण्या लोकांनी तुझे राज्य सोडून जाणेच त्यांच्यासाठी श्रेयस्कर आहे. बदमाष लोकांनी तुझ्या राज्याच्या सरकाराचा ताबा घेतला आहे. तू तुझ्या मंत्र्यांना ताब्यात घेऊन त्याच्या कामाची चौकशी करावी असें मी सांगत आहे. तुझ्या कृपेवर जगत असतां तुझ्याच थाळीत माती कालवत आहेत. त्यांची कृष्ण कृत्ये सांगून मी स्वताला धोक्यात टाकत आहे. राजा त्याच्या नोकरावर चांगले लक्ष देऊन आहे कां? तो त्याच्या प्रजेवर खरोखरच प्रेम करतो कां? त्याचे नोकर किती प्रामाणिक आहेत त्याची तपासणी राजा करतो कां? ते पहाण्यासाठी मी येथे आलो आहे. राजाने त्याच्या नोकरांवर लक्ष ठेवण्यासाठी हेर लावले आहेत कां?

राजा त्या ऋषीला बोलतो, तुम्ही माझ्या घरात रहा तेथे तुम्हाला कोणी मारणार नाही. मी स्वतः तुमचे संरक्षण करीन. न्यायाचा चाबूक मी स्वतः हातात घेणार आहे. त्यामुळे जो खोटे होत आहे ते सुधारता येईल. ऋषी बोलतो अरे राजा मी माझ्या कावळ्याच्या हत्त्येची तक्रार करण्यासाठी आलो आहे त्याकडे तुझे लक्षच नाही. अशा वागण्यामुळे तुझ्या राज्यातील गुन्हेगार माजोर होत आहेत. त्या हत्यार्यांना तू प्रथम अटक केले पाहिजेस. जेव्हां सगळेच चोर होतात तेव्हां चोरी करणे हेंच योग्य समजले जाऊ लागते, तोच न्याय होते व चोरी न करणारा गुन्हेगार ठरतो, तसे तुझ्या राज्याचे होत आहे. माझे नांव आहे, कलकवृक्ष्य. राजा मी तुझा हितचिंतक आहे मी तुला एकच सांगतो कीं, तू तुझे मंत्री तपासून घे व गुन्हा किती मोठा कीं किती लहान ते न बघता गुन्हेगाराच्या उद्देशावर लक्ष ठेवून न्याय दे. तसे केलेस तर तुझे राज्य सुरक्षित होईल. तुझ्या मंत्र्याच्या नेमणूका तू केलेल्या नाहीस कारण तू नवीन राजा झाला आहेस, तरी ते तू पुन्हा तपासून घे. ते ऐकल्यावर राजा ऋषी कलकवृक्ष्याना त्याचे पुरोहित म्हणून नमतो व त्यांच्या देखरेखीखाली त्याचे मंत्रीमंडळ पुन्हा नव्याने नेमतो. कावळ्याला मारणारे तो शोधून काढतो व त्यांना शिक्षा करतो. त्यानंतर तो कोसलचा राजा साम्राज्य वाढवतो.

शांती पर्व भाग एकाऐंशीवा संपला.

# शांती पर्व

## भाग ब्याऐंशीवा

युधिष्ठीर बोलतो, राजाचे दरबारी सदस्य, संरक्षण मंत्री, सरसेनापति आणि कारभारी ह्यांची लक्षणं कशी असावीत म्हणजे ते उत्तम ठरतील ते सांगा.

भिष्म सांगतात, त्यासाठी जे उच्च पदस्थ लोक नेमले जातात ते सगळे उत्तमगुणी असावे लागतात. त्या मध्ये नम्रता, संयमी, शांत, खरेपणा असलेले, दुरदर्शी, धाडशी, उच्च कुलिन, विद्वान, अनुभवी, शूर पराक्रमी, न्यायी आणि राजाशी प्रामाणिक असलेले असावेत, मितभाषी असावेत. ते राजाच्या महत्वाकांक्षेला सहाय्य करणारे असावेत. तुमची सेवा करण्यात धन्यता मानणारे असावेत. ते दिसण्यात सुस्वरुप असावेत, निरोगी असावेत, शिष्टाचार संपन्न असावेत. जे जात्या संपन्न आहेत, दानी आहेत असे असावेत.

हलक्या कुळातील, महत्वाकांक्षी, राजाबद्दल प्रेम (आस्था) नसलेले, परदेशी, ज्याचे मित्र दुर्जन आहेत, व्यसनी, छंदी फंदी, बडबडणारे, बढाया मारणारे, सतत इतरांबद्दल उणे बोलणारे, राजाला सहज घेणारे, ज्यांच्या शौर्याबद्दल खात्री नाही, ज्यांच्या ज्ञानाची खात्री नाही, जे शरणागताला दुष्टपणे वागवतात, ज्यांना इतरांशी कसे बोलावयाचे ते समजत नाही, असे नसावेत.

न्यायाधीश वेदशास्त्र संपन्न असावा. त्याचा न्यायशास्त्राचा अभ्यास चांगला असावा, तो ब्रह्मचर्य पालन करणारा असावा. राजाशी प्रामाणिक असावा, राज्याबद्दल आस्था असणारा असावा, सात्त्विक असावा, व्रतस्थ जीवन जगणारा असावा, तो निर्णयाचा सच्चा असावा, तो गृहस्थ असावा, त्याचा इतर शास्त्रं आणि विद्या ह्यांचासुद्धा अभ्यास असावा.

राजाचे ते मंत्री त्याचे सहयोगी असले पाहिजेत. त्यांच्यात एकवाक्यता असणे आवश्यक असते. त्यासाठी ते शपथेने बांधलेले असावेत. राजाला त्याची चूक चांगल्या रितीने सांगणारे असावेत. त्यांचा व राजाचा चांगला संवाद असला पाहिजे. ते एकमेकांचे सद्गुण व दुर्गुण चांगले समजून त्यातून काम करणारे असले पाहिजेत. सबबी न देता कारणांची चर्चा करणारे असले पाहिजेत. राजाकडे त्या सगळ्यांकरता पर्यायी व्यवस्था असली पाहिजे. कारण माणसाचा कांहीं भरवसा नसतो, त्याचा मृत्यू केव्हाही होऊ शकतो अशा

वेळी राज्याचे काम अडणार नाही अशी व्यवस्था पाहिजे. वृद्धत्व, आजार, अपघात आणि मृत्यू अशा स्वाभाविक कारणाची दखल राजाला घ्यावयाची असते, त्याच्या विविध नेमणूकां करतांना. राजाचे सगळे कारभारी राजाच्या हितासाठी खेळकरपणे एकत्र राहून काम करण्यास शपथेने बांधलेले असावेत. राजा त्यांच्या एकमेकांशी असलेल्या संबंधांची चाचपणी करील. कांहीं अयोग्य आढळल्यास त्याचे निराकरण करील. अशी चाचपणी सन्मानपूर्वक असेल. कोणाही दोन कारभार्यांना एकमेकांशी चुरस करण्याची परवानगी नसेल. कारण अशी चुरस राज्याच्या हितासाठी धोक्याची असू शकते. छोट्या मोठ्या नाराजी होत असतात त्यांचे निराकरण राजा स्वतः खेळकर पद्धतीने करेल व परिस्थिती हाता बाहेर जाऊ देणार नाही. राजा त्याच्या सगळ्या कारभार्यांचे मित्र व सहकारी ह्यांच्यावर त्याच्या गुप्तहेरांच्या मदतीने लक्ष ठेवील. राज्यातील अति सामान्य माणसाच्या तक्ररीकडे सुद्धा राजा लक्ष देईल. त्यामुळे त्याच्या उच्चतम कारभार्यावरसुद्धा वचक राहील. राजा कोणावरही भाबडेपणे विश्वास ठेवणार नाही. मनुष्य चुका करतो तो त्याचा स्वभाव आहे म्हणून राजा त्याच्या कारभार्यांच्या चुकांची दखल घेईल परंतु, त्यावर कठोर कारवाई करणार नाही. त्याला सुधारण्याची संधी देईल. राजा चुकांचा प्रकार पाहून त्याप्रमाणे त्यांची दखल घेईल. कांहीं प्रकारच्या चुका आक्षेपर्ह असतात त्यासाठी आवश्यक कारवाई करेल. अज्ञानामुळे होणारी, अननुभवामुळे होणारी, घाईमुळे होणारी ह्या चुका उच्च पदस्थ अधिकार्यांना क्षम्य नसतात. मुद्दाम केलेली, बेपर्वाईमुळे होणारी, आळसामुळे होणारी अशा चुका शिक्षेस प्राप्त असतात. अक्षम्य चुकांना शिक्षा करणे आवश्यक असते. कारण तशा चुका राजाला व त्याच्या राज्याला परवडणार्या नसतात. राजा त्याचे अधिकारी नेमतांना त्यांच्यावर कसे संस्कार आधी झाले आहेत ते पाहिलं. अयोग्य संस्कारचे लोक अक्षम्य चुका करतात. ते राज्याला परवडणारे नसते. त्याची मनस्थिती दुषित असते. दुषित दृष्टीमुळें मनोविकृती उत्पन्न होते व तसे अधिकारी भ्रष्ट होतात. त्याच्या मुळे राज्यात अन्यायाचे राज्य सुरू होण्याचा धोका असतो. राजाची फार स्तुती करणार्यांवर राजा विशेष लक्ष ठेविल. राजा गुणवत्ता पाहून कृपा करील, केवळ मैत्री अथवा चांगले संबंध आहेत म्हणून कृपा करणार नाही. त्यामुळे गुणीजनांवर अन्याय होणार नाही. राजाचा राग भावनिक असणार नाही. तो कांहीं तर्कशुद्ध कारणानेच रागावेल.

प्रामाणिकपणे काम करणारे चुका करतात त्यांच्या चुकांची दखल घेतांना त्यांच्या आधीच्या कुशल कामाचासुद्धा तो विचार करील. राजा सुद्धा एक मानुष्य आहे व त्या नात्याने त्याच्या चुकीचेसुद्धा प्रजेने क्षमेच्या दृष्टीने स्वागत केले पाहिजे जर राजा त्याच्या चुका सुधारणार असला तर. राजाला त्याच्या चुका सांगणारे त्या राज्याचे लोक राजाने सन्मानपूर्वक स्वीकारले पाहिजेत. राजाचा जो मित्र, नातेवाईक शत्रूशी सुद्धा दोस्ती ठेवतो त्याला राजा छुपा शत्रू समजून त्यावर लक्ष ठेवण्यास त्याच्या हेरांना सांगेल. लोभी, मोहात अडकणारे(व्यसनी), अतिक्रोधी, मत्सरी, गर्विष्ठ अशा लोकांकडून राजा सल्ला घेणार नाही. राजाच्या कामामुळे मनातल्या मनात राजावर डूग धरणारे राजाला समजले पाहिजेत, त्यांचा सल्ला राजा घेणार नाही. त्यांना महत्वाची कामं तो देणार नाही. राजा प्रसंगी त्याच्या कोणत्याही शहाण्या, बुद्धीमान, अनुभवी, राजाबद्दल आस्था असणार्या सामान्य प्रजाजनाकडून सल्ला घेऊ शकतो. तसा सल्ला देतांना जरी तो रागाने बोलला तरी त्याचे राजाने मनावर घेऊ नये. कारण असा सल्ला राजाच्या हिताचा असतो. ज्या लोकांना राजाने दुखवले आहे त्यांचा सल्ला तो घेणार नाही. राजाने एकदा शिक्षा केलेल्या अधिकार्याला पुन्हा कामावर घेऊ नये. जे लोक राजाचे परंपरेने नोकर आहे त्यांचे विचार राजा ऐकेल.

राजा सर्वज्ञानी नसतो म्हणून तो विविध क्षेत्राचा अनुभव असलेले लोक पदरी सांभाळेल व त्यांच्याशी त्या त्या विषयांवर चर्चा करून त्या त्या विषयाची माहिती करून घेईल. राज्यातील छोटे जमातीचे नेते असतात त्यांचा राजा सन्मान करून व त्यांचे मत समजून घेऊन कामं करील. राजा कोणाचाही अपमान करणार नाही. राजाच्या चुका शत्रूंला समजणार नाही अशाप्रकारे त्याचे मंत्री वागतील. राज्याचे संरक्षण बिघडेल असे कांहींही राजा करणार नाही. राजा अनुभवी मंत्र्याचा सल्ला घेऊन काम करील. सगळ्या मंत्र्यांचा सल्ला लक्षात घेऊन राजा त्याचे निर्णय घेईल. त्याप्रमाणे त्या कामाची अंमलबजावणी होईल. प्रत्येक निर्णयाच्या साधक बाधक परिणामांचा तो विचार करणार त्याच प्रमाणे त्यांचे दूरागामी परिणाम ते समजून त्यानुसार त्या निर्णयांची अंमलबजावणी तो करणार. राजाकडे ज्योतिष जाणणारे असतील त्यांच्या कडून शुभ अशुभ पाहून राजा त्याच्या कामांची सुरूवात करेल. राजा ब्राह्मण, ऋषीमुनी ह्यांचा सदैव सत्कार करून त्यांचे विचार

एकेल. राजाचे वागणे सदैव निर्दोष असले पाहिजे. त्याचे कपडे, हालचाली, बोलणे, सामान्य व्यवहार निर्दोष असावेत. ते पाहून लोकांना त्याच्या बद्दल आदर वाटला पाहिजे. शांती पर्व भाग ब्याऐंशीवा संपला.

# शांती पर्व
# भाग त्र्यैऐंशीवा

भिष्म पुढे सांगतात, प्राचीन संभाषण बृहस्पती आणि शक्र ह्यांच्यात झाले ते सांगतो, शक्र विचारतो, असे कोणते कृत्य आहे जे केल्याने तो सगळ्या चराचरांत कौतुकास्पद आणि प्रशंसेचा होतो"?

बृहस्पती सांगतात, मृदू व प्रेमळ वाणी कोणालाही लोकांत प्रिय करते. प्रेमळ बोलण्याने मनुष्य शत्रूलासुद्धा जिंकू शकतो. आठ्या चढवून ओरडून अपशब्दांचा वापर करून बोलण्याने मित्र सुद्धा शत्रू होतो. गोड हास्य, शांतपणे बोलणे, अपमान न करता आपले विचार सांगणे, अशा वागण्याने सगळे तू जिंकू शकतोस. म्हणून राजासुद्धा आवाज न चढवता त्याला जे सांगावयाचे ते सांगेल. कोणाचेही मन न दुखवता बोलणे हि मनं जिंकण्याची उत्तम पद्धत आहे. ते ऐकल्यावर शक्र त्याप्रमाणे त्याचे बोलणे ठेवू लागतो. अरे युधिष्ठीरा, तू सुद्धा तसेच मृदू संभाषण करण्याचे धोरण अंगिकारलेस तर तुझासुद्धा फायदा होईल.

शांती पर्व भाग त्र्यांऐंशीवा संपला.

# शांती पर्व
# भाग चौर्याऐंशीवा

युधिष्ठीर विचारतो, "राजाच्या कोणत्या वर्तणूकीमुळें त्याला चिरंतन प्रसिद्धी प्राप्त होत असते"?

भिष्म सांगतात, शुद्ध अंतःकरण असलेला राजा जो त्याच्या प्रजेची प्रामाणिकपणे सेवा चांगुलपणा, माणूसकी व भूतदया ह्या प्रमाणे करतो ते चिरंतन प्रसिद्धी प्राप्त करत असतो.

युधिष्ठीर विचारतो, "कोणाशी वागतांना त्याने चांगुलपणा, माणूसकी व भूतदया दाखवावी ते सांगा. हे चांगले गुण सहसा कोणांमध्ये आढळत नाहीत. मग राजाने ते कसे अंगिकारावेत"?

भिष्म सांगतात, तू खरे बोलत आहेस, सहसा हे तीन गुण कोणी आचरत नसल्याचे आपण पहातो. थोडक्यात मी तुला सांगतो ते नीट ऐक, चार ब्राह्मण जे वेदाचार्य आहेत, ज्यांचे संस्कार सात्त्विक आहेत, जे सनातन परंपरेचे आहेत, त्याच प्रमाणे आठ क्षत्रिय जे शस्त्रविद्या विशारद आहेत, उत्तम शरीरसौष्ठव आहे, त्याशिवाय वीस वैश्य ज्यांना धन संचयाचे तंत्र माहीत आहे आणि तीन शुद्र जे त्यांचे काम चांगले समजून करत आहेत, त्याशिवाय एक सुत वंशी पंडित जे सगळी पुराणं जाणतो आहे, असे लोक तू तुझ्या मंत्रीमंडळात घेशील. ते सगळे प्रौढ वयाचे (५०) असले पाहिजेत, त्यांच्यात दंभ, द्वेष, क्रौर्य असे दोष नाहीत. ज्यांचे ज्ञान श्रृती व स्मृतीचे चांगले आहे. त्यांची लोकांचे प्रश्न समजण्याची क्षमता उत्तम आहे, जे निःपक्षपाती राहून त्यांची कामं करू शकतील. तिनही शुद्र नम्र, आज्ञाधारक व आपली कामं समजून करणारे असावेत. त्यांचा जीवनाचा अनुभव त्यांना ब्राह्मणांच्या जोडीला नेऊन ठेवतो तसे असले पाहिजेत. त्या सगळ्यांना कोणतेही मानसिक अथवा शारिरीक व्यसन नसेल. शिकारीचा खेळ, द्युताचा खेळ, मद्यपानाचे व्यसन, नशापानाचे व्यसन, बाईचे व्यसन, भांडण्याचे व्यसन, दुःख करण्याचे व्यसन, काळजी करण्याचे व्यसन, शंकाखोरी करण्याचे व्यसन अशी कित्येक मानसिक आणि शारिरीक व्यसनं माणसाचे जीवन पापमय करत असतात. राजा त्या नेमलेल्या मंत्र्यांच्या सल्ल्याने त्याचे निर्णय (नवीन कायदे कानु) घेत असेल. ते नंतर ते सार्वजनिक ठिकाणी

ते सगळ्यांच्या माहितीसाठी ठेवेल. राजा त्याच्या प्रजेचे सतत निरिक्षण करत असेल व त्यांना काय पाहिजे काय नको त्यांच्या अडचणी काय, ते कसे त्या सोडवतात, ते कोणत्या मुद्द्यावर भांडतात, कशाने ते आनंदी होतात, अशा सगळ्या बाबींची राजा माहिती त्याच्या दुतांद्वारे मिळत असला पाहिजे. त्यातून त्याला त्याच्या प्रजेचे प्रश्न त्यांना न विचारता समजत असतात. कोण कोणाला त्रास देतो, कां देतोस, कसा देतो, त्यावर ज्याला त्रास होतो तो काय करतो, असे सगळे राजा त्याच्या दुतांकडून समजून घेत असला पाहिजे. समाजातील दुर्जनांच्या सगळ्या कारवाया राजा त्याच्या दुतांकरवी समजून घेत असतो. त्यासाठी पोक्त शुद्र त्याला दुतांचे काम करून मदत करत असतात.

राजा कोणाची संपत्ती, ऐवज, मालमत्ता हडपणार नाही. राजाने जर असे करण्यास सुरूवात केली तर राजाचे महत्व नष्ट होईल. ज्याच्या मालकीबाबत तंटा आहे त्या वस्तू राजाकडे ठेवल्या जातात. तो  त्या संपत्तीचा विश्वस्थ असतो. त्या राजाने घ्यावयाच्या नसतात. राजा त्याच्या नांवाला बट्ट्या लागेल असे कांहीं करणार नाही. प्रजा राजाच्या वर्तणूकीचे सारखे निरीक्षण करत असते त्याचे भान ठेवून त्यांने व त्याच्या सेवकांनी त्यांची कामं केली पाहिजेत. प्रजा राजाची स्तुती आणि निंदा दोनही करत असते. त्यातील निंदा कमी व्हावी म्हणून राजा सदैव सतर्क असला पाहिजे. जनतेने केलेल्या निंदेतून राजा शिकत असतो म्हणून तो तशा निंदांचे स्वागत करणारा असला पाहिजे. जननिंदा राजाला त्याचे काम सुधारण्यासाठी मदत करणारी असते म्हणून राजा तशा निंदांचा विरोध करणार नाही. त्याच्या राज्यात राजा सर्वशक्तीमान असला पाहिजे. कोणी अन्याय करत असेल तर त्याचा परामर्ष राजाने घ्यावयाचा असतो. वादात खरे खोटे ठरवण्यासाठी साक्षी, पुरावे आणि साक्षीदार असे तीन उपयोगाचे असतात. कांहीं बाबतीत साक्षीदार खरा कां खोटा, पुरावा खरा कां खोटा असे वाद असतात त्याशिवाय कांहीं बाबतीत पुरावा अथवा साक्षी असे कांहीच नसते त्यावेळी तक्रारदाराच्या गुणवत्तेच्या बळांवर त्याचे म्हणणे ग्राह्य मानावयाचे कां नाही ह्याचा निर्णय न्यायाधीशाला घ्यावयाचा असतो. जर दावा खोटा ठरला तर त्याप्रमाणे निकाल दिला जातो. राजाची अथवा न्यायाधीशाची बुद्धीमत्ता, कल्पना शक्ती, तर्क पद्धती अशा गोष्टींचा उपयोग होत असतो. प्रत्येत खटला राजासाठी एक आव्हान असते. अशारितीने राजा सतत जनतेच्या परीक्षेला बसत असतो. त्यांने

चुकीचा निकाल दिला तर त्यावर लोकाच्या प्रतिक्रीया होतात त्याचेसुद्धा राजाने संशोधन करावयाचे असते. त्या कामात राजाला तर्कशास्त्री मदत करत असतात. त्या प्रक्रीयेमुळे राज्याची न्यायव्यवस्था व दंड व्यवस्था सुधारत असते. गुन्ह्याच्या प्रमाणाने शिक्षा असाव्यात. श्रीमंत गुन्हा करत असेल तर त्याला धनाची दंडात्मक शिक्षा असावी. निर्धनी असेल तर त्याला कष्टाची शिक्षा असावी. कोणाला जप्तीची शिक्षा असावी. परंतु, जे मुद्दाम गुन्हा करतात त्यांना शरीराच्या त्रासाची शिक्षा असावी असे मनू सांगतो. गुन्ह्याचे स्वरुप पाहून, गुन्हेगाराचे स्वरुप पाहून, परिस्थिती पाहून त्या सजा राजा ठरवतो. कांहीं भयंकर गुन्ह्यांसाठी जबरी शिक्षा असतात. प्रसंगी मृत्यूदंड दिला जातो. खून, बलात्कार, छळ करणे, अशा गुन्ह्यांना मृत्यूदंड दिला जातो, चोर्या दरोडेखारी, घरफोडी अशा गुन्ह्यांना तुरूंगात ठेवून त्यांच्या कडून कष्ट केले जातात. शिक्षेचा उद्देश कायद्याची दहशत निर्माण करण्याचा असतो ज्यामुळे माणसे तशी कृत्य करणार नाहीत. कांहींवेळा गुन्हेगार परिस्थितीमुळे तसे करत असतो तशावेळी त्याला माफीसुद्धा राजा देत असतो. कांहीं सजा अनैतिक संबंधाच्या विरोधात असतात म्हणजे वर्णसंकर होऊ नये असा त्यामागील उद्देश असतो. अशा सजा केल्याने राजाला अथवा न्यायाधीशाला पाप लागत नाही. दुष्टपणातून जर सजा होत असतील तर त्यामुळे राजा अथवा न्यायाधीश नरकात जातो. राजा दुसर्या देशाच्या प्रतिनिधीला शिक्षा करणार नाही. जर अशा प्रतिनिधीला राजा सजा करत असे तर त्या आधी त्याला त्याचा गुन्हा काय ते सांगावे लागते व त्याचे पुरावे द्यावे लागतात. त्या संरक्षणासाठी तो प्रतिनिधी सात गुणांनी युक्त असला पाहिजे, ते असे, तो उच्च कुलीन असला पाहिजे, तो उच्च घरातील असला पाहिजे, बोलण्यात हुशार असला पाहिजे, चतूर असला पाहिजे, ज्या राजाचा तो प्रतिनिधी आहे त्याची आवश्यक कागदी पुरावे त्याच्याकडे असले पाहिजेत. त्याची स्मरणशक्ती चांगली असली पाहिजे, त्याच्या बरोबर कोण आहेत त्यांची सुद्धा माहिती असली पाहिजे. राजाच्या किल्ल्यांचे संरक्षण करणारेसुद्धा तसेच असले पाहिजेत. राजाच्या न्यायाधीशाला त्याच्या राज्याचे कायदे चांगले अवगत असले पाहिजेत. तो राजाची गुपित सुरक्षित ठेवणारा असला पाहिजे.

सरसेनापती उच्च शिक्षित असला पाहिजे. त्याचे युद्धशास्त्राचे ज्ञान चांगले असले पाहिजे. शत्रूंचे डावपेंच तो समजू शकला पाहिजे. त्याच्या सैन्याची हालचाल गुपित असली पाहिजे. अशी माणसं व्यसनी असणार नाहीत.

शांती पर्व भाग चौर्यांऐंशीवा संपला.

# शांती पर्व
## भाग पंच्याऐंशीवा

युधिष्ठीर विचारतो, मला सांगा पितामहो, राजाने त्याचे निवासस्थान कोठे व कसे ठेवावे. राजा आधी असलेल्या जुन्या घरात राहणे श्रेयस्कर असते कां त्याने त्याच्यासाठी नवीन घर बनवून घेणे जास्त योग्य असते त्याबद्दल सांगा.

भिष्म सांगतात, राजा ज्या ठिकाणी रहाण्याचे ठरते त्या गांवाच्या संरक्षणाची चांगली व्यवस्था असावी लागते. त्यासाठी प्रथम आपण राज्याच्या संरक्षणाच्या व्यवस्थेबाबतची माहिती पाहू. त्यासाठी किल्ले कसे असावेत ते प्रथम समजून घेऊ. ते समजल्यावर तू तुझी राजधानी कशी असावी व त्यांचे किल्ले कसे असावेत त्याबद्दलचे नियोजन करू शकशिल. राजाचे घर अशा ठिकाणी असावे जेथे सर्वप्रकारची समृद्धता आहे. राज्यातील सर्वात जास्त श्रीमंत ठिकाणी त्याने रहावयाचे असते. किल्ल्यांचे सहा प्रकार असतात, ते असे, जलगड त्यात किल्ला पाण्याच्या खंदकामध्ये बांधलेला असतो, त्याच्या भोवती असलेल्या चरात पाणी असते व त्यात हिंस्र जलचर जसें सुसरी असतात. जितका तो चर जास्त रुंद तितके जास्त संरक्षण त्या किल्ल्याला मिळत असते. किल्ल्यात जाण्यासाठी त्यावर उचलता येणारा साकव असतो. दुसरा प्रकार आहे भूईगड. हा जमिनीवर बांधला जातो. त्याची तटबंदी उंच असते. तिसरा प्रकार डोंगरावरील किल्ल्याचा आहे. त्याला दूर्ग म्हणतात. त्यांनतर लहान किल्ले आहेत त्यांना भुईकोट, गढी अशी नांव आहेत. पाण्यात जो किल्ला असतो त्याला जंजिरा म्हणतात. तो समुद्राच्या मध्ये असलेल्या विस्तीर्ण खडकांवर बांधला जातो. त्याशिवाय लहान मोठे किल्ले असतात त्याना तटबंदी, बुरूज, बालेकिल्ला, किल्लेकोट अशी नांव आहेत. त्यातील मोठ्या महत्वाच्या किल्ल्यात संपूर्ण एक नगर वसलेले असते. त्यात प्रामुख्याने बाजारपेठ असते, राज्याचा खजिना असतो, पिण्याच्या व इतर कामासाठी पाण्याचा मोठा साठा असतो, धान्याचे कोठार असते. सैन्याचे मोठे दल तैनात असते, राजाचा दरबार तेथे भरतो, राजाच्या कारभाराची सगळी व्यवस्था तेथे असते. शस्त्रागार असते. लढण्याच्या दृष्टीने सगळी तयारी तेथे असते. बारा कारखाने त्या किल्ल्यात असतात. राणीवसा असतो आणि राजाशी प्रामाणिक असलेल्या

सामान्य नागरीकांच्या वस्त्या असतात. असे जेव्हां असते तेव्हां तो किल्ला राजाची राजधानी समजली जाते. राज्यातील विद्वान लोकांची मोठी वस्ती तेथे असते. हत्ती, घोडे ह्यांच्या पागा असतात. रथ ठेवण्याची व्यवस्था असते. तेथे वेदाभ्यासाची सोय असेल. राजा आणि न्यायाधीश त्या किल्ल्यात रहातात. त्या ठिकाणी राज्य कारभाराची विविध कामं करण्यासाठी कचेर्या असतात तेथे शासकीय कामं होत असतात. तशा किल्ल्यात प्रवेश घेण्यासाठी खास परवाना घ्यावा लागतो. आत येणार्यांची कसून तपासणी होत असते. राज्याच्या इतर भागांतून शासकीय अधिकारी तेथे येऊन त्यांच्या कामांची माहिती देत असतात. राजा त्याचे शस्त्रागार चांगले अद्ययावत ठेवेल. नवनवीन शस्त्रं तो त्याच्या सैन्याची शक्ती वाढवण्यासाठी तयार करण्यासाठी हुशार यंत्रज्ञांची नेमणूक करील. किल्ल्याच्या इंधनाची गरज पूर्ण करणासाठी राजा ते राज्यातील इतर भागांतून आणून ठेवत असेल. त्याला कोणी आग लावणार नाही ह्याची दक्षता त्याचे सैन्य पाहील.
राज्याच्या इतर भागांतून किल्ल्यातील लोकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विविध प्रकारचे सामान आणले जाईल. यज्ञ करण्यासाठी ऋद्विज, पुरोहित, तसेंच वैद्य, ज्योतिषी, मांत्रिक असें तज्ज्ञ लोक तेथे मुद्दाम रहाण्यासाठी राजा बोलावून घेईल. अशा सगळ्या गोंष्टींवर राजा स्वतः लक्ष देऊन त्या व्यवस्थित होत आहेत किंवा कसे त्याची पहाणी करत असेल. राजाची वर्तणूक अशी असेल कीं, त्याच्या बद्दल सगळ्यांना आदर वाटेल. लोकांच्या मनात राजाबद्दल व त्यांच्या राज्याबद्दल अभिमान वाटेल असे सगळे केले जाईल. राजा संन्याशांचा, जोगी लोकांचा, ब्राह्मणांचा जे बाहेरून येत असतात त्यांच्या प्रवासाच्या काळात त्यांचे स्वागत करील व त्यांच्याकडून ते ज्या परदेशांत फिरत होते त्या देशांची माहिती करून घेईल. राजा त्याचे प्रश्न त्या संन्याशांना सांगेल व त्याचे मत काय ते विचारेल.
राजा परदेशी प्रवाशांचेसुद्धा स्वागत करील, त्याच्या कडून इतर देशांची माहिती समजून घेईल. त्यांची तो नोंद करून ठेविल. अशा परदेशी प्रवाशांची रहाण्याची व्यवस्था असावी म्हणून राजा त्याच्या राज्यात जागोजागी विश्राम गृह चालवेल. लोकांच्या आरोग्यासाठी वैद्यकीय सेवा तैनात ठेवेल ज्यामुळे त्यांचे नागरिक तंदुरुस्त रहातील. परदेशांतील

फिरस्ते लोक त्याच्या राज्यात आले तर त्यांचे तो स्वागत करेल असे कीं, त्याच्याबद्दल चांगले मत घेऊन ते त्यांच्या देशाला जातील.

शांती पर्व भाग पंच्याऐंशीवा संपला.

# शांती पर्व

## भाग शह्याऐंशीवा

युधिष्ठीर विचारतो, राजा त्याची सत्ता कशी पक्की करील व त्याच्या राज्याच्या सर्वकश सुरक्षे साठी कोणत्या व्यवस्था करवेल ते सांगा.

भिष्म सांगतात, माझे सांगणे नीटपणे ऐक, राजाने राज्य कसे पक्के करावयाचे व त्याची सुरक्ष कशी करावयाची ते सांगत आहे. राजा प्रत्येक गावाचा एक मुख्य निवडेल. अशा दहा मुख्यांच्यावर एक अधिकारी असेल. अशा दोन अधिकार्यांवर एक मुख्या असेल. तो मुख्या वीस गावांच्या कारभाराचा जबाबदार असेल. अशा प्रकारे शंभर गावांच्यावर एक प्रधान असेल. अशा दहा प्रधानांवर एक सरदार असेल. अशारितीने त्या हजार गावांतील लोकांच्यावर लक्ष ठेवण्याचे काम ते करत असतील. लोकांच्या हालचाली ते पहातील. लोकांच्या गरजा, अडचणी, अपेक्षा, त्यांचे उद्योग, त्यांचे उत्पन्न, त्यांच्यातील दुर्जन, त्यांच्यातील सज्जन, विद्वान कोण आहेत, ब्राह्मण किती आहेत, वैश्यांची काम कशी होत आहेत, लोकांचे आरोग्य, कसबी लोकांचे उद्योग कसे चालले आहेत, जन्म, मृत्यू अशा अनेक बाबींची नोंद ते ठेवणार आहेत. खालच्या पातळीचा अधिकारी वरच्या पातळीच्या अधिकार्याला ती माहिती पाठवत असेल वेळोवेळी. ते अधिकारी गावातील उत्पन्नाचा राजाचा हिस्सा गोळा करून तो राजाकडे पाठवतील. त्या हिश्यातून राजा त्यांना त्यांचे वेतन देईल. अशा सरदारांचे एक गाव असेल ज्याचे तो वाढवून छोट्या नगरात रुपांतर करू शकतो ती त्याची खोती समजली जाते. म्हणजे एका सरदाराच्या हाताखाली दहा प्रधानांची दहा शहर असतील, सरदाराचे सुद्धा एक मोठे शहर असेल ज्याचे उत्पन्न तो घेईल व राजालासुद्धा त्याचा वाटा देईल. ते अधिकारी त्यांच्या कडे असलेल्या गावांचा विकास करून ती समृद्ध करण्याचा प्रयत्न करतील. त्यावरून राजा त्यांची गुणवत्ता ठरवेल. जे चांगले काम करतील त्यांची खोती चालू राहिल व जे चांगले काम करणार नाहीत त्यांची खोती रद्द होईल. सरदारांना राजाच्या कडे हजेरी द्यावी लागते व सगळ्या गोष्टींची माहिती त्याला द्यावी लागते. न्यायाधीश नेमले जातील जे बहुधा ब्राह्मण अथवा कायस्थ असतील व ते त्या सगळ्यांच्या कामावर लक्ष देतील. न्यायाधीश न्याय देण्याचे

काम करतील. त्यांच्या सरदाराच्या अखत्यारात असलेल्या प्रदेशातील सर्व गुन्ह्यांची नोंद त्यांच्याकडे असेल. ते न्यायनिवाडा करतील. जो महसुल जमा होतो त्यातून त्या त्या गावांच्या रस्ते, विहीरी, कालवे, साकव, शासकीय इतर बांधकाम ह्यांचा खर्च काढला जाईल. त्यासाठी सरदार त्याचे मोजमाप न्यायाधीशाच्या मदतीने करत असेल व राजाला त्याची खबर दिली जाईल. गांवातून सैनिकांच्या नेमणूका गावातील सरपंच करत असेल व ते राजाच्या खर्चात लष्करी शिक्षण घेऊन तयार होतील. ते राजाचे सैनिक असतील. त्यांतून राजा शिपाई दल तयार करील जे गांवाचे चोर, लुटारू, दरोडेखोर, इतर प्रकारचे गुन्हेगार ह्यांच्या पासून संरक्षण करील. ह्या सगळ्या व्यवस्थेवर राजाचे हेर लक्ष देतील व राजाला कोठे कांहीं खोटे काम होत आहे त्याची माहीती देतील. हेर कोण ते कोणालाच माहित नसेल. त्यासाठी राजाच्या व सरदाराच्या कोठीत एक कक्ष असेल तेथे लोक त्यांच्या ह्या अधिकार्यांच्या बद्दलच्या तक्रारी लिहून देत असतील ते फक्त राजाचे खास लोक वाचू शकतील व त्या तक्रारींची योग्य दखल ते घेतील. अशा प्रमाणे लोकांचे चांगले मत असेल तर तेसुद्धा ते त्याच ठिकाणी लिहून ठेवतील. त्यामुळे राजाला लोकांचे विचार समजू शकतील. तो कक्ष राजाचे खास लोक सुरक्षितपणे सांभाळतील. त्याशिवाय इतर अधिकारी राजा नेमेल ज्यांना राजा वेतन देईल. ते सगळ्या व्यापारी कारभाराची नोद ठेवतील. त्यात खरेदी, विक्री, उत्पादन, नुकसान, अपघात, दलाली, कर आकारणी असे सगळे असतील. त्यांमुळे राजाला त्याच्या राज्याची आर्थिक घडी कशी आहे ते समजते. तो अधिकारी क्षत्रिय अथवा वैश्य नाहीतर सुत कुळातील असेल. करमणूक करणारे जसे जादूगार, विदूषक, वैद्य, ज्योतीषी, मांत्रिक, पुरोहित ह्यांच्यावर राजा नाममात्र कर ठेवून त्यांच्या कारभाराची नोंद ठेवील. लोकांवर कर लादतांना करदात्याच्या क्षमतेचा विचार झाला पाहिजे नाहीतर चोर आणि राजा ह्यात कांही फरक रहाणार नाही. ह्या गोष्टींची दखल राजाने व त्याच्या मंत्र्यांनी घ्यावयाची असते. चांगला राजा छोट्यातल्या छोट्या तक्रारीची दखल घेईल. त्यातच राजाचे श्रेष्ठत्व सिद्ध होत असते. राजा जर लुटारू झाला तर त्या राज्यावर परकीय आक्रमण येण्याची शक्यता असते. अशा आक्रमणाला राज्यातील प्रजा विरोध करत नाही. त्यासाठी राजाचे लक्ष त्याच्या सगळ्या अधिकार्यांवर असले पाहिजे. राजा चोर होणार नाही अशी दक्षता तू तुझ्या राज्यात घेतली पाहिजेस.

कर आकारणाच्या बाबत राजा फार सावध असला पाहिजे. राजाची इभ्रत तो कसा कर आकारतो त्यावर अवलंबून असते. सर्व गोष्टी मर्यादेत असल्या पाहिजेत. राजा वैश्यांना भांडवल पुरवून त्यातून नफा घेऊन त्याचे उत्पन्न वाढवू शकतो. व्यापार्याना कर्ज देऊन सुद्धा तो त्याचे उत्पन्न वाढवू शकतो. कर आकारणी ह्या एकावरच त्यांने विसंबून रहावयाचे नसते. राजाची प्रजा त्याच्या कर आकारणीमुळें गरीब झाली तर ते राजाला दुषण असते. प्रजा श्रीमंत असली तर राजा श्रीमंत असतो. राजा त्याच्या व्यापार्यांना ज्यात वैश्य आणि ब्राह्मण असतील परदेशांत जाऊन धंदे करून धन मिळवण्यास उत्तेजन देईल.

चांगले शिपाईदल तयार करून राजा त्याच्या राज्यातील चोर, लुटारू, दरोडेखोर, डाकू ह्यांचा बंदोबस्त ठेवून त्याच्या प्रजेची सेवा करून त्यांच्या कडून प्रशंसा मिळवू शकतो. जे राज्य धनवान झाले आहे त्याला कमी संपन्न परंतु, शूर राज्यांकडून धोका असतो. ती कमी संपन्न राज्य धनवान परंतु, बेसावध राज्यावर चाल करून तो जिंकू शकतात. त्यासाठी राजाला त्याचे संरक्षणासाठी चांगले कठोर शिस्त असलेले लष्कर तयार ठेवावे लागते. बर्याच वेळी संरक्षणापेक्षा आक्रमणाचे धोरण जास्त सोईचे असते. संपन्न होण्याची कला ज्या राज्याने आत्मसात केली ते राज्य आक्रमक होऊन कमी संपन्न राज्ये जिंकून त्यांचे साम्राज्य वाढवू शकते. राज्यात बाहेरून येणार्या विक्रीच्या वस्तूंवर राजा कर लादू शकतो. वैश्य व त्याप्रकारचे काम करणारे ब्राह्मण ह्यांना राजा डाकूं पासून संरक्षण देऊन त्याचा व्यापर वाढवण्याचे काम करील. वैश्याच्या छोट्या मोठ्या चुकांकडे राजा दुर्लक्ष करून त्याना अधिक व्यापर करण्यासाठी उत्तेजन देईल.

शांती पर्व भाग शह्यांऐशीवा संपला.

# शांती पर्व
# भाग सत्त्याऐंशीवा

युधिष्ठीर बोलतो, "मला सांगा, राजाने त्याचे धन वाढवण्यासाठी काय कले पाहिजे"?
भिष्म सांगतात, राजाने धनापेक्षा प्रजेचा दुवा मिळवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. ते जास्त उपयोगाचे असते. त्यामध्ये प्रजेचे व त्याचे स्वतःचे असे दोघांचे भले होत असते. लोकांना संपन्न होण्यात मदत करणारे राजे त्यातून स्वतः सुद्धा संपन्न होत असतात. संपन्न होण्यासाठी राजा वैश्यांना भांडवल पुरवून त्यांच्याबरोबर व्यावसायिक भागीदारी करून श्रीमंत होऊ शकतो. कर आकारण्यात राजाने फार काळजी घेतली पाहिजे. कर आकारण्याची कला मोठी विलक्षण असते त्याला राजाची कला असेसुद्धा म्हणतात.जर कर आकारणी मर्यादित असेल तर त्याला चोरी म्हणता येणार नाही. व्यसनी लोकांवर कर लावणे, त्यांच्या व्यसनाच्या चीजांवर कर लादणे असे कांहीं मार्ग प्राचीन काळापासून राजे वापरत असतात. कर आकारणे हे एक प्रकारचे चौर्य कर्म आहे. परंतु, राजाला ते करण्याची सूट आहे श्रृतीच्या आदेशानुसार. तरीसुद्धा राजाने वैश्यांबरोबर भागीदारी करणे जास्त श्रेयस्कर असते. कांहीं राजे दुसर्या राज्यात जाऊन लूट करतात. ते पाप मानले जात नाही. परंतु, स्वताच्या राज्यात तो तसले करू शकत नाही असें मनू सांगतो. राजा भीक मागू शकत नाही पण दान देऊ शकतो. राजा लोकांकडून कर्ज काढू शकतो त्याच्या शासकीय गरजा पुर्ण करण्यासाठी. त्याचे हप्ते तो कराच्या व इतर उत्पन्नातून भरत असतो. राजाचे नांव सांगून जे अधिकारी प्रजेची लूट करतात त्यांना देहदंडाची शिक्षा सांगितली आहे. राजा वस्तुच्या रुपाने कर घेऊ शकतो. राजाचे चारित्र्य शुद्ध असले कीं, त्याला सगळ्या प्रजेचे सहकार्य प्राप्त होत असते. म्हणून राजाचे ध्यान पुण्य मिळवण्यावर असले पाहिजे. त्यांचा राजा आर्थिक अडचणीत आहे असे समजले तर त्याची प्रजा त्याला मदत करण्यास येते त्यासाठी त्यांच्यावर कर मारावयाची गरज नसते.
शांती पर्व भाग सत्त्याऐंशीवा संपला.

# शांती पर्व
# भाग अठ्याऐंशीवा

भिष्म बोलतात, फळझाड तोडावयाची नाहीत. फळं आणि कंदमुळं ही ऋषींची संपत्ती समजली जाते. त्यासाठी ऋषींनी तसे आदेश सगळ्या राजांना दिले आहेत. जे त्यांच्या गरजेपेक्षा जास्त असेल ते इतर लोक घेऊ शकतात. ब्राह्मणांचे हक्क नेहमी अबाधित राहिले पाहिजेत. जर त्यांना पुरेसे खाद्य मिळाले नाही तर ते त्या राज्याचा त्याग करतील, तसे होऊ नये म्हणून असे आदेश राजाने द्यावयाचे असतात. तरीसुद्धा जर ब्राह्मण त्याचे राज्य सोडून जात असतील तर ते कां जात आहेत त्याची चौकशी राजाने करावयाची आणि त्याच्या कारणांचे निराकरण करावे. जर ब्राह्मणांना जो ऐषोआराम पाहिजे तो मिळत नाही म्हणून ते जात असतील तर तोसुद्धा राजाने त्यांना द्यावयाचा परंतु ब्राह्मणांना राज्य सोडून जाऊ देऊ नये असे प्राचीन संकेत आहेत राजांसाठी ब्राह्मणांबद्दलचे. ब्रह्माने दिलेल्या आदेशाप्रमाणे ब्राह्मणाला त्याच्या गरजेपुरतेच देण्यास राजा व प्रजा बांधलेली आहे. जर त्यापेक्षा जास्त तो मागू लागला तर त्याला राज्य सोडून जाण्यास विरोध करू नये. कारण असा ब्राह्मण भ्रष्ट असू शकतो. ब्राह्मणांना दक्षिणा पुरेशी नसेल तर तो शेती, पशुपालन, व्यापार करून त्याच्या गरजा भागवू शकतो राजाच्या परवानगीने. ब्राह्मणांच्या संरक्षणासाठी त्यांच्यातूनच कांहीं क्षत्रिय झाले. ते राज्य करत आहेत. म्हणून क्षत्रियांचे पहिले कार्य ब्राह्मणांना संरक्षण देण्याचे असते. जो राजा ब्राह्मणांना संरक्षण देतो तो सर्वमान्य होतो. राजाचे कार्य त्याच्या राज्यातील सगळ्या निष्पाप लोकांना संरक्षण देण्याचे असते. कोणावर कायद्याची कारवाई करण्या आधी राजा व त्याचे शिपाई त्या माणसाचे काय म्हणणे आहे ते समजून घेण्यास बांधलेले आहेत नाहीतर तो अन्याय होऊ शकतो. राजा प्रथम स्वताचे संरक्षण करील व त्यानंतर इतरांचे संरक्षण करील. राजा स्वताचे आत्मनिरीक्षण करून त्याच्यातील दोष काढून टाकण्याचे कार्य करील, त्यासाठी त्याला त्या कामात त्याची पत्नी मदत करील. कारण पत्नी ही प्रथम टीकाकार असते पुरूषाची. अशारितीने राजा त्याला निर्दोष करण्याचा सतत प्रयत्न करत असेल. प्रजा त्याच्या बद्दल

काय म्हणते ते शोधण्यासाठी राजाचे हेर राज्यभर फिरून त्याची माहिती ते राजाला सांगतील. राजा त्यांची योग्य दखल घेईल. त्याच्या राज्यात न रहाणारे विद्वान, संशोधक असे प्रज्ञावान लोक राजा त्याच्या राज्यात आमंत्रित करून त्यांना त्यांचे नागरिक करून त्याच्या राज्याचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न करत असेल. राजा त्याच्या टिकाकारांवर रागावणार नाही. त्यांच्या टिकेचा उद्देश समजून त्याप्रमाणे कारवाई करील.
युधिष्ठीर विचारतो, "सारख्याच क्षमतेच्या अनेकांतील एक सरसावतो, तसे कां होते"?
भिष्म सांगतात, चर अचरांचा आहार करतात, ज्यांना दांत आहेत ते दांत नसलेल्यांना खातात, मोठे लहानाला खातात, बलवान बलहीनाला मारतात, असा सृष्टीचा नियम आहे. त्यासाठी राजा नेहमी सावध राहून त्याचे काम करत असेल. वेसावध राजा केव्हांही धूर्त शत्रूची शिकार होत असतो. राजाने हे लक्षात घेऊन कामं केली पाहिजेत कीं, त्याची प्रजा त्याला पोसत आहे तरी त्याच्या बदल्यात तो काय करत आहे? राजाने प्रजेच्या उपकारात राहू नये. प्रजेचे ऋण तो वेळोवेळी फेडत असेल. राजा सत्पात्र लोकांना दानं करील व इतर प्रकारची मदत सुद्धा करेल. राजाच्या दानांमुळे देव, पितर, नांग, राक्षस, पक्षी, मुके प्राणी ह्याची सेवा होत असते. त्याबदल्यात ते सगळे राजाला मदत करतात असे समजले जाते.
युधिष्ठीर विचारतो, प्रजा किती प्रकारच्या असतात? भिष्म सांगतात, प्रजा दोन प्रकारच्या असतात. एका प्रकारात दिसणारी असते व दुसर्या प्रकारात न दिसणारी असते. दिसणार्या प्रजेत राजाची मानवी प्रजा, मुके प्राणी, वनस्पती, असे सगळे येतात. त्यांचे संरक्षण, संवर्धन, संगोपन राजाची जबाबदारी असते. न दिसणार्या प्रजेत असतात, त्या राज्यातील पिशाच्च, पितर, ग्रामदेवता, वास्तुदेवता, विश्वदेव असे सगळे येतात. राजा त्याचा मान राखण्याचे काम त्याच्या मानवी प्रजेच्या मदतीने करत असतो. जेव्हां ते प्रसंन्न असतात राज्यावर अस्मानी संकट येऊ शकत नाहीत. राजा वेळोवेळी यज्ञ करून त्यांना आहुत्या देत असतो. तसेंच प्रजा त्यांना पिंडदान, शिधा, कावघास, गोघास, बळी, श्राद्ध वगैरे करून शांत करत असली पाहिजे. त्यांना प्रसन्न ठेवण्याची जबाबदारी राजा व त्याची जनता अशा दोघांची असते. शांती पर्व भाग अठ्ठ्यांऐशीवा संपला.

# शांती पर्व

## भाग एकोणनव्वदावा

भिष्म बोलतात, वेदाचार्य उतथ्य अंगिरसाच्या कुळीतील मोठ्या आनंदाने युवनस्वाच्या मुलाला मंधत्री राजाला सांगत असतो, ते मी तुला सांगतो, तो बोलतो, चांगुलपणाच्या गुणामुळे तो राजा होत असतो, विनाकारण तो राजा होऊ शकत नाही. हे तू लक्षात ठेव मंधत्री. त्याचे काम लोकांची सेवा करण्याचे असते, मजा करण्याचे नसते. राजा होणे हे एक व्रत आहे, कांहीं गम्मत नाही हे अरे मंधत्री, चांगलेच लक्षात घे. जर राजा त्याचे गुण सुधारू शकला नाही व चुकीच्या गोष्टती रमू लागला तर देव त्याचा त्याग करतात व कली त्याचा ताबा घेत असतो. जो राजा चांगुलपणा वाढवतो त्याचा सदोदीत उत्कर्ष होत जातो. कारण तो इंद्राला आवडू लागतो. पापात रमलेले, हे माझे, हे तुझे, अशा गोष्टीत अडकतात. त्यांच्यातून स्वार्थामुळे पाप कर्म होऊ लागते. त्यांने केलेली श्राद्ध पितरापर्यंत पोहोचत नाहीत, ते त्यांच्या प्रियजनाना सुद्धा परके होतात. त्यांचे यज्ञसुद्धा व्यर्थ जातात. मनात अनेक गोंधळ वाढल्यामुळें तो विवेकांने काम करू शकत नाही. परंतु, चांगुलपणात रमलेला राजन म्हणून समजला जातो. ज्या राज्यात चांगुलपणा नाही त्याला ऋषी वृषाल म्हणून ओळखतात. चांगुलपणाला आणखीन एक नांव आहे ते आहे, वृष. जो वृष कमी करतो त्याला वृषाल असे म्हणतात. राजाने सदैव चांगुलपणा वाढवावयाचा असतो. त्याचा चांगुलपणा कोणत्याही कारणांने कमी होणार नाही असे त्यांने पहावयाचे असते. चांगुलपणाला धर्म असेसुद्धा म्हणतात. कारण त्यात पुण्यप्रभाव असतो. त्याच्या वाढण्याने माणसाचे सगळे इतर गुण सुधारत असतात. म्हणून राजाचे पहिले लक्षण असते चांगुलपणा. अरे मंधत्री तू त्या चांगुलपणाचे प्रतिक असलेल्या ब्राह्मणांची नेहमी पुजा करशील. त्यातच सगळे पुण्य सामावलेले असते. त्याकडे दुर्लक्ष केले म्हणून संमृद्धतेची देवता असुर विरोचनाच्या मुलावर, वलीवर, नाराज झाली होती. ती असुरांचा त्याग करून पुरंदराच्या कडे गेली होती. चांगुलपणा स़ोडलेल्या तिच्या मुलाला सुद्धा त्याचा त्रास झाला होता, त्याते नांव होते गर्व. गर्वाचे घर नेहमी त्यामुळे खाली झाले होते. असे श्रृतीत सांगितले आहे. अनेक राजर्षी त्या गर्वामुळें बरबाद झाले आहेत. म्हणून तू त्या दुर्गुणांपासून

सावध रहा. नाहीतर तू सुद्धा पुढच्या जन्मी गुलामाचे जीवन जगण्याची शिक्षा भोगत रहाशिल. अरे मंधत्री, जर तुला जन्मोजन्मी सुखात रहावयाचे असेल तर तू गर्वा पासून आणि वाईटपणा पासून दूर रहाशिल. म्हणजे पापापासून दूर रहाशिल. तशा लोकांपासून सुद्धा तू दूर रहाशिल. राजा सद्गुणी असल्यास प्रजा तशी असते. यथा राजा तथा प्रजा, असें सांगतात म्हणून राजाच्या गुणावगुणांने राज्याचे पुण्य व पाप ठरत असते. नाहीतर राज्यात राक्षस जन्मू लागतात. पूर येतात, रोगांच्या साथी पसरतात, पाऊस पडावयाचे थांबते अथवा नको असा पाऊस पडू लागतो. कलीचे राज्य तुझ्या देशांत येईल, म्हणून अरे मंधत्री, तू ते तसे कांहीं करणार नाही. म्हणून चांगुलपणा हे सर्वश्रेष्ठ धोरण राजाचे असले पाहिजे सज्जनांशी वागतांना.

शांती पर्व भाग एकोणनव्वदावा संपला.

# शांती पर्व

## भाग नव्वदावा

उतथ्य पुढे सांगतो, उतथ्य पुढे सांगतो, पाऊस जर चांगला झाला आणि राजा त्याचे काम नीटपणे करत असेल तर समृद्धी राज्यात येण्यास कांहींच हरकत नसते. परीटाला कपड्याचा रंग निघणार नाही अशा प्रकारे केवळ मळ काढावयाचा असतो तसे राजाला राज्यातील फक्त भ्रष्ट ब्राह्मण, भ्रष्ट क्षत्रिय आणि भ्रष्ट वैश्यांचाच बंदोबस्त करावयाचा असतो. त्यासाठी नितीमान ब्राह्मणांना, कुलिन क्षत्रियांना व प्रामाणिक वैश्याना त्रास होणार नाही अशाप्रकारे त्याला कायद्याचे राज्य आणावयाचे असते. ते ज्या राजाला जमले तो राजा सगळ्या प्रजेला प्रिय होतो. ज्या क्षत्रियांना ते जमते ते राजा होण्यास लायक समजले जातात. राजांच्या कर्तृत्वामुळे चार युग तयार झाली आहेत. जसा राजा उत्तम असतो त्याच्या काळात कृत युग अवतरते, राजा जरा कमी गुणवान असेल तर त्रेतायुग अवतरते त्या राज्यात. राजा त्याहूनही कमी गुणवान ठरला तर ते द्वापार युग ठरते व राजा फारच कमी गुणवान असेल तर मात्र कलीयुग त्याच्या राज्यात अवतरत असते. त्याचे कारण राजा त्याच्या राज्याचा विधाता व विघाता असे दोनही असतो एकाच वेळी. राजा गोंधळला तर सगळेच अस्ताव्यस्त होत असते. राजा बिघडला कीं, त्या राज्यातील सगळी व्यवस्था बिघडत असते. अरे मंधत्री, ब्रह्माने राजा तयार केला कमजोराना मदत करण्यासाठी. जर तोंच कमजोरांचे बळी घेऊ लागला तर त्या राज्यात कली फोफावतो. म्हणून राजा कमजोर प्रजेशी विशेष प्रेमाने, आस्थेने व्यवहार करणारा असला पाहिजे. कमजोरांचा उपमर्द करणे सोपे असते त्यासाठी शक्तीची आवश्यकता नसते. जेव्हां राजा त्यांच्याशी आस्थेने व्यवहार करतो तेव्हां लोकपाल देवता (इंद्र, वायू, वरूण, वैश्रावण, अग्नी आणि यम) त्या राजावर संतुष्ट असतात. कमजोर स्वतः बलहीन असले तरी ते जास्त बलवान असतात कारण लोकपाल देवता त्यांच्या भल्याचा सतत विचार करत असतात. जर राजा त्यांच्या कमजोरीचा गैरफायदा घेऊन लागला तर त्या देवता त्या राजाचा विध्वंश करतात यथावकाश. म्हणून राजाने तशा बलहीनांची संपत्ती त्यांच्या कडून काढून घेऊ नये. त्यात राजाच्या नाशाची बीज असतात. सुरूवातीला राजाला

वाटते कीं, तो जिंकला परंतु, प्रत्यक्षात तो त्याच्या नाशाची बीज पेरत असतो. त्या कमजोरात केवळ मनुष्य असतात असे समजू नकोस, त्यात सगळे मुके प्राणी येतात कारण ब्रह्माच्या रचने नुसार राजा सगळ्या त्याच्या राज्यातील जीवांचा त्राता असावा अशी अपेक्षा असते. ज्या राज्यात लोक भिकारी झाले त्या राज्याचा नाश झाला असें समजावे. ज्या राज्यातील शासक लोकांवर कायद्याच्या नांवाने अन्याय करू लागतात त्या राज्याचा नाश जवळ आला हे समजावे. ज्या राज्यात भ्रष्ट द्विज (ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य) नितीमान द्विजांत सहजपणे मिसळून वागू लागतात तेव्हां त्या राज्याचा नाश झाला असेंच समजावे. अन्याय न्याय ठरतो व न्याय अन्याय ठरतो. ते कलीच्या उदयाचे लक्षण समजावे. भ्रष्टांना वेगळे करण्याची ज्या राजात हिम्मत असते तो राजा कलीचा उदय थांबवू शकतो. जे राजा न्यायासाठी त्याच्या मुलाला सुद्धा शिक्षा करतो त्याच्या राज्यात समृद्धीची देवता (वैश्रावण) नांदत असते. जो राजा लोभाच्या मोहामुळें अन्यायाचा मार्ग आचरतो तो राजा त्याच्याच लुच्च्या साथीदारांकडून मारला जातो. गरीबांवर अन्याय करणार्याला राजाने माफ केले तर त्या राजाचा नाश जवळ आला असे समजावे. भक्तीभावाने देवतांची पुजा करणे, त्यांना त्याच्या कामात मदत करण्याचे आवाहन करणे, यज्ञ करणे अशी राजाची इतर कामं असतात. मित्र परिवार वाढवणे, असहाय्य असणार्यांना मदत करणार्यांना मदत करणे, कमजोरांना शक्तीमान करण्याचा प्रयत्न करणे अशी राजाची इतर कामं असतात. राजा लायकांचे सहाय्य करणार व हरामखोरांचा बंदोबस्त करणार असे राजाचे काम असते. शिक्षा करतांना राजा यमाचा अवतार असला पाहिजे. चांगल्यांना मदत करतांना राजा विष्णूचा अवतार असेल. चांगल्यांना मदत करतांना राजा पुण्य जमवत असतो. वाईटांना शिक्षा करतांनासुद्धा राजा पुण्यच जमवत असतो. म्हणून ही दोनही कामं राजासाठी महत्वाची असतात. वाईटांना त्याच्या गयावया करण्याला फसून जर राजा त्यांना माफ करेल तर तो पाप करत असतो. वाईटांच्या कोणत्याही नाटकांनी जो राजा व त्याचे अधिकारी फसतात ते सगळे नरकात जातात राजासुद्धा. ऋषीमुनींचा सत्कार करणे, गुरूजनांचे सन्मान करणे, त्यांना दानं करणे ही राजाची कामं असतात. निष्पाप्यांबद्दल दया, सहानुभूती, क्षमाशिलता, बुद्धिनिष्ठ निर्णय, संयम, तो सदैव सांभाळेल. योग्य व अयोग्य ह्याचे चांगले भान राजाला असले पाहिजे. राजामध्ये बुद्धी

प्रमाणे चतुराई असली पाहिजे. झटपट कामांसाठी त्याला चतुराई उपयोगाची असते व दूरागामी कामांसाठी त्याला बुद्धिनिष्ठ निर्णयांची गरज असते. राजाचा गृहस्थाश्रम फार मोठा असतो. परंतु, राजा व गृहस्थ ह्यांच्या कामात जे साम्य असते ते समजून घेतले तर राजाच्या कामाची व गृहस्थाच्या कामाची तुलना करता त्यातील साम्य तुझ्या लक्षात येईल. राजा फार भोगी असेल तर तो कधीच चांगला राजा होऊ शकत नाही. ज्या तीन गोष्टींची काळजी घ्यावयाची असते, पुण्य, हित आणि सुख त्यातील पुण्य सर्वात जास्त महत्वाचे समजले जाते. त्यानंतर हित आणि शेवटी सुख असते. राजा त्याची वाचा सांभाळून वापरेल तर तो मोठे विजय केवळ बोलण्याने मिळवत असतो. अरे मंधत्री, ह्या सगळ्या गोष्टी तू चांगल्या लक्षात ठेवून तुझे राज्य सांभाळ म्हणजे तू मोठा किर्तीमान राजा म्हणून तिनही जगात ख्यातनाम होशिल.

भिष्म पुढे सांगतात, अशारितीने उतथ्या मंधत्रीला मंत्र देतो. त्या मंत्राप्रमाणे मंधत्री त्याचे राज्य चालवतो. सगळ्या पृथ्वीवर राज्य करतो. तूसुद्धा तसेंच राज्य करावे असे मला वाटते.

शांती पर्व भाग नव्वदावा संपला.

# शांती पर्व

## भाग एक्याण्णवावा

युधिष्ठीर विचारतो, चांगुलपणाची लक्षणं कोणती ते सांगा.

भिष्म सांगतात, त्यासाठी मी तुला एक प्राचीन किस्सा सांगतो तो वामदेवा बद्दलचा आहे. एके काळी राजा वसुमनस ज्याच्या चांगुलपणाची किर्ती होती, तो वामदेवाला प्रश्न विचारतो. "वामदेवजी, मी चांगले वागावयाचे म्हणजे कसे वागावयाचे इतरांशी त्याबद्दल मला प्रबोधन करा".

वामदेव बोलतात, "पुण्याकारक जीवन कसे जगावे ते सांगतो, तशा जीवनापेक्षा जास्त चांगले असे कांहींच नाही. जे पुण्यकारक जीवन जगतात ते सगळी पृथ्वी पादाक्रांत करतात. असे राजे इतर पुण्याकारक जीवन जगणार्याचे ऐकत असतात. जो राजा पुण्यकारक कार्य पद्धती नाकारून क्रूरपणा त्याची कामं करतो, त्याचा लवकरच र्हास होतो. जो राजा विकृत मनोवृत्तीच्या लोकांच्या नादी लागून लोकांशी वाईट वागतो त्याला त्याचीच प्रजा मारून टाकते. जो राजा गर्वाने फुगून इतरांशी विनाकारण उन्मत्तपणे वागतो त्यासा त्याच्याच लोकांच्या विरोधाला तोंड द्यावे लागते मग तो कितीही मोठा राजा कां असेना. परंतु, जो राजा त्याच्या मर्यादा चांगल्या ओळखून त्याची कामं करतो तो सदोदीत उत्कर्षाकडे जात रहातो. पुण्याचा मार्ग चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदयेच्या मार्गाने जात असतो. म्हणून त्या तीन जो राजा त्याच्या काम करण्यात अंगिकारत असतो तो धन्य होतो. विशेष करून न्याय देण्याचा चाबूक वापरतांना त्याला विशेष सतर्क असावे लागते.

- कोणाच्याही अज्ञानाचा, गरीबीचा, भोळेपणाचा, कमजोरीचा गैरफायदा न घेणे ह्यालाच **माणूसकी** असें म्हणतात. *ह्यात सत्पात्र व अपात्र ह्याचा विचार करावा लागतो. ह्याच्या विरुद्ध जे वागणे त्याला अमानुषपणा असे म्हणतात.*
- मला समाजाने कसे वागवावे असें मला वाटते, तसेंच मी समाजातील लोकाशी वागणे ह्याला **चांगुलपणा** असें म्हणतात. *ह्यात सत्पात्र व अपात्र ह्याचा विचार करावा लागतो. ह्याच्या विरुद्ध जे वागणे त्याला वाईटपणा असे म्हणतात.*

- सर्व प्राणिमात्रांबद्दल सन्मानाची भावना बाळगून त्या प्रमाणे जगणे आणि सर्व प्राणिमात्रांचा आदर करणे ह्याला **भूतदया** असें म्हणतात. सर्व प्राणिमात्रांत परमेश्वर आहे हे लक्षात घेऊन तो त्यांच्याशी वागतो. ते तुच्छ आहेत असें समजून जो वागतो तो पापकारक समजला जातो.
- "जीवो जीवस्य जीवनम्", ह्या वैश्विक नियमानुसार खाण्यासाठी प्राणी मारतांना त्यांची क्षमा मागून व त्याचे नंतरचे जीवन सुखी होवो अशी प्रार्थना करावयाची असते. त्यांच्या बद्दल आदरभाव असला पाहिजे, नाही तर तो मांसाहार पापकारक समजला जाईल.

जो हे तीन नियम पाळून त्याचे जीवन जगतो तो पुण्यवंत समजला जातो. दुष्टपणा, क्रौर्य, बेपर्वाई, अनादर करण्यात धन्यता मानणे, असे जो वागतो न्याय देण्याच्या कामात तो स्वतः अन्याय करत असतो. परंतु, दुष्टाशी दुष्ट, क्रूराशी क्रूर, बेपर्वाईशी बेपर्वाई असे वागणे न्याय कारक समजले जाते. जशास तसे हा पुण्य मार्ग समजला आहे. जो दुष्टाला प्रेम देतो, क्रूराला दया देतो व बेपर्वाईकडे दुर्लक्ष करतो तो पापाला मदत करणारा ठरतो. सगळी प्रजा राजाचे वागणे निरीक्षित असते ह्याचे भान राजाने ठेवावयाचे असते. पापी लोक राजाच्या माणूसकीचा गैर फायदा घेण्याचा प्रयत्न करत असतात त्याचे भान ठेवून राजा त्याचे वागणे सावध ठेवेल. त्यासाठी राजा शहाणा असला पाहिजे. जेव्हां राजा चांगुलपणा, माणूसकी व भूतदया दाखवतो तेव्हां सगळे तसेंच वागतात व त्या राज्याचा पुण्यप्रभाव वाढत जातो. तसे झाले कीं, त्या राज्यात गुणीजन जन्म घेतात, परंतु, जो राजा तसे वागत नाही त्याची प्रजासुद्धा तशीच भ्रष्ट होते व अशा राज्यात पापात्मे जन्म घेतात. सगळे चांगले लोक ते राज्य सोडून जातात.

शांती पर्व भाग एक्याण्णवावा संपला.

# शांती पर्व

## भाग ब्याण्णवावा

वामदेव पुढे सांगतात, राजा प्रबळ झाला कीं, त्याचा चांगुलपणा, माणूसकी व भूतदया लोप पावते कारण तो स्वतःला श्रेष्ठ समजू लागतो त्याचा अहंकार भ्रष्ट झालेला असतो. त्याच्या प्रमाणे त्याचे सहकारी वागू लागतात, त्याची मुलं वागू लागतात, थोडाकाळ ते चांगले चालते पण यथावकाश तो राजा व त्याचे राज्य बरबाद होते. राजाकडे सामान्य माणसें आदर्श म्हणून पहात असतात म्हणून त्याचे भान ठेवून राजाने व त्याच्या सगळ्या कारभार्यांनी आपले वागणे निर्दोष ठेवले पाहिजे. जो राजा समजतो कीं, तो राजा आहे म्हणून तो कांहींही करू शकतो, कांहींही वागू शकतो तर ते चुकीचे असते कारण राजावर देवतांचा ताबा असतो. त्या देवता कांहीं काळ ते सहन करतात पण फार काळ ते चालत नाही. राजे त्या लोकपाल देवतांच्या रोषाला बळी ठरत असतात. म्हणून राजा मर्यादांचे भान ठेवून त्या लोकपाल देवतांचे आपल्यावर लक्ष आहे ते ध्यानात घेऊन, जर त्याची काम करील तर तो यशस्वी होईल. जे नियम राजाला लागू असतात ते नियम सगळ्या क्षत्रियांना त्यांच्या कुवतीनुसार व जबाबदारी प्रमाणे लागू होत असतात. जो शत्रू पापमय नाही अशा शत्रूशी राजा वरील नियमांनुसार वर्तन ठेवतो. त्यामुळें तो शत्रू मित्र होऊ शकतो. राजा त्याच्या बळाचा गैर वापर करणार नाही. त्या राजावर त्याची प्रजा व शेजारील राज्याची प्रजासुद्धा माया दाखवू लागते. राजाची ख्याती पसरते. चांगले लोक त्याच्या राज्यात त्याच्या आश्रयाला येऊ लागतात. असा राजा न्याय देतांना प्रामाणिकपणा दाखवतो. राजा त्याच्या प्रजेला खोटी आश्वासनं देणार नाही. राजा प्रतिष्ठीत भाषा वापरून बोलेल. राजा हास्यविनोद जनतेत करणार नाही. कोणी योग्य हास्यविनोद केले तर राजा फक्त स्मित करून त्याला दाद देईल. राजाचे वागणे निर्दोष असले पाहिजे. कोणाला त्यावर कुचेष्टा करण्याची संधी मिळणार नाही असें त्याचे सगळे वर्तन असले पाहिजे. राजा त्यांच्या सेवकांची चांगली काळजी घेईल. राजा गुणी लोकांचा संग्रह करून त्यांचे विचार ऐकण्यात त्याचा विश्रांतीचा समय व्यतित करील. राजा त्याच्याशी प्रामाणिक असलेल्या सेवकांची चांगली खातरजमा करत असेल. त्यांच्या लहान मोठ्या अपेक्षा तो

पूर्ण करील. अशा वागण्यामुळे राजाच्या चाहत्या सेवकांची संख्या वाढत जाईल. राजा त्याच्या नालायक मित्रांच्या सल्ल्याचा विचार करणार नाही. राजा प्रथम स्वताचे संरक्षण तपासून घेईल त्यानंतर इतरांचे संरक्षण करील. नशापाणी, द्युत, शिकार, बायका अशा नादात जास्त रमणार नाही. जे त्याचे मित्र अशा गोष्टींकरता राजाकडे आग्रह करतील तशा मित्रांपासून राजाने सावध रहावे. राजाचे हेरखाते त्याच्या व शेजारच्या राज्यात पसरलेले असले पाहिजे. ते राजाला सावध करण्याचे काम करतील. त्या कामात राज्यातील वैश्य त्याला मदत करतील. राजा त्याच्या गुप्त आणि उघड शत्रूंचे वध असे घडवून आणिल की ते स्वाभाविक मृत्यू आहेत असेच वाटेल. अशा प्रकारे राजा त्याच्या शत्रूंचा नाश युद्ध न करता करू शकेल. त्यासाठी राजा नायकीणींचा, कलावंतीणींचा, नागकन्यांचा उपयोग करील. राजा त्याच्या गुप्त शत्रूना नशापाणी, द्युत, शिकार, बायका अशा नादात अडकवण्याचा व त्याद्वारा संपवण्याचा प्रयत्न करील. राजा त्याचे किल्ले, खजिने, बाजारपेठा, वेशींचे चांगले संरक्षण करील व त्यांच्या कामाकडे चांगले लक्ष देईल. त्यासाठी राजा इमानदार सेवक त्याच्या सेवेत ठेविल ज्यांची तो चांगली खातरजमा करील ज्यांमुळे ते उत्तम काम करतील. राजा त्याच्या सेवकांच्या क्षम्य चुकांना माफ करील परंतु, अक्षम्य चुकांकरता त्याना दंड करील. राजा त्याच्या सेवकांचे फाजिल लाड करणार नाही. राजा त्याच्या प्रजेत सणासुदीच्या निमित्ताने मिसळून त्यांच्याशी संपर्क पक्का करील. राजाच्या मतापेक्षा वेगळे मत असलेल्यांचा राजा धिक्कार करणार नाही, राजा त्यांचे ते मत तसे कां आहे ते समजून घेण्याचा प्रयत्न करील. त्या वागण्याने राजाबद्दलचे प्रजेचे मत सोयिस्कर राहील. राजा त्याच्या आत्मप्रौढीमुळें त्याच्या सल्लागारांचा अपमान करील त्याला कालांतराने मोठ्या संकटाला तोंड द्यावे लागते. राजा दुसर्यांच्या मतांचा सन्मान करील. राजा कोणाचे मत ऐकेल हे त्या माणसाच्या पूर्व कर्तृत्वावर, कुळांवर, वर्णावर आणि वयांवर अवलंबून असेल. राजाला धोका असतो अशा लोकांपासून ज्यांना राजाने शिक्षा केली आहे, कलावंतीणी कडून, डोंगरदर्यांकडून, सापापासून, पिसाळेल्या हत्तीपासून, घोड्या पासून, तोंडावर स्तुती करणार्यांपासून म्हणून त्या सगळ्यांबद्दल राजा सावध असेल. कुळहीन, व्यसनी, परका अशां लोकांपासून राजा सल्ला घेणार नाही. फार रागावणारा, व्यसनी, दुराग्रही असा राजा त्यांच्या राज्याचा नाश करतो. राजा लोकांची

ऐपत पाहून त्या प्रमाणे कर लावेल. राजा वैश्यांशी भागिदारी करून त्यांच्या व्यवसायाच्या फायद्यात हिस्सा मिळवून त्याचे उत्पन्न वाढवेल. राजा परदेशी व्यापार करणार्या वैश्यांना विशेष उत्तेजन देईल. जो राजा भावनाविवश होतो तो त्याच्या कामात चुका करतो म्हणून राजा फार भावनाविवश होणारा नसावा कारण, भावनाविवशता माणसा कडून अक्षम्य चूका करवून घेते. राजाला त्याच्या सामर्थ्याचा गर्व नसावा. अशाप्रकारे वामदेव राजाच्या कामांबद्दलचे तंत्र सांगतो.

शांती पर्व भाग ब्याण्णवावा संपला.

# शांती पर्व
## भाग त्र्याण्णवावा
वामदेव पुढे सांगतात, राजा त्याच्या मुत्सद्देगिरीने त्याचे राज्य वाढवू शकला पाहिजे. युद्ध करण्याची आवश्यकता नसावी अशाप्रकारचे त्याचे काम असले पाहिजे. ज्या राजाचे स्वताचे राज्य असुरक्षित आहे तो दुसर्या राज्यावर स्वारी करणार नाही. प्रथम राजा त्याचे राज्य समृद्ध करील व त्यानंतर तो शेजारील कमी प्रबळ राज्यावर स्वारी करील. ज्या राजाचे महसुली उत्पन्न चांगले आहे, ज्याच्या कडे उत्तम अधिकारी आहेत, ते राज्य दुसर्या राज्यावर स्वारी करण्यास योग्य झाले असे समजले जाते. ज्या राजाचे लष्कर समाधानी आहे त्या राजाला दुसर्या राज्यावर स्वारी करण्यास हरकत नाही. ज्या राज्यातील प्रजा त्यांच्या राजावर संतुष्ट आहे त्या राज्यावर स्वारी करणे योग्य नसते. ज्या राज्यात प्रजा त्यांच्या राजावर नाखूष आहे त्या राज्यावर स्वारी करावयाची व ते जिंकून त्या राज्यात चांगले राज्य आणावे अशा उद्देशाने स्वारी केली तर ते धर्मयुद्ध ठरते. केवळ लुटण्यासाठी स्वारी करणारा राजा पापी समजावा, त्याला लोकपाल देवांची मदत होत नाही. राजा हा ब्रह्मांचा, इंद्राचा प्रतिनिधी म्हणून राज्य करील तर तो पुण्यवान राजा समजावा. पापी राजाचा नाश त्याचा वध करून मग ते राज्य सुखी करण्याच्या उद्देशाने ताब्यात घेणारा राजा इंद्र समजला जातो. राजाने स्वारी करण्या आधी त्याच्या उद्देशाचे संशोधन त्याच्या न्यायाधीशाकडून करून घ्यावे. त्यात पाप उद्देश नाही असे स्पष्ट झाल्यावर मगच स्वारी करावी. अशा शुद्ध बुद्धीने जो राजा स्वारी करतो तो खरा यशस्वी राजा समजावा. ते वामदेवाचे ऐकल्यावर राजा वसुमानस त्याप्रमाणे त्याचे राज्य करतो. अरे युधिष्ठीरा, तू सुद्धा तसेंच राज्य कर व पृथ्वीवरचा इंद्र हो.

शांती पर्व भाग त्र्याण्णवावा संपला.

# शांती पर्व
## भाग चौर्याण्णवावा

युधिष्ठीर विचारतो, मला सांगा, जर एक क्षत्रिय दुसर्या क्षत्रियाला पराभूत करू इच्छित असेल तर त्या विजयानंतर त्या विजेत्या क्षत्रियानी हरलेल्याशी कसे वागावे असे सांगितले आहे.

भिष्म सांगतात, ज्या राजाचा पराभव त्याला करावयाचा आहे त्या राजाच्या राज्यात तो जिंकू इच्छाणारा राजा जाऊन तेथील प्रजेला सांगेल कीं, तो आता त्यांचा राजा झाला आहे. त्यानंतर तो त्या प्रजेला आश्वासन देईल कीं, तो त्यांचे सर्वतोपरी संरक्षण करण्यास ह्यापुढे बांधलेला आहे. जर ती प्रजा त्याला त्यांचा राजा म्हणून स्वीकारते तर त्या राजाला त्या राज्याच्या राजाशी युद्ध करण्याची आवश्यकता नसते. परंतु, जर त्या लोकांनी त्याला राजा म्हणून मान्यता दिली नाही व ते त्याच्यावर चाल करून जातात तर मात्र त्याला युद्ध करून ते राज्य काबिज करावे लागेल.

युधिष्ठीर विचारतो, त्यानंतर तो स्वारी करणारा राजा काय करेल ते सांगा.

भिष्म सांगतात, जर क्षत्रिय सशस्त्र नसेल तर त्याच्यावर चाल करता येणार नाही. एकाने एका बरोबर लढावयाचे असते. जर प्रतिस्पर्धी थकला तर त्याच्याशी लढावयाचे नसते. त्याच्यावर छुपा हल्ला करणे अयोग्य मानले आहे युद्ध शास्त्राप्रमाणे. जर शत्रू लुच्चेगिरी करून लढत असेल तर त्याच्याशी तशीच लुच्चेगिरी करून लढावयाचे असते. जशास तसे हा न्याय युद्धात कायम असतो. जर शत्रू सरळ लढत असेल तर आपल्याला सुद्धा तसेच लढावे लागते. रथा बरोबर रथ, गदायुद्धा बरोबर गदायुद्ध, राजा बरोबर राजा, घोडेस्वारा बरोबर घोडस्वार अशी बरोबरीची लढाई करावयाची असते. त्याला धर्मयुद्ध असे म्हणतात. जर प्रतिस्पर्धी खाली पडला तर त्याच्यावर वार करावयाचा नसतो. तो तसाच पडून राहीला तर त्याला सोडून द्यावयाचे असते. तो हरला असे समजावयाचे असते. तलवार, गदा ह्यांचे वार कमरे खाली मारावयाचे नसतात. जर प्रतिस्पर्धी पळून जाऊ लागला तर तो हरला असे समजावयाचे असते. त्याचा पाठलाग करण्याची गरज नसते. युद्ध हरवण्यासाठी असते ठार मारणे आवश्यक समजले जात नाही. क्रोध, गर्व, द्वेष अशा

दुषित भावनाने प्रेरित होऊन लढावयाचे नसते कारण तसे युद्ध पापकारक समजले जाते. जो क्षत्रिय निपुत्रिक आहे त्याला ठार मारावयाचे नसते. जखमी प्रतिस्पर्धी आपल्या गोटात लढत असेल तर त्याला आपल्या वैद्यांनी औषधपाणी करायला पाहिजे, जर तो त्यांच्याच गोटात असेल तर त्याला तसेंच सोडून द्यावयाचे असते. बाणाने मेलेला शत्रू स्वर्गात गेला असे समजले जाते. शत्रूपक्षाच्या सैनिकांना जखमी असल्यास दवा दारू करण्याची जबाबदारी आपली असते. त्यानंतर त्याला सोडून द्यावयाचे असते. अशा वागण्यामुळे शत्रूचे सैनिक आपल्याला सामील होतील असे पहावयाचे असते. शत्रूच्या राजाचे सैन्य त्यामुळें आपलेसे होते ती एक युद्धनिती म्हणून सांगितली आहे. त्यांच्याशी चांगले वागावयाचे असते. अशा युद्धाना धर्मयुद्ध म्हणतात असे मनू सांगतो. पाप न करता युद्ध झाले पाहिजे. नाहीतर तो राजा पापी ठरतो. जो राजा लुच्चेगिरी करतो व त्याचे सैनिकसुद्धा तसे वागतात ते जर मारले गेले तर स्वर्गात जात नाहीत, ते नरकात जातात. तेथे खितपत पडतात अनंतकाळ. पापी माणसापुढे हार मानणे त्याच्या लुच्चेगिरीला सहन करणे ही पाप करण्यासारखी गोष्ट असते. जशास तसे ह्या कायद्याप्रमाणे लुच्चेगिरीला लुच्चेगिरीने जाब देणे पुण्य करण्यासारखे समजले जाते. परंतु, आपण लुच्चेगिरीची सुरूवात केली तर ते पापकारक असते.

राजा पाप न करता लढेल, त्याची जीत आणि पुण्यप्रभाव दोनही सारखेच महत्वाचे असतात त्याच्यासाठी व त्याच्या राज्याच्या भल्यासाठी.

शांती पर्व भाग चौर्याण्णवावा संपला.

# शांती पर्व
## भाग पंच्याण्णवावा

भिष्म सांगतात, राजा पाप मार्गाने कधीही राज्या जिंकण्याचा प्रयत्न करणार नाही जरी, अशा जिंकण्याने तो सगळ्या पृथ्वीचा मालक होणार असला. पाप मार्गाने मिळालेल्या राज्यापासून त्याला कोणते सुख मिळणार असते? अशा विजयात पापाचा वाटा असल्यामुळें तो स्वर्गात कधीच जाऊ शकणार नाही. अशा विजयात पाप शक्तींचा वाटा असतो व त्या प्रमाणे त्या पापशक्ती त्याच्या राज्यात कलीचे प्रस्थान वाढवण्याचे काम करत असतात. ज्या प्रतिस्पर्ध्याने शस्त्रं टाकली आहेत, जो हात जोडून क्षमेची भीक मागत आहे, त्याला अटक करावयाचे असते परंतु, ठार मारावयाचे नसते. अशारितीने अटक झालेल्या राजाला कैदेत ठेवून त्याच्या कडून तो तुझा गुलाम आहे असे वदवून घ्यावयाचे असते. तसे तो करतो तर त्याला मांडलिकाचा मान देऊन त्याच्या राज्यात परत पाठवावयाचे असते. जिंकणारा राजा शत्रूच्या स्त्रियांना कैद करून त्याना त्यांच्या लोकांशी लग्न करण्याचा आग्रह करावयाचा असतो. ते त्यांनी मानले तर त्या स्त्रिया त्यांच्या बायका म्हणून सुखाने राहू शकतात. नाही तर त्या स्त्रिया गुलाम म्हणून बाजारात विकल्या जातील मग ती राजाची राणी जरी असली तरी. त्या राजाच्या गुलामाना सुद्धा तसे सांगितले जाईल व जर ते विजयी राजाचे गुलाम म्हणून रहाण्यास तयार असतील तर ठीक, नाहीतर त्यांना गुलामगिरीतून कायम सुटका केली जाईल. शत्रूचे पशुधन राजा ब्राह्मणांना दानं करील अथवा विकून युद्धाचा खर्च वसूल करील. चोरा कडून मिळालेली संपत्ती राजा लिलावात विकून ते पैसे राज्याच्या खजिन्यात जमा करील. राजा जिंकलेल्या राज्यातील प्रजेला त्रास देणार नाही. तो त्यांच्याशी मोठ्या आत्मियतेने वर्तन ठेवील व त्यांचे मन जिंकण्याचा प्रयत्न करील. जे त्या राजाला स्वीकारतील त्यांना राजा विशेष चांगल्या प्रकारे वागवेल. युद्धात राजा राजाशी लढेल. सामान्य सैनिक सामान्य सैनिकांशी लढतील. जर दोनही राज्यातील ब्राह्मण युद्ध बंद व्हावे असे आवाहन करतील तर ते युद्ध ताबडतोब थांबले पाहिजे असे मनू सांगतो. जो क्षत्रिय ब्राह्मणांवर वार करील, त्याचा खून करील, तो पापी म्हणून जाहिर केला जाईल व त्याला शुद्र समजले जाईल. जे क्षत्रिय

ब्राह्मण योद्ध्याशी लढतील व त्यात हरतील ते शुद्र म्हणून रद्द केले जातील व त्यांचे क्षत्रिय म्हणून जे अधिकार आहेत ते समाज काढून घेईल. त्याला शस्त्रं चालवता येणार नाहीत, तो घोड्यावर बसू शकणार नाहीत, ते उंची वस्त्रं नेसू शकणार नाहीत. त्याने फाटके कपडे घातले पाहिजेत. तो वेदाभ्यास करू शकणार नाही. ते क्षत्रिय म्हणून राजाच्या सैन्यात काम करू शकणार नाहीत.* म्हणून क्षत्रिय ब्राह्मणांशी लढणार नाहीत व न लढताच पराजय स्वीकारतील. त्यानंतर ब्राह्मण त्याला माफ करील असे मनू सांगतो. जिकलेल्या राजाला जिंकणारा राजा प्रेमाने वागवेल. त्यामुळे जिंकणार्या राजाची प्रतिष्ठा वृद्धींगत होईल. जे हरलेले पळून जातील ते जिंकणार्या राजाच्या शत्रूला मिळतील व त्या जिंकलेल्या राजाचे वाईट दिवस कसे येतील त्याच्यासाठी कारवाया करत असतील, जेव्हां तो राजा कमजोर होईल तेव्हां ते त्याच्यावर चालून जातील व त्याचा पराभव करतील. जिंकणारा राजा जिंकलेल्या राज्यातील लोकांना चांगले वागवून त्यांचे मन जिंकेल. तसे न करता जर तो राजा त्या प्रजेशी वाईट वागू लागला तर देवता त्याच्यावर अप्रसन्न होतील व यथावकाश तो नष्ट होईल. ज्या राजाकडे धनदौलत भरपूर आहे, त्याची प्रजा त्याला अनुकूल आहे, त्याचे सैन्य प्रबळ आहे असा राजा बलवान समजला पाहिजे. ज्या राज्याकडे चांगले विद्वान ऋद्विज आहेत, चांगले मांत्रिक आहेत असा राजा देवतांना प्रसन्न करण्यात यशस्वी होतो. एक प्राचीन राजा प्रतर्दन ह्याने राज्ये जिंकली परंतु, त्यातील लोकांना त्यांने हात लावला नाही, फक्त त्यांचे धान्य आणि औषधी वनस्पती नेल्या तो इंद्राच्या पदाला गेला. कारण ते त्याचे करणे योग्य होते. राजा देवोदास त्याच्या शत्रूचा पराभव केल्यानंतर त्यांचे यज्ञाचे साहित्य नेले म्हणून तो जिंकून सुद्धा पराभूत असे ब्राह्मणांनी सांगितले कारण त्याचे ते करणे अयोग्य होते. राजा नभाग जिंकल्यानंतर ते राज्य ब्राह्मणांना दान केले म्हणून त्याला ब्राह्मणांनी जिंकलेला म्हणून मान्य केले. अरे युधिष्ठीरा, त्याला सगळ्या प्राचीन काळातील राजात श्रेष्ठ समजले जाते. लुच्चेगिरी न करता राजा युद्ध जिंकेल तर तो मोठा समजला जाईल. जिंकल्यानंतर जर राजाला त्याचा गर्व झाला तर तो नरकात जाईल. शांती पर्व भाग पंच्याण्णवावा संपला.

- **आपल्या देशातील सगळेच शुद्र (दलित), मुळचे क्षत्रिय आहेत त्याना फसवून भ्रष्ट ब्राह्मणांनी शुद्र ठरवलेले आहे.**

# शांती पर्व

## भाग श्याहण्णवावा

युधिष्ठीर विचारतो, "क्षत्रियांच्या कामात जेवढे पाप सामावलेले आहे तेवढे पाप इतर तीन वर्णात नाही. युद्धात ते मोठ्या प्रमाणात वध करत असतात, असे असतांना त्याना त्यातून पुण्य कसे प्राप्त होते? मला त्याचे समाधान कारक उत्तर द्यावे".

भिष्म सांगतात, भ्रष्ट आणि वाईट लोकांचा नाश करण्यामुळे अध्यात्मिक उर्जा वाढते, त्यामुळे ते पुण्यकारक समजले जाते. त्याशिवाय दानं करून व लोकांची सेवा करून तो पुण्य प्राप्त करत असतो. एक मात्र खरे कीं, युद्धात वाईटांबरोबर चांगलेसुद्धा मारले जातात परंतु, ते क्षम्य समजले गेले आहे कारण, सुक्या बरोबर ओले जळणारच, तो निसर्गाचा नियम आहे. जर राजा स्वताच्या हव्यासामुळे युद्ध करत असेल तर ते अक्षम्य समजले गेले आहे. फक्त वाईटांच्या नाशासाठी तो युद्ध करील. चांगल्या राजांबरोबर तो दोस्ती करून जगातील चांगुलपणा वाढवण्याचे काम करत असेल. शेती करतांना तणांचा नाश करावा लागतो तसे युद्धाचे असते. त्यासाठी दुःख करणारा मूर्ख समजला जातो. जगात वाईटपणा भरपून आहे त्याचे नियंत्रण युद्धानेच करावे लागते. क्षत्रिय त्याच्या राज्या प्रमाणे बाह्य राज्यातील वाईट लोकांवर सुद्धा नजर ठेवून काम करणारा असला पाहिजे कारण, राजाचे कार्य केवळ त्याच्या राज्या पुरते मर्यादीत नसते. तो इंद्राचा प्रतिनिधी म्हणून सगळ्या जगाचे भले करण्यासाठी बांघलेला आहे. त्या करता तशा परिस्थितीत जर तो दुसर्या मुलूखात लढण्यासाठी गेला तर ते योग्यच समजले जाते. अशारितीने जो राजा त्याचे क्षात्र कर्तव्य करतो तो पुण्यात्मा ठरतो. तो इंद्राच्या दरबारात मानाने जातो.

ब्राह्मणांच्या संरक्षणासाठी जो राजा लढतो व त्याचे प्राण घालवतो तो यज्ञातील आहूती सारखा समजला जातो. ते करता लढतांना तो जितके दुरात्मे त्याच्या बाणांने मारतो तितके पुण्य त्याला मिळत असते असे समजले जाते. जो राजा मात्र भ्रष्ट ब्राह्मणांच्या नादी लागून सज्जनांचा संहार करतो तो नरकात जातो. म्हणून राजाने ते पहावयाचे असते कीं, तो खर्या ब्राह्मणांचेच संरक्षण करत आहे. भल्यांच्या हितासाठी राजा जेवढे कष्ट करील तेवढे त्याचे पुण्य वाढत जाते. त्या त्याच्या कर्माला राजाची तपस्या असे समजले जाते.

सज्जन परंतु, कमजोर लोकांचे संरक्षण करणारा क्षत्रिय ते करतांना जी हत्त्या करतो त्याने त्याला पुण्य लाभत असते. सज्जन परंतु, कमजोर लोकांना अभय दान करण्याने तो पुण्य मिळवत असतो. पाप व पुण्य त्या कृत्याच्या उद्देशावर अवलंबून असते त्यात कोणी मारले गेले किंवा कसे त्याला महत्व नसते. मृत्यू हि एक नैसर्गिक बाब आहे त्याचा जास्त बाऊ करण्याचे कारण नसते. युद्धात मरणाला भिणारा खरा क्षत्रिय समजला जात नाही. जो क्षत्रिय लढण्याला घाबरतो व अन्याय सहन करतो, त्याला मृत्यूदंडाची शिक्षा मनू सांगत आहे. क्षत्रियाचा मृत्यू रणांगणातच झाला पाहिजे व त्याचे मृत शरीर गिधाडानी खाल्ले पाहिजे तर तो स्वर्गात जातो. म्हणून युद्धभूमीवर मरून पडलेले योद्धे धन्य समजले जातात. गिधाड ज्यांना खातात ते धन्य झाले असे प्राचीन ऋषी सांगतात. क्षत्रियांच्या जगण्यापेक्षा मरण्याचे महत्व जास्त आहे त्याची भिती जो बाळगतो तो क्षत्रिय समजला जात नाही. शय्येवर रोगाने जर्जर होऊन मरणे क्षत्रियांसाठी अयोग्य समजले गेले आहे. अंगावर जखमा घेऊन लढणारा खरा इंद्राचा साथीदार म्हणून स्वर्गाचा मानकरी समजला जातो. क्षत्रियाला वीरमरण सांगितले आहे म्हणून तुझा प्रश्न निष्कारण आहे युधिष्ठीरा. वीरमरण घेणारा क्षत्रिय अनेक यज्ञ केल्याचे पुण्य प्राप्त करत असतो. ज्या क्षत्रियाला तसा मृत्यू मिळत नाही तो दुर्दैवी समजला जातो. अन्याया विरुद्ध लढणार्या क्षत्रियाला जे भाग्य प्राप्त होते ते अनेक वर्षे तपस्या करणार्या ऋषीलासुद्धा प्राप्त होत नाही. म्हणून क्षत्रिय कर्म तू समजतोस तसे धिक्कार करण्या सारखे नसते. तू त्या गैरसमजातून तुला बाहेर काढ. बेडरपणे लढणारा राजा (क्षत्रिय) श्रेष्ठ समजला जातो. त्यात वाईट वाटण्यासारखे कांहींच नसते. म्हणून क्षत्रिय ब्राह्मणांहून श्रेष्ठ असे कांहीं ऋषी सांगतात.
शांती पर्व भाग श्याहण्णवावा संपला.

# शांती पर्व

## भाग सत्त्याण्णवावा

युधिष्ठीर विचारतो, "युद्धात मेलेले योद्धे मृत्यूनंतर कोणत्या लोकांत जातात ते सांगा"?

भिष्म सांगतात, ह्या संदर्भात मी तुला एक प्राचीन किस्सा सांगतो. तो इंद्र आणि राजा अंवरीष ह्यांच्यातील संभाषणाचा आहे. अंवरिष राजर्षी नभगाचा मुलगा होता. तो मेल्यानंतर मोठ्या मुष्कीलीने मिळणार्या स्वर्गात गेला तेव्हां तो तेथे त्याचे सरसेनापती एका सुंदर रथातून फिरत असलेले पहातो. ते पाहून कीं त्याचा सरसेनापती सुदेव कसा त्या फार मुष्किलीने मिळणार्या लोकांत सहज फिरत आहे. अंवरिष आश्चर्य चकित होतो व इंद्राला विचारतो, मी सर्व जगाला जिंकल्यावर क्षत्रियांची सगळी कर्तव्ये केल्यानंतर व्रतस्थ जीवन जगल्यानंतर आणि सगळी अनुष्ठानं केल्यानंतर आणि ब्रह्मचर्य पालन केल्यानंतर, माझ्या गुरूजनांची सेवा केल्यानंतर, सगळ्या ज्येष्ठांची सेवा केल्यानंतर, वेदाचा अभ्यास केल्यानंतर, सगळ्या अतिथींचे समाधान केल्यानंतर, पितरांचे श्राद्ध केल्यानंतर, सगळ्या धर्मग्रंथांचे ज्ञान प्राप्त केल्यानंतर, अनेक यज्ञ केल्यानंतर, क्षत्रिय कर्तव्ये व्यवस्थितपणे पार पाडल्यानंतर, अनेक युद्धे जिंकल्यानंतर असे सगळे केल्यानंतर मला स्वर्गात प्रवेश मिळाला आहे, आणि आता मी पहातो कीं, माझा सरसेनापती एवढे सगळे केलेले नसतांना माझ्यापुढे कसा गेला आहे ते कळत नाही. तो मोठा योद्धा होता हे मला मान्य परंतु, तेवढ्याने तो असा कसा उच्च पदाला जाऊ शकतो ते मला समजत नाही. त्याने कधी साधे यज्ञ केल्याचे ऐकिवात नाही. त्याने कधी ब्राह्मणांना दानं केल्याचे मी पाहिलेले नाही. तरी तो माझ्या पुढे कसा जाऊ शकला ते समजत नाही.

इंद्र बोलतो, तुझ्या सरसेनापतीने युद्धाचा मोठा यज्ञ केला होता. जे युद्धात लढतात व त्यात जखमा झेलत मरतात ते सगळे असे चटकन स्वर्गात जातात. कारण त्यांचे मृत शरीर गिधाडांनी खाल्ले होते. युद्ध खेळणे हा एक मोठा पराक्रमी यज्ञ असे मानले जाते. प्रत्येक प्राणपणाने लढणारा तो यज्ञ करत असतो. असे सगळे योद्धे त्या यज्ञाचे सारखे भागिदार असतात.

अंवरिष विचारतो, "अशा यज्ञात अर्घ्य कसले असते? तशा यज्ञात पाणी कोणते असते? दक्षिणा काय व कोण घेते? त्यांचे ऋग्विद कोण असतात? ते सगळे मला सांग कारण तू शंभर यज्ञ केले आहेस.

इंद्र सांगू लागतो, युद्धातील हत्ती ऋग्विद असतात, घोडे अर्घ्य असतात, शत्रूचे मांस आणि रक्त यज्ञातील पाणी असते, ते मांस खाणारे कोल्हे, लांडगे आणि गिधाडं सदस्य असतात त्या यज्ञात. कारण ते यज्ञातील सगळे खाऊन फस्त करत असतात. युद्धात वापरलेली अस्त्रं, शस्त्रं, रथ, वगैरे त्या यज्ञाचे जिने असतात. तलवारी, भाले, बाण, गदा इतर सामुग्री असते. त्या लढाईत जे युद्ध होते तो त्या यज्ञाचा अग्नी असतो. युद्धात होणारे शस्त्रांचे आवाज, घोड्यांचे खिंकाळणे, हत्तीचे चित्कार त्या यज्ञाचे साम मंत्र असतात. त्यांमुळे यमाच्या घराचे दरवाजे उघडले जातात. पहिल्या आघाडीचे सैनिक पहिली आहूती असतात, त्यात भाग घेणारे सगळे श्वापदं त्यांच्या ज्वाळा असतात, युद्धात मारलेले त्यांची शरीर यज्ञाची संमीधा असते. हत्तींचे चित्कार जेव्हां त्याना बाण लागतात व ते मरतात ते ईडा मंत्र असतात, रणांगणात जी वाद्ये वाजवली जातात ती यज्ञाचे वशट असतात. ब्राह्मणाच्या संपत्तीचे संरक्षण करणारा त्यात मरतो त्याला यज्ञातील उदगत्री समजले जाते. कारण अशा मरणार्याला पूर्ण यज्ञ केल्याचे पुण्य लाभत असते. जे योद्धे युद्धातून पळून न जाता लढत रहातात ते माझे खास मानकरी असतात. ते माझ्या उच्च दर्जाच्या लोकांत प्रवेश मिळवतात. ज्या योद्ध्यांमुळे रक्ताचे पाट वहातात ज्यामध्ये माणसाचे व हत्ती आणि घोड्यांचे मांस वहात असते व त्यांचे रक्त मुख्य प्रवाह असते, त्यात मेलेले लोक, त्यांचे अवयव, प्राण्यांचे रक्त आणि मांस व त्यांचे अवयव वहात असतात, योद्ध्यांचे केस शेवाळ्यासारखे पसरलेले असतात अशा रक्ताच्या नद्या निर्माण करणारे माझे खास मानकरी असतात. त्यांना खास वरच्या लोकांत जाण्याची परवानगी असते. कारण असे रक्ताचे पाट पहाणारे योद्धे त्या यज्ञाची अखेरची आहुती देत असतात. त्या यज्ञरुपी युद्धात मेलेल्या लोकांचे देह हेंच वेदी असतात. ऋषी सांगतात, जे योद्धे शत्रूच्या फौजाना त्यांचे राणीवास समजतात व त्यात घुसतात, ते दक्षिणेकडे उभे असलेले सदस्य समजतात व उत्तरेकडे असलेले अंगिरस समजतात. अशारितीने बिनधास्तपणे लढणारे माझे खास मानकरी असतात. जे मात्र घाबरून शत्रूला पाठ दाखवतात ते नरकात

जातात. जे त्यांचे रक्त त्या युद्धरुपी वेदावर सांडतात ते माझे मोठे मानकरी असतात, ते अग्नीधर म्हणून मुख्य पुरोहित होतात. जे योद्धे त्याच्या शत्रूला मारून त्याच्या रथावर चढून युद्ध करतात ते विष्णूचे विशेष मानकरी असतात. जे शत्रूच्या नायकाला, त्याच्या मुलाला काबिज करता ते मला फार आवडतात. युद्धात मरणारे श्रेष्ठ असतात म्हणून त्यांच्यासाठी दुःख करावयाचे नसते. त्याच्या करता रडण्याने त्याचे स्वर्गावरोहण होत नाही. म्हणून त्यांच्यासाठी रडावयाचे नसते. त्याच्या मृत्यूची वार्ता समजल्यानंतर कोणी त्याच्या नावांने स्नान करावयाचे नसते. म्हणजे त्याचे स्वर्गावरोहण सोपे होते. मृत्यू, मृत्यूं मध्ये फरक असतो. काहीं उदात्त असतात. युद्धातील मृत्यू तसा उदात्त समजला जातो म्हणून त्याबद्दल शोक करणे मूर्खपणाचे समजले जाते. अशा योद्ध्यांसाठी माझ्या अप्सरा त्यांचे मनेरंजन करत असतात. युद्धात खरे युद्ध करणारा एकाद्या योग्यापेक्षा श्रेष्ठ असतो. युद्धात मात्र तो लहान व वृद्ध आणि महिलां ह्यांना मारणार नाही. तसे केले तर त्याची सगळी पत प्रतिष्ठा लयाला जाते. त्याच प्रमाणे घाबरलेला, शरण आलेला, शस्त्र खाली ठेवलेला, पळून जाणारा, जो तोंडात गवत धरून आहे आणि जो सांगतो कीं मी तुमचा आहे, ह्यांनासुद्धा तो मारणार नाही. नाहीतर त्याची पतप्रतिष्ठा लयाला जाईल.

इंद्र पुढे सांगतो, जंभ, वृत्र, वल, पक, सतमय, विरोचन, नमुची, संवप, विप्रचित्ती आणि प्रह्लाद असे मी मारून येथवर इंद्राचे स्थान घेऊन राहिलो आहे.

भिष्म पुढे सांगतात, ते शक्राचे ऐकून अंवरिष समजतो कीं, खरा योद्धा कसा योग्यांपेक्षा जास्त श्रेष्ठ ठरतो. म्हणून त्याना तपस्या, व्रतस्थता असे कांहीं न करता स्वर्ग कां मिळतो ते तो समजला.

शांती पर्व भाग सत्त्याण्णवावा संपला.

# शांती पर्व
## भाग अठ्ठ्याणवावा

भिष्म बोलतात, त्या संदर्भात एक किस्सा सांगतो त्यात राजा प्रतर्दन आणि मिथिलेचा राजा जनक ह्याचा आहे. जनक राजा युद्धाचा यज्ञ करण्या आधी त्याच्या लढवय्याना काय सांगतो ते ऐक. तो त्याच्या सैनिकांत स्वर्ग आणि नरकाचे चित्र दाखवतो. तो त्यांना सांगतो, "पहा ते दोन पर्याय तुमच्या पुढे आहेत. त्या प्रत्येकांचे विशेष आहेत, जे न डगमगता लढतील त्यांना स्वर्ग मिळणार आहे आणि जेथे गंधर्व कन्या त्यांचे स्वागत करतील, जेथे तुम्हाला जे पाहिजे ते मिळणार आहे आणि हा दुसरा आहे नरक, जर लढायला घाबरलात तर त्यात पडणार कीं, त्यात अनेक युग तडफडत तुम्हाला रहावे लागणार आहे. तुम्हाला ठरवावयाचे आहे कीं, तुम्ही कोणता पर्याय निवडणार. कारण लढाई होणार आहे व तुम्ही नाही तर तुमचे शत्रू तुम्हाला मारणार आहेतच. तुमचा मृत्यू निश्चित आहे मग तो कसा असावा ते आता ठरवा. नरकात जायचे कां स्वर्गात"?

मिथिला नगरीचे योद्धे राजाचे मन जिंकण्यासाठी शत्रूचा पराभव करतात त्यातले जे मरतात ते स्वर्गात जातात व जे जीवंत रहातात ते पृथ्वीचे राज्य उपभोगतात. त्यांच्या सैन्याची व्युहरचना अशी होती कीं, ती कधीच पराभूत झाली नाही. त्यात रथांचे दल हत्तींच्या आलटून पालटून होते, त्यांच्या मागे घोडेस्वार होते, त्यांच्या पलटणी मागे पायदल होते, सगळे चिलखताने सुरक्षित होते. म्हणून अरे युधिष्ठीरा, युद्धाची व्युहरचना नेहमी जनक राजासारखी असावी हे लक्षात घे. योद्धे मोठ्या त्वेषाने स्वर्ग गाठण्यासाठी लढत असतात. कारण त्यांमुळे ते जिंकत होते. एकमेकांना उत्तेजन देत त्याच वेळी घाबरलेल्यांना धीर देत ते लढत असतं. त्याचे सैन्य शत्रूचा पाठलाग करून घालवत असतं. त्यांमुळें कमी हत्या करून युद्ध जिंकता येत होती. कोंडीत सापडलेले स्वताचा जीव वाचवण्यासाठी प्राणपणाने लढत असतं. परंतु, त्या पळणार्या शत्रूच्या फार मागे लागायचे नसते, नाहीतर ते पळत असतांना थकले तर उलटून मागे फिरण्याची शक्यता असते ते मात्र धोक्याचे असते. त्यांना रणभूमीच्या कडेपर्यंत पळवावयाचे असते. राज्य त्यातील खर्या योद्ध्यांच्या बळावर रहात असते जसे लहान बाळ त्याच्या आईच्या कडेवर

आरामात बसलेले असते. म्हणून क्षत्रिय समाजातील प्रमुख मानले गेले आहेत. त्यांचा आदर झाला पाहिजे. ते आहेत म्हणून सगळे सुरक्षितपणे रहात असतात. त्यांच्या कार्याचा धिक्कार करणे म्हणजे मूर्खपणाचे आहे. तो मूर्खपणा तू करू नकोस.

शांती पर्व भाग अठ्ठ्याण्णवावा संपला.

# शांती पर्व

## भाग नव्याण्णवावा

युधिष्ठीर विचारतो, युद्धात राजा त्याचे सैन्य शत्रूच्या गोटात थोडे क्रूरपणे कसे नेईल ते सांगा.

भिष्म सांगतात, कांही म्हणतात, पुण्याचा मार्ग सत्याच्या मार्गाने जातो. कांहीं म्हणतात, तो विवेकाने जातो तर कांही म्हणतात, तो चांगल्या वर्तनाने साध्य होतो. कांहीं समजतात कीं, तो धूर्तपणे साध्य करावयाचा असतो. मला विचारशील तर सांगेन धूर्तपणाने साध्य करणे क्षत्रियासाठी योग्य असते. जसे चोर सगळ्या मर्यादा ओलांडून त्याचे इप्सित साध्य करत असतो तसे बर्याच वेळी क्षत्रियांना सुद्धा करावे लागते. त्यात दोष नसतो असे ऋषी सांगतात कारण पाप कर्मात नसते ते त्याच्या उद्देशात असते त्या नियमानुसार उद्देश चांगला असणे महत्वाचे असते मार्ग कदाचित वाकडा असला तरी चालते. त्यात उपयोगात येणार्या क्लुप्त्या आता तुला सांगतो. त्या सगळ्या आपल्या शास्त्रात दिल्या आहेत त्याच मी सागणार आहे. तेव्हां ते नीटपणे ऐक. त्यातील कांहीं चांगल्या आहेत व कांहीं वाईट आहेत. परंतु, युद्धात जिकण्यासाठी त्या सगळ्यांचा वापर क्षत्रिय करत असतात. युद्धा शिवाय इतर वेळी त्यांचा उपयोग करावयाचा नसतो. त्यात भेदनिती महत्वाची असते. त्याच्या मदतीने तो शत्रूच्या गोटात दुफळी माजवतो व ते राज्य कमजोर करतो त्यानंतर ते जिंकतो. त्यालाच कपट कारस्थान असे म्हणतात. युद्धात लागणारी सगळी शस्त्रं, आयुध मोठ्या प्रमाणात बनवणारे कारखाने राजा तयार करील. त्यासाठी आवश्यक असेल तर विदेशी तंत्रज्ञानी तो आमंत्रण देऊन त्याना त्याच्या राज्यात वसवेल. त्यांचे तंत्र चांगले ज्या राजाकडे असते तो युद्धात जिंकणारा असतो. ती आयुध, शस्त्रं कशी चालवावयाची त्याचे प्रशिक्षण देणारी गुरूकुल तो त्याच्या राज्यात स्थापन करील व त्यातून हुशार योद्धे तयार करील. त्या योद्ध्यांचा यथोचित मान राखला जाईल. राज्याचे संरक्षण त्यांच्या हिम्मतीवर अवलंबून असते. राजा त्याच्या कडे दोन प्रकारचे लष्कर ठेवेल. एकामध्ये वेतन घेणारे नियमित सैनिक असतील व दुसर्यात शिलेदार म्हणजे हौशी योद्धे असतील जे बक्षिसासाठी राजासाठी लढतील. शिलेदार एरव्ही त्यांचे इतर काम करत असतील जेव्हां

युद्ध नसेल. शिलेदार ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य अथवा शुद्र अशा कोणत्याही वर्णाचा असेल. प्रसंगी ते परदेशीसुद्धा असतील. त्यांच्या युद्ध कौशल्याची कदर राजा करील व त्यांना युद्धात लढण्यासाठी उत्तेजन देईल. राजा त्याच्या वेतनी सैनिकांच्या नियमितपणे तालमी घेत राहिल व त्यांचे क्षात्रतेज प्रभावित करण्याचा सतत प्रयत्न करत असेल. राजा शेतीच्या कामात लक्ष घालेल. कृषीसाठी पाणी कमी पडणार नाही ह्यासाठी विहीरी, तळी, कालवे, धरणं असे सगळे बांधून काढील व राज्याची धान्याची परिस्थिती बिघडू देणार नाही. त्याच प्रमाणे गवत चारा जे पशुंचे खाद्य तेसुद्धा मुबलक कसे निपजेल त्याची तजवीज तो करत असेल. साधारणपणे शत्रूचे हल्ले पिकपाण्याच्या म्हणजे सुगीच्या काळात होत असतात कारण त्याना ते नवीन आलेले धान्य लुटावयाचे असते. त्यासाठी राजा संरक्षणाची सगळी व्यवस्था सज्ज ठेवेल. राज्याला बाहेरच्या राज्याला जोडणारे रस्ते, नद्या ह्यांच्यावर राजाचे हेर लक्ष ठेवून शत्रूच्या हालचालीची विशेष काळजी घेतली जाईल. पिकांची कापणी झाल्यानंतर तो धोका नाहीसा झाल्यावर राजा निवांत होईल. त्यासाठी राज्या भोवती घनदाट अरण्य असेल अशी दक्षता राजा पाहील. कारण तशा अरण्यातून शत्रू वेगांने स्वारी करू शकत नाही. वेशी कोट वगैरेचा बंदोबस्त पक्का असेल. राजाचे हेर जर चांगले सतर्क असतील तर राजाला शत्रूच्या हालचाली आधीच समजू शकतात. तसे असेल तर तो कधीच वेसावध नसेल. राजा त्याच्या सैन्याच्या सज्जतेची खुबीने जाहीरात करेल कीं, शत्रूला त्याची खबर झाल्याने त्याचा जोर कमी होईल. त्यासाठी त्याच्या सैन्याच्या संचलनादी कारवाया मोठ्या जोमांने तो आखील. लढण्यासाठी चिखल, रेती असलेले रणांगण युद्ध करणार्यांसाठी धोक्याचे असते. त्यासाठी सपाट भूप्रदेश चांगला समजला जातो. डोंगराळ प्रदेश गनिमीकाव्यासाठी उत्तम असतो. काटेरी झुडपांची वन शत्रूला अडवण्यासाठी चांगली असतात. दगडधोंड्यांचा प्रदेश रथाने युद्ध करणार्यांसाठी चांगला नसतो. मोकळे मैदान असेल तर ते रथांसाठी चांगले असते. गवत वाढलेला प्रदेश युद्धासाठी चांगला समजला जातो त्यात त्या कुरणाला आग लावली कीं शत्रूचे सैन्य त्यात होरपळून जात असते. युद्ध केव्हां सुरू करावे ते राजाला ठरवावयाचे असते. त्यासाठी ज्योतिषीना बोलावून तो मुहूर्त ठरवून युद्धाची वेळ निश्चित करत असतो. राजाचे सैनिक कोणाला मारणार नाहीत त्याचे नियम दिले आहेत ते असे, झोपलेला, तहानलेला,

उपाशी, थकलेला, ज्याचे चिलखत पडले आहे, जो ध्यान साधना करत बसला आहे, जो रस्त्याने चालला आहे, जो लढण्याच्या तयारीत नाही, जो जेवावयाला बसला आहे, जो शौंच करत बसला आहे. जो लघवी करत आहे, जो आधीच जखमी झाला आहे, जो मरणासन्न झाला आहे, जो योद्धा नाही. व्यापारी, शुद्र जे वैश्यांचे काम करत आहेत, ब्राह्मण, वेदाभ्यास करणारे, जे पुरूष नाहीत, जे इतर कामाचे कारागिर आहेत, वैद्य, ज्योतिषी, भिषक, भिकारी, वेडा, भ्रमिष्ट, लहान मुलगा, वृद्ध, आंधळा, जो सैनिकांना मदत करतो.

जे सैनिक युद्धात बाजी मारतात त्यांचे राजा विशेष बक्षिशी देऊन कौतुक करेल. सैनिकात दहाचा एक गट असेल त्यानंतर अशा दहांचा एक गट असेल अशा रितीने सैन्याची रचना असेल व त्यांच्या सर्वात श्रेष्ठ नायकाला सरसेनापती समजले जाईल. ते सगळे एकमेकांना मदत करत लढतील. जो युद्ध सोडून पळून जाईल त्याची निर्भत्सना केली जाईल. लढणार्यात जे क्षत्रिय नाहीत त्यांना लढण्यासाठी उत्तेजन दिले जाईल. त्यांना प्रत्यक्ष लढण्यापेक्षा इतर कामं सांगितली जातील. त्यातील जे शुद्र जोराने लढतील त्यांना क्षत्रियाचा दर्जा देऊन सन्मानित केले जाईल राजा कडून. जे क्षत्रिय पळून जाण्याचा प्रयत्न करतील त्याना शुद्र ठरवले जाईल. राजा त्याचे राज्य सुरक्षित करण्यासाठी लढत असला तरी त्याचे सैनिक मात्र स्वर्गात जाण्यासाठी लढत असले पाहिजेत. तशी मनस्थिती जेव्हां सामान्य सैनिकांची असते तेव्हां तो राजा युद्ध जिंकत असतो. लढतांना होणार्या जखमा जरी तापदायक असल्या तरी त्यांत त्याच्या स्वर्गाची वाट सुरू होणार असते हे त्यांने समजून त्या दुःख देणार्या जखमा सहन करावयाच्या असतात. तो जो अशा जखमा घेऊन धारातीर्थी पडलेला असतो तो धन्य झालेला असतो. युद्धाच्या आघाडीला बेडर योद्धे असतील. ते शत्रूची फळी फोडण्याचे काम करतील. जे बेडर नाहीत त्यांची फळी शेवटी असेल केवळ शत्रूला दाखवण्यासाठी कीं, मोठा फौजफाटा आहे. जेव्हां शत्रूच्या फळीत मुसूंडी मारावयाची तेव्हां सुचीमूख अशी व्युहरचना असली पाहिजे. त्यातील आघाडीचे योद्धे खरे बहादूर असावे लागतील. ते बहुधा मरून स्वर्गात जातात, त्यांच्या परिवाराची व्यवस्था राजाला करावयाची असते. शत्रूला घाबरवण्यासाठी आपली मोठी फौज येत आहे अशा वावड्या उठवावयाच्या असतात. लढणार्या योद्ध्यांचा हुरूप

वाढावा म्हणून रणवाद्ये वाजवली जातात. त्यामुळे मरणार्यांच्या कींकाळ्या ऐकू जात नाहीत. तशा त्या ऐकू गेल्या तर कांहीं योद्धे मरणाच्या भितीने पळून जाण्याचा धोका दोनही बाजूंच्या सैनिकात असतो.

शांती पर्व भाग नव्याण्णवावा संपला.

# शांती पर्व

## भाग शंभरावा

युधिष्ठीर विचारतो. "योद्ध्याची चिलखतं कशी असावीत म्हणजे तो लढाई चांगली करू शकेल"?

भिष्म सांगतात, ते सगळे त्या त्या सैनिकाच्या अंगाला बसणारे असले पाहीजेत. ना जास्त घट्ट किंवा सैल असावेत. सैनिकांना सराव असलेले ते असले पाहिजेत. ज्या शस्त्रांचा त्याना सराव नाही ती त्यांना दिली जाणार नाहीत. गांधार, सिंधी आणि सौवर लोक त्यांच्या नखाने ओरबडणे जास्त चांगले समजतात. ते तलवारीसुद्धा चांगल्या चालवतात. राजाला माहीत पाहिजे त्याच्या सैनिकांच्या ह्याबाबतच्या सवयी. उशीनर सगळ्या प्रकारच्या शस्त्र आयुधाने लढू शकतात. पूर्वेकडील हत्तीवरून लढणे पसंत करतात. ते लुच्चेगिरी जास्त करतात म्हणून त्यांच्याशी तसेच लढावयाचे असते. यवन, कंबोज त्यांच्या हाताने मारामारी करणे योग्य समजतात. दक्षिणेकडील समशेर वापरतात, त्या त्या लोकांच्या लढण्याबाबतच्या सवई राजाला माहीत असल्या पाहिजेत. कांहीं खुणा सांगतो त्या लक्षात ठेव, सिंहासारखे दिसणारे व तसेंच डोळे असलेले आणि पिचपिचे डोळे असलेले चांगले योद्धे असतात. हरणासारखा आवाज असलेले व वाघासारखे व वृषभासारखे मजबूत असलेले चांगले योद्धे असतात. ज्यांचा आवाज किंणकिंणा असतो ते लुच्चेगिरी करतात. ज्यांचा आवाज घोगरा असतो व ते चपळाईने हालचाली करतात ते सुद्धा चांगले लढतात. कुरळे केस असलेले चपळ लोक सहसा हरत नाहीत. दिसायला देखणे, हिरव्या डोळ्याचे रागीट, धिप्पाड लोक युद्धात हार मानत नाहीत. ज्यांच्या नसा मोठ्या स्पष्ट दिसतात ते वेगांने लढतात. हिरवे कुरळे केस असलेले चपट्या चेहर्याचे लोक जे भयंकर दिसतात ते चांगले योद्धे असतात, गोल डोकी असलेले, मोठी तोंड असलेले, त्यांचा आवाज कर्कश्य असतो, ते चांगले योद्धे असतात. ते जीवाची पर्वा न करता लढणारे असतात. त्यांना आघाडीला ठेवावयाचे असते. त्यांच्याशी गोड आवाजात बोलले तर ते तुला मूर्ख समजतात ते चांगले योद्धे नसतात.

शांती पर्व भाग शंभरावा संपला.

शांती पर्व खंड दुसरा संपला.

## भाषांतरकाराचा परिचय –

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७७ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई–साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी

ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षें मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई–साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईंदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे, माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर

मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.
आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळीराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.
आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त

परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता, जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या

होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई–साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३– २ –२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान –

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

esahity@gmail.com ला कळवून ई–मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद,